म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
ग्रं. नं. ५८०२

REFBK-0009420
REFBK-0009420

EC 1972

९४२०

५७२



शालेय प्रकाशन सातवें

REFBK-0009420

# तारका

[निवडक कवितांचा संग्रह]

संपादक

**वि. स. खांडेकर**

किंमत सव्वा रुपया

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
२२ कसबा, पुणें २

● ● ●

सर्व हक्क सुरक्षित

● ● ●

मुखपृष्ठावरील चित्र
दीनानाथ दलाल यांचें आहे

● ● ●

पहिली आवृत्ति १९४९
दुसरी आवृत्ति १९५७

● ● ●

मुद्रक :
द. ग. गपचूप
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार, पुणें २

● ● ●

# अनुक्रमणिका


| | कविता | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | प्रास्ताविक | | ५ |
| १ | अमृतातेंही पैजेंसीं जींके | : ज्ञानेश्वर | २५ |
| २ | सात अभंग | : जनाबाई | २९ |
| ३ | नल-दमयंती | : मुक्तेश्वर | ३४ |
| ४ | तुका म्हणे | : तुकाराम | ३९ |
| ५ | कृष्ण आणि कर्ण | : मोरोपंत | ४३ |
| ६ | सवाई माधवराव यांचा मृत्यु | : प्रभाकर | ४७ |
| ७ | तुतारी | : केशवसुत | ५१ |
| ८ | तारातरङ्ग | : चंद्रशेखर | ५५ |
| ९ | बालविहग | : बालकवि | ५९ |
| १० | वात्सल्य | : 'बी' | ६१ |
| ११ | नदी आणि कवि | : विनायक | ६४ |
| १२ | कोण रोधील ? | : भा. रा. तांबे | ६७ |
| १३ | दैवाची निर्दयता | : गडकरी | ७० |
| १४ | मूर्ति दुजी ती | : वि. दा. सावरकर | ७३ |
| १५ | दैवतें माय-तात | : यशवंत | ७७ |
| १६ | पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास | : माधव ज्यूलियन् | ८० |
| १७ | कषायपेयपात्रपतित मक्षिकेप्रत — | : केशवकुमार | ८५ |
| १८ | चांदरात | : अनंत काणेकर | ९० |
| १९ | काम आणि आराम | : अनिल | ९३ |
| २० | जलद भरुनि आले | : बा. भ. बोरकर | ९९ |
| २१ | नवें वर्ष | : वा. रा. कान्त | १०२ |
| २२ | झंझावात | : इन्दिरा सन्त | १०५ |
| २३ | भविष्यकाला — | : निकुम्ब | १०८ |
| २४ | पितात सारे गोड हिंवाळा | : मर्ढेकर | ११३ |
| २५ | कोलंबसाचें गर्वगीत | : कुसुमाग्रज | ११६ |
| | कवि-परिचय | | १२१ |

२३८५२
५०२
२१।११।५८

## प्रास्ताविक

'तारका' या काव्यसंग्रहांत ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या पंचवीस मराठी कवींच्या कविता समाविष्ट केल्या आहेत. त्या वाचतांना दोन शंका येण्याचा संभव आहे. पहिली कवींच्या निवडीविषयींची! हे पंचवीस कवि मराठींतले सर्वश्रेष्ठ कवि आहेत काय, असा कुणीं प्रश्न केला तर क्षणाचाहि विलंब न लावतां मी त्याला उत्तर देईन, 'नाहीं. मुळींच नाहीं.' आपल्याला हवें तें उत्तर साक्षीदारानें दिलें, आतां तो आपल्या जाळ्यांत सांपडला, अशा कल्पनेनें आनंदित होऊन त्याच्यावर पुढचा हल्ला चढवायला तयार होणाऱ्या वकिलाप्रमाणें सद्गृहस्थहि माझा समाचार घेण्याकरितां —

पण त्याची सरबत्ती सुरू होण्यापूर्वींच मी म्हणेन, 'माझी मायबोली इतकी दरिद्री नाहीं. या संग्रहांतले अनेक कवि बाजूला ठेवून त्यांच्याऐवजीं दुसऱ्या कवींच्या कविता मी सहज निवडूं शकलों असतों आणि तो संग्रहहि 'तारका'-इतकाच चांगला झाला असता.'

केवळ वादांत विजय मिळविण्याकरितां म्हणून मीं हें उत्तर दिलें असतें असें मुळींच नाहीं. मला खरोखरीच तसें वाटतें. या लहानशा संग्रहांत माझे कितीतरी आवडते कवि अभावानें चमकत आहेत. 'अनुदिन अनुतापें तापलों रामराया' ही ज्यांच्या उद्गारांतली आर्तता गेलीं चाळीस वर्षें माझी साथ करीत आली आहे, 'अचपळ मन माझें नावरे आवरीतां' हा ज्यांचा चरण गुणगुणतांना जीवनाचें विशाल आणि सखोल दर्शन झाल्याचा मला नेहमीं भास होतो, 'वन्हि तो चेतवा रे। चेतवीतांचि चेततो।' या ज्यांच्या धीरगंभीर शब्दांनीं माझ्या निराशेनें अंधारलेल्या मनाला हजारदां उजाळा दिला आहे, पंढरीला विठ्ठलाची मूर्ति पाहिल्यावर 'येथें कां रे ऊभा रामा। मनमोहन मेघःश्यामा।' म्हणून त्याला प्रश्न करण्याइतकी राममय झालेली ज्यांची वृत्ति माणसानें आपल्या श्रद्धाविषयाशीं किती तद्रूप झालें पाहिजे हें मला बाळपणापासून सुंदर रीतीनें समजावून सांगत आली आहे, 'मराठा तितुका मेळवावा' हा समतेचा आणि सहकार्याचा थोर

मार्ग तीन शतकांपूर्वी ज्यांच्या विचारवंत प्रतिभेनें महाराष्ट्राला दाखविला, त्या समर्थ रामदासांची कविता या संग्रहांत कुठें आहे ? ज्ञानेश्वर-तुकारामांइतकाच त्यांच्याविषयीं मला आदर आहे. पण—

हा पण नसता तर माझा दुसरा आवडता कवि या संग्रहांत हमखास दिसला नसता का? सीमंतिनीचा पाण्यांत बुडालेला नवरा पाताळांतून परत येऊन तिचें सौभाग्य तिला लाभतें ही कथा ज्या वयांत मला अक्षरशः खरी वाटत होती, त्या वयापासून ज्याला देव पाहायचा आहे त्याला आपलें हृदय छिन्नभिन्न करून घ्यावें लागतें, दगडांत लपलेल्या सुंदर मूर्तीप्रमाणें देव माणसाच्या अंतःकरणांतच वास करीत असतो, मात्र तो आपणहून कधींच प्रकट होत नाहीं, असें ज्या वयांत वाटायला लागतें त्या या प्रौढत्वाच्या काळापर्यंत श्रीधरांचें वाङ्मय मी किती गोडीनें वाचीत आलों आहें ! माझ्या अगदीं निवडक पुस्तकांच्या कपाटांत शिवलीलामृत नेहमीं असतें. मी कुठल्याहि सोमवारीं — अगदीं श्रावणांतल्यासुद्धां — तें वाचीत नाहीं. मात्र ज्या वेळीं कोणत्याहि कारणानें मी अतिशय उदास होतों, माझें मन माणसांत रमत नाहीं आणि सृष्टीच्या सहवासांतहि त्याला करमत नाहीं, तेव्हां माझ्या आवडत्या कवींकडे मी वळतों. अशा वेळीं कधीं कधीं मी शिवलीलामृत उघडतों. या काव्यग्रंथांतलें महानंदेचें किंवा श्रियाळ-चांगुणेचें आख्यान वाचूं लागलें कीं किरकिरणाऱ्या मुलाला पाळण्याच्या झोक्यांनीं जशी गुंगी यावी तशी माझी स्थिति होते. माझी मनःशांति मला परत लाभते. असें असूनहि श्रीधरांचा समावेश मी या संग्रहांत करूं शकलों नाहीं.

देवाला दाखवायच्या नैवेद्याचें पान फार लहान असावें आणि मुदपाकखान्यांत तऱ्हतऱ्हेचीं पक्वान्नें मात्र विपुल केलेलीं असावीत, अगदीं प्रत्येक पक्वान्न नैवेद्याच्या पानावर थोडें थोडें घालायचें म्हटलें तरी तें अशक्य व्हावें, तशी या पुस्तकाच्या बाबतींत माझी स्थिति झाली. नैवेद्याचें दुसरें पान तयार करणें हाच ही उणीव दूर करण्याचा राजमार्ग आहे.

पहिल्या शंकेचें हें निरसन बहुतेकांना मान्य होईल. पण दुसरी शंका मात्र जरा अशुद्ध आणि अवघड आहे. ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरांपर्यंतचे कवि एका पंक्तींत बसविणारांची संभावना ' स वै मुक्तोऽथवा पशुः ' या सुभाषितानें करणारे लोक अद्यापि आपल्यांत अस्तित्वांत आहेत. अजून आम्ही घटपटादि खटपट करून

संत-पंडित कवींचे वाद लढवीत आहों, प्राचीन-अर्वाचीन कवितेंतल्या भेदावर मारामाऱ्या करीत आहों, अगदीं आधुनिकांना डोळे मिटून डोक्यावर घेऊन नाचत आहों, अथवा त्यांच्याकडे डोळेझांक करून त्यांना लाथाडून देत आहों. जुन्या वाङ्मयांतली पितळ सोनें म्हणून विकणारे दुकानदार जसे आमच्या साहित्याच्या बाजारांत दुकान थाटून बसले आहेत, तसें नव्या वाङ्मयांतल्या सिगारेट्स्च्या पेट्यांतली चांदी सराफकट्टयावर चांदीच्या भावानें खपवूं पाहणारीं शहाणीं गिऱ्हाइकेंहि आपल्यांत आहेत !

नव्या-जुन्यांची एकांगी स्तुति-निंदा करणाऱ्या असल्या लोकांहून अधिक अरसिक माणसें जगांत दुसरीकडे कुठेंच आढळणार नाहींत ! बिचाऱ्यांच्या हें लक्षांतच येत नाहीं, कीं प्रतिभेचा मक्ता कांहीं परमेश्वरानें एका काळाला दिलेला नसतो. किंबहुना प्रत्येक युग आपल्याला अनुरूप अशीं मोठीं माणसें बरोबर घेऊनच जन्माला येत असतें. त्या मोठ्या माणसांच्या कर्तृत्वाचें मूल्यमापन त्या त्या काळाची पार्श्वभूमि लक्षांत घेऊनच केलें पाहिजे. द्राक्षाची आंब्याशीं आणि आंब्याची ' पीच् 'शीं तुलना करून विशिष्ट फळच श्रेष्ठ आहे असा आग्रह धरणें हा वितंडवाद होणार नाहीं काय ? पण जिभेनें चाखायच्या रसांच्या बाबतींत आपण जेवढे उदारमतवादी होऊं शकतों, तेवढा विवेक आत्म्यानेंच ज्यांचा आस्वाद घेतां येतो अशा रसाविषयीं मात्र आपण दर्शवीत नाहीं. किती विचित्र गोष्ट आहे ही !

एकाद्या पर्वताचीं शिखरें लहानमोठीं असतात. त्यांतलें एकादेंच गगनचुंबी असूं शकतें. प्रतिभासामर्थ्याच्या दृष्टीनें कवींतहि असे फरक पडतात. चांगले कवि जसे गल्लोगल्लीं निर्माण होत नाहींत, तसे ज्ञानेश्वर, तुकाराम आणि केशवसुत कांहीं प्रत्येक पिढीला जन्माला येतात असें नाहीं. पण हें अपरिहार्य अंतर सोडून दिलें तर बाकीच्या बाबतींत सर्व चांगले कवि एकाच पंक्तींत बसूं शकतात. सौंदर्यानें आनंद देण्याची आणि सामर्थ्यानें उत्साह जागृत करण्याची काव्याची शक्ति मराठी काव्यांत ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरांपर्यंत प्रत्येकानें आपापल्या पद्धतीनें प्रकट केली आहे. आत्मलिंगाचा साक्षात्कार वर्णन करतांना —

*स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्रपाळीं पिंड देखा ॥*
*शेषासारिखी बैसका । जो आधार तिन्ही लोकां ॥*

लिंग देखिलें दाखिलें । तिहीं लोकीं विस्तारलें ॥
मेघधारीं तपन केलें । तारापुष्पीं वरि पूजिलें ॥
चंद्रफळ त्या वाहिलें । वोवाळिलें रविदीपें ॥

या अभंगांत ज्ञानेश्वर जी भव्य कल्पकता प्रकट करतात, तिचें दर्शन मर्ढेकरांच्या प्रभातकाळच्या खालील चित्रणांत होत नाहीं काय ?

डोकीं अल्गद घरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी;
पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी

नितळ न्याहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेतीं;
मंथ बिलंदर लाटांमधुनी
सागरपक्षी सूर्य वेंचिती.

तुकाराम व अत्रे, जनाबाई आणि इंदिरा संत, केशवसुत व कुसुमाग्रज, बालकवि आणि बोरकर यांच्या कविता आपण एकामागून एक वाचीत गेलों म्हणजे स्थळ-काळांच्या भिन्नतेमुळें निर्माण झालेल्या निराळेपणाला साहित्यांत — विशेषतः काव्याला अवास्तव महत्त्व देणें अत्यंत अरसिकपणाचें आहे असेंच आपल्याला दिसून येतें. तुकारामांप्रमाणें अत्रे विठ्ठलभक्त नसतील. पण सारें चित्त संसारांत गुंतवून ठेवून पंढरपूरच्या यात्रेला जाण्याचें सोंग करणाऱ्या सासूचें वर्णन करतांना तो महान् भगवद्भक्त क्लिष्ट व रुक्ष कवींची पगडी उडविणाऱ्या या विसाव्या शतकांतल्या विनोदी लेखकाइतकाच मिस्किल होतो. जनाबाईच्या अभंगांइतकीच इंदिराबाईच्या कवितेंत आर्तता आहे. पहिल्या काव्यांत विठ्ठलाच्या दर्शनाची आतुरता आहे, दुसऱ्यांत आयुष्याचा सोबती संसाराच्या अर्ध्या डावावरून उठून गेल्यामुळें येणारी व्याकुळता आहे.

केशवसुत आणि कुसुमाग्रज व बालकवि आणि बोरकर हे एका दृष्टीनें

आधुनिक असले तरी सर्वस्वीं निराळ्या पिढ्यांचे आहेत. केशवसुतांच्या मृत्यूनंतर पांच-सहा वर्षांनीं कुसुमाग्रज जन्माला आले. पण ' तुतारीं 'तल्या—

*' धार धरलिया प्यार जिवावर*
*रडोत रडतिल रांडा पोरें*
*गतशतकांचीं पापें घोरें*
*क्षालायाला तुमचीं रुधिरें*
*पाहिजेत रे स्त्रैण न व्हा तर !'*

या ओळींच्या मागोमाग

*' मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन, ना दारा*
*घराची वा वितभर कारा !'*

या ओळी वाचल्या कीं आपण जणूं कांहीं एकाच कणखर कविमनाचे तेजस्वी बोल ऐकत आहों असा भास होतो.

बालकवींनीं श्रावणमासावर एक गोड गीत रचिलें आहे. बोरकरांनीं कार्तिकाचें काव्यमय वर्णन केलें आहे. सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें हे दोन्ही ऋतु अगदीं भिन्न आहेत. पण या दोन कविता वाचून जो आनंद होतो तो अगदीं एका जातीचा.

बालकवींचें हें श्रावणाचें वर्णन —

*वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे*
*मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे ।*
*बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांचि माळचि ते,*
*उतरुनि येती अवनीवरतीं ग्रहगोलचि कीं एकमतें ।*
*फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती,*
*सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निज बाळांसह बागडती.*
*सुवर्णचंपक फुलला विपिनीं रम्य केवडा दरवळला*
*पारिजातही बघतां भामा, रोष मनींचा मावळला !*

आणि हें बोरकरांचें कार्तिकाचें चित्र —

*पाजळतीं दिवसांसम झाडें*
*खुलीं नभाचीं रत्न-कवाडें*

*दिशा त्यांतुनी ओलेत्यानें        बघती सांग कुणास ?*

*झळझळती गवताच्या गंजी*
*हवेंत भ्रमती चतुर किरमिजी*
*अहा ! पिसोळी पुष्पदळांसम        वहात भिडाति' तृणास.*

*गुरांपरी मोहरली मखमल*
*पालवांत जरतारी किलबिल*
*झुळुक नदीवरली ये शीतल        लालुचवीत मनास.*

*तिथें कुठेंतरी दडुनि केवढा*
*पातींतुन वाजवा चौघडा*
*करूं तिथें चल खजिना उघडा    रिझवुं मना नयनास.*

प्रचारप्रधान वाङ्मयाला स्थलकालाचीं बंधनें जखडून टाकतात. विचारात्मक साहित्याला तीं तितकीं करकचून बांधूं शकत नाहींत. पण दोरी धरणाराच्या लहरीवर पतंगाच्या हालचाली जशा अवलंबून असतात, त्याप्रमाणें देशपरिस्थितीवर अशा वाङ्मयाचें आवाहन अवलंबून राहतेंच. त्यांत तात्कालिक भाग पुष्कळ असतो. तो एकाद्दुसऱ्या पिढींत कोमेजून जातो. त्यामुळें अशा वाङ्मयाचें आकर्षण पिढ्यान् पिढ्या टिकणें शक्य नसतें. तत्त्वप्रधान वाङ्मय त्या मानानें चिरकालिक असतें. गांभीर्यामुळें तें सर्वसामान्य मनुष्याच्या अंतःकरणांत प्रवेश करूं शकत नाहीं. पण शतकानुशतकें बुद्धिमतांवर तें स्वामित्व गाजवितें. जीवनाचीं कोडीं उलगडण्याचा तें प्रयत्न करतें. प्रक्षुब्ध सागरांत सांपडलेल्या नौकेला दीपगृह जसा मार्ग दाखवितें, त्याप्रमाणें संभ्रमाच्या आणि संशयाच्या चक्रव्यूहांत सांपडलेल्या मानवी आत्म्याला तें धीर देतें; तें त्याला स्वतःमधल्या अमंगलाशीं संग्राम करायला प्रवृत्त करतें. काव्यात्मक वाङ्मय — यांत कवितेबरोबर कथा, नाटक, कादंबरी वगैरे अनेक ललित वाङ्मयाचे प्रकार येतात — तात्त्विक वाङ्मयाइतकेंच दीर्घजीवी होऊं शकतें. एवढेंच नव्हे तर तें मूठभर बुद्धिमतांपुरतें मर्यादित राहात नाहीं. तें समाजाच्या खालच्या थरापर्यंत सहज पाझरत जातें. व्यक्तीच्या हृदयांतल्या अगदीं नाजुक अशा अंतर्भागांतहि तें प्रवेश करतें. तें आनंदाबरोबर उत्साह देतें, कल्पनेच्या गंधर्वलोकाप्रमाणें उदात्त अनुभूतीच्या तपोवनांतहि तें आपल्याला घेऊन जातें. आईच्या वात्सल्यानें माणसाच्या पाठीवरून हात फिरवितें. पत्नीच्या

प्रीतीची मधुरता त्याला प्रचीत करून देते. बहिणीच्या मायेची आर्तता अशा वाङ्मयाच्या सहवासांत त्याला जाणवते. आणि त्याच्या शब्दाशब्दांतून कन्यकेच्या पायांतल्या वाळ्यांचे लडिवाळ बोल त्याला ऐकूं येतात. म्हणूनच सर्व देशांत सर्व काळीं काव्यात्मक वाङ्मय हेंच बहुजनसमाजाचें मनोरंजनाचें आणि आत्मविकासाचें प्रमुख साधन होत आलें आहे. या काव्यात्मक वाङ्मयांत कविता सर्वश्रेष्ठ मानली जाते. कारण इतर ललित वाङ्मयप्रकारापेक्षां स्थलकालाचीं अंतरें ती लीलेनें ओलांडते. श्रीधर आणि इलियट् यांचीं पुस्तकें माझ्या कपाटांत जवळ जवळ असतात. इतकेंच नव्हे, तर त्या दोघांच्या सुंदर ओळी स्वतःशीं गुणगुणतांना मला मोठा आनंद होतो. याचें कारण कवितेची ही अलौकिक शक्तीच आहे.

अलौकिक असें मीं म्हटलें हें कांहीं उगीच नाहीं. शेलेनें कवीची तुलना काळोख्या रात्रीं गाणाऱ्या कोकिळेशीं केली आहे. अंधारांत कुठेंतरी लपून ती गात असते. भोंवतालचा काळोख आपल्या अमृतमधुर सुरांनीं ती उजळून टाकते. तिचे ते गोड बोल ऐकून माणसें मंत्रमुग्ध होतात, जागच्या जागीं थबकतात, हातांतलीं कामें आणि मनांतल्या काळज्या विसरतात. जणूं कांहीं त्या मधुर स्वरांच्या विमानांत बसून तीं एका दिव्य सृष्टींत प्रवेश करतात. त्या सृष्टींत गुलाबाला कांटे नसतात, प्रीतीला क्षणभंगुरतेचा शाप नसतो. तिथें सहसा दीपज्योतीवर काजळी चढत नाहीं. क्वचित् चढली तरी ती आपोआप गळून पडते. तिथल्या निर्मल गंगौघांत माणसांचे आत्मे स्नान करून आपलीं पापें धुऊन टाकण्यांत निमग्न झालेले दिसतात.

अशी जादू त्या कोकिळेच्या गाण्यांत असते. तिच्या स्वरजालांत माणसाचीं मनें गुंतून पडतात. तीं ब्रह्मानंदाचा उपभोग घेतात, पण ती गायिका त्यांना कुठेंच दिसत नाहीं. तिच्या संगीतानें त्यांचीं हृदयें उषेच्या स्पर्शानें उमलणाऱ्या फुलांसारखीं प्रफुल्ल होतात, चंद्रिकेच्या दर्शनानें पाझरणाऱ्या चंद्रकान्त मण्याप्रमाणें स्रवूं लागतात हें दिव्य संगीत कुठून येत आहे हें मात्र त्यांना कळत नाहीं. तें आपल्याला इतकें मृदु कसें बनवीत आहे हेंहि त्यांना उमजत नाहीं.

शेलेनें वर्णन केलेली ही जादूची शक्ति कवितेच्या अंगीं कुठून येते ? उत्तर मोठें कठीण आहे. आईच्या प्रेमाचें, सज्जनाच्या तत्त्वनिष्ठेचें, हंसत स्वतःचें बलिदान करणाऱ्या महात्म्याच्या त्यागाचें पृथक्करण करण्याइतकेंच तें अवघड

आहे. ती संगीताची शक्ति आहे, ती उत्कट भावनेची शक्ति आहे, ती तरल कल्पनेची शक्ति आहे, ती जीवनमूल्यांच्या अंतिम जाणिवेची शक्ति आहे. शरीराच्या पिंजऱ्यांतून रक्तचंबाळ स्थितींत बाहेर पडून जगदात्म्याशीं तन्मय होणाऱ्या मानवी आत्म्याची ती शक्ति आहे. प्रत्येक कवींत या विविध शक्तींचा संगम होतोच असें नाहीं; पण यांपैकीं एक ना एक शक्ति प्रकर्षानें प्रकट झाल्याशिवाय मनुष्य अंशतःसुद्धां कवि होत नाहीं — तो पद्यकारच राहतो. यांतल्या बहुतेक सर्व शक्ति ज्ञानेश्वरांत आणि केशवसुतांत, तुकारामांत आणि तांब्यांत, मुक्तेश्वर-जनाबाईत आणि यशवंत-कुसुमाग्रजांत कमीअधिक प्रमाणांत एकवटलेल्या दिसतात. म्हणून आपण त्यांना थोर कवि मानतों.

या संग्रहांतल्या पहिल्या सहा कवींचाच प्रथम विचार करूं. प्राचीन हें विशेषण आपण त्यांना लावतों. कालदृष्ट्या तें बरोबर आहे. पण त्यांच्या कविता वाचतांना आपण कुठल्या तरी जुनाट काळांत वावरत आहोंत, अपरिचित आकृति पाहात आहोंत, परक्या वातावरणांत फिरत आहोंत, असें क्षणभर तरी कुणाला वाटतें काय ? आपल्या मराठी बोलाची अमृताशीं पैज लावून ती जिंकणारे हे ज्ञानदेव पाहा — या योगिराजाचा हा मातृभाषेचा अभिमान पाहून कुणा मराठी भाषिकाचा ऊर आजहि आनंदानें उचंबळून येणार नाहीं ? ‘ प्रभावी हिचें रूपचापल्य देखा, पडावी फिकी यापुढें अप्सरा ’ हे माधव ज्यूलियनांचे शब्द ज्ञानदेवांच्या सातशें वर्षांपूर्वीच्या उद्गारांचेच विसाव्या शतकांतले प्रतिध्वनि नाहींत काय ?

दळून दळून हात दुखूं लागले आहेत. शरीर गळून गेलें आहे. तें विश्रांतीची वाट पाहात आहे. पण त्याची पर्वा न करतां घोंगडीला पाठ लागतांच डोळे मिटून स्वतःशींच गुणगुणत ब्रह्मानंदांत निमग्न होणारी ही नामयाची दासी पाहा. ‘ माझिये हरिणी । गुंतलीस कोणे रानीं ।। मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ।। ’ म्हणून ती आपल्या आईला — विठ्ठलाला — आळवीत आहे. केवढा गोडवा, केवढी आर्तता, नाजुक भावनेचा आविष्कार करण्याचें केवढें कौशल्य या चिमुकल्या ओळींत प्रकट झालें आहे ! ‘ मुकीं मी पाडस । चुकलें भोवें पाहे वास ’ या कल्पनेवर एकादा प्रतिभावान् चित्रकार किती हृदयंगम चित्र काढूं शकेल !

मात्र जेव्हां जेव्हां जनाबाईची ही विठ्ठलाचा धांवा करणारी मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें तरळते, तेव्हां तेव्हां मला केशवसुतांचीहि आठवण होते. माझें मन

पन्नास वर्षे मागें उडून जातें. ती पाहा खानदेशांतली गिरणा नदी, तिच्या तीरा-वर कुणीतरी तरुण मनुष्य एकटाच बसला आहे. दिवस दिवाळीचे आहेत. सारें भडगांव करंज्या-कडबोळ्यांच्या तयारींत आणि फटाके-चंद्रज्योतींच्या चिंतनांत गढून गेलें आहे. पण हा मनुष्य — हा मास्तर आहे त्या गांवांतला. पण आतां त्याला शाळेची शुद्धि नाहीं. आपण कोण आहों याचीहि आठवण नाहीं — हा वेड्यासारखा स्वतःशींच कांहीं तरी गुणगुणत बसला आहे. ते पाहा त्याचे शब्द ऐकूं येऊं लागले —

*जो गोपाळ गमे प्रभातसमयीं गाई वनीं चारितां*
*वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यास जो अर्पिता*
*जो भासे दिवसां कृषीवल शिरीं होऊनियां लोंबरें*
*तो आतां ऋतु शारदीय बहुधां शेतांतुनी संचरे*

छे! हा वेडा नाहीं. हा शहाण्यांतला शहाणा मनुष्य आहे. रामकृष्णांपासून तों तुमच्याआमच्यापर्यंत सर्वांना सुखवीत आलेल्या सुंदर व सात्त्विक भारतीय शरदृतूचें किती सुंदर आणि समर्पक वर्णन एका श्लोकांत यानें केलें! काव्यदेवतेचा साक्षात्कार झाल्यानंतर आपलें हृद्गत व्यक्त करतांना जनाबाईइतक्याच आर्ततेनें हा कवि म्हणतो —

*आत्माराम सखेद होउनि वदे तो आपणाशीं असें*
*कांहीं सुंदर देखिलें खचित मीं यामाजिं शंका नसे*
*हा! हा! हे जर सर्व भास धरतां येतील मातें तर*
*पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर!*

ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे संतकवि आणि मुक्तेश्वर-रघुनाथांसारखे अभिजात कवि आपल्या कल्पनेच्या, आर्ततेच्या आणि उदात्ततेच्या बळावर स्थलकालांच्या मर्यादा उल्लंघूं शकतात. ते आपल्या कल्पना-भावनांचें समाधान करूं शकतात, हें मान्य करणारे विद्वान या संग्रहांत समाविष्ट केलेल्या मोरोपंत-प्रभाकरांची योग्यता खळखळ न करतां कबूल करतीलच असें मात्र नाहीं. ते म्हणतील, 'हे प्रभाकराचे जुने पोवाडे आतां कशाला उकरून काढतां! सवाई माधवरावांच्या मृत्यूचें दुःख पेशवाईतल्या लोकांना होणें स्वाभाविक होतें. पण आतां पेशवाईच नव्हे तर तिच्यामागून गादीवर आलेली आंग्लाईहि इतिहासजमा झाली. अशा स्थितींत या

शिळ्या, थंड, खारट अश्रूंचें कौतुक कोण करीत बसणार ? जें गरमागरम तें चांगलें हा अन्नाचा न्याय वाङ्मयाला लावणाऱ्या आणि अनेक पूर्वग्रहांनीं पछाडलेल्या या पंडितांना मी उत्तरादाखल एवढेंच सांगेन, 'महात्माजींचा मृत्यु हा सवाई माधवरावांच्या मृत्यूपेक्षां आजच्या माणसाला अधिक हृदयद्रावक वाटला पाहिजे हें उघड आहे. गांधीजींच्या निधनानंतर त्यांच्यावर इतकीं कवनें रचण्यांत आलीं; त्यांतल्या कित्येकांच्या तबकड्या खूप खपल्या म्हणे ! या खपाचें श्रेय कवीला कां गाणाऱ्याला तें त्यांचें त्यांनींच ठरवावें ! पण प्रभाकराच्या 'धन्य वंद्य एकेक पुरुष कल्पवृक्ष पिकलें', 'परंतु मंगळसूत्र गळ्यातिल मुळिं माझें तुटलें । राजहंस पांखरूं हातांतिल दैववशें सुटलें ।', 'जिवंत मी असल्यास उद्यां या नेत्र पुसायाला' अशा अंतःकरणाला पीळ पाडणाऱ्या ओळी गांधी-विलापांत आपल्या कानांवर कितीशा आल्या ?

मोरोपंतांच्या कवितेविषयीं किंचित् सविस्तर विवेचन करणें आवश्यक आहे. त्यांच्या काव्यांतली क्लिष्टता किंवा अन्य प्रकारचे अनेक लहान-मोठे दोष उघड आहेत. त्यांच्या अभिमान्यांनींसुद्धां त्यांच्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करूं नये. या वैगुण्यांत लपविण्यासारखें काय आहे ? जगांत अजून जसा पूर्ण निर्दोष मनुष्य जन्माला यायचा आहे, तशीच सर्वकाळीं सर्व दृष्टींनीं सर्वांचें समाधान करणारी कलाकृति निर्माण व्हायची आहे. वाङ्मयांत काय किंवा जीवनांत काय मनुष्य सर्वस्वीं स्वतःचा शिल्पकार नसतो. स्वभावानें, आनुवंशिकतेनें, परिस्थितीनें, योगायोगानें आणि अशाच त्याच्या शक्तीबाहेरच्या शेंकडों गोष्टींनीं तो अंशतः घडविला जातो. शिवाय माणसाला आपले दोष हे बहुधा दोष वाटत नाहींत. अंतर्मुख होऊन पाहणाऱ्या एकाद्याला ते क्वचित् जाणवले तरी त्याला ते सहसा सुधारतां येत नाहींत. अनेकदां मनुष्य काय किंवा कलावंत काय, आपल्या गुणां-बरोबरच विशिष्ट दोष घेऊन जन्माला येतो. त्याचे गुणदोष हीं जणूं कांहीं जुळीं भावंडेंच असतात. कुणाहि सामान्य व्यक्तीचें, ऐतिहासिक पुरुषाचें किंवा कवि-कलावंताचें आपण मूल्यमापन करतों त्या वेळीं या चिरंतन सत्याकडे दुर्लक्ष करणें हा रसिकतेच्या दृष्टीनें अक्षम्य गुन्हा आहे. अशा मूल्यमापनांत स्थल, काल, परिस्थिति, परंपरा, प्रकृतिधर्म इत्यादि अनेक गोष्टींचा शुद्ध शास्त्रीय दृष्टीनें अगदीं पूर्वग्रहविरहित वृत्तीनें विचार केला तरच आपला निर्णय प्रामाणिक होऊं शकेल.

मोरोपंतांच्या कवित्वशक्तीचा विचार केला तर तिच्या बाजूनेंहि बरेंच बोलण्यासारखें आहे, हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. तिच्यांत भावनेपेक्षां बुद्धीचा विलासच फार आहे म्हणे! नाहीं कोण म्हणतो? पण तसा तो बाण आणि गडकरी यांच्यांतहि आढळतो, म्हणून काय ' कादंबरी ' आणि ' वाग्वैजयंती ' यांच्या निर्मात्यांना कुणीं सामान्य लेखलें आहे? बुद्धिविलासांतून चमत्कृतिजनक कल्पनांचा हव्यास निर्माण होणें अपरिहार्य आहे. बाण, मोरोपंत व गडकरी हे तिघेहि हाच नियम सिद्ध करतात. पण मोरोपंतांची भूमिका कवीपेक्षां कथाकाराची होती, भावनेच्या आविष्कारापेक्षां रंजनयुक्त उपदेश हें त्यांचें ध्येय होतें, हें ध्यानांत घेतलें म्हणजे त्यांच्या या वैशिष्टयाचें मुळींच नवल वाटत नाहीं.

गेल्या शंभर वर्षांत आपलें जीवन आमूलाग्र बदललें, आपल्या आयुष्यविषयक कल्पनांत परलोकाची जागा इहलोकानें घेतली. पूर्वजन्मींचीं पाप-पुण्यें काल्पनिक ठरून त्यांच्याऐवजीं नवें समतेचें तत्त्वज्ञान आलें, मनाचा कोंडमारा करणारे जे विचार-विकार माणसाला पूर्वी बोलून दाखविण्याची लाज किंवा भीति वाटे, त्यांची तो आज वकिली करीत आहे. पूर्वकाळीं माणसांची ऐहिकाविषयींची आसक्तीच नव्हे, तर त्याची प्रामाणिक अनुभूतीहि क्षुद्र मानली जात होती. आतां तीच जीवनाचें प्रेरक-केंद्र ठरत आहे. साहजिकच मानवाचा भावाविष्कार हा अर्वाचीन कवितेचा आत्मा झाला आहे. तो तसा होणेंच उचित आहे. कवितेचा हा नवा आत्मा दीड शतकापूर्वीच्या मोरोपंतांच्या कवितेंत नाहीं म्हणून तिची किंमत कमी लेखण्यांत काय अर्थ आहे? इंग्रजी कवितेच्या इतिहासांत शेले-वर्ड्स्वर्थपूर्वी पोप-ड्रायडन्‌चें युग होऊन गेलें होतें. त्या युगांतल्या जनमनाच्या पार्श्वभूमीवरच इंग्रजी वाङ्मयांत त्यांचें मूल्यमापन केलें जातें. हा न्याय आपण मोरोपंतांनाहि अवश्य लावला पाहिजे. संतकवि घ्या, पंडितकवि पाहा, आधुनिकांतले केशवसुत-गोविंदाग्रज बघा किंवा बोरकर-मर्ढेकरांचा विचार करा. सर्व कवि आपापल्या काळांतल्या ध्येयांची आणि आवडी-निवडींची पूजा कळत नकळत करतात असेंच दिसून येईल आपल्या काळच्या सामाजिक गरजा आणि जनमनाच्या वाङ्मयविषयक कल्पना यांना मान देणें — प्रसंगीं त्यांच्यापुढें मान वांकविणें — यांना प्राप्तच असतें. त्यांच्यांतहि मधून मधून एकादा यशस्वी बंडखोर निर्माण होतो, नाहीं असें नाहीं. पण तो एकादाच — एकादा ज्ञानेश्वर, एकादा केशवसुत!

मोरोपंत असे बंडखोर कवि नव्हते. ते परंपरापूजक होते, वर्तमानकालांत वावरणारे होते, विशिष्ट मर्यादांपलीकडे पाऊल न टाकणारे होते. पण त्यांच्या या मर्यादा लक्षांत घेऊनहि मराठी भाषेवर त्यांनीं केलेले उपकार कोण विसरूं शकेल ? ' विष्णुशास्त्री चिपळूणकर मराठीचे शिवाजी होत ' असें आपण म्हणतों. याच ऐतिहासिक दृष्टीनें मराठी गद्याचा मागोवा घेत घेत मागें गेलें म्हणजे ' मोरोपंत हे मराठीचे शहाजी होते ' असें म्हणण्याचा मोह अगदीं अनावर होतो. त्यांच्या कवितेंतून — हरिदासांनीं समाजांत लोकप्रिय केलेल्या विविध आख्यानांतून — मराठी गद्याची नवी जडणघडण निर्माण झाली. विष्णुशास्त्र्यांच्या लिखाणांत आढळून येणारा मोरोपंतांचा कैवार केवळ रसिकतेच्या पोटीं जन्माला आलेला नाहीं. त्याचा उगम एक प्रकारच्या भक्तींत आहे, दोन साहित्यिकांच्या साधर्म्यांत आहे. चिपळूणकरांनीं आपल्या शैलीला आणलेला डौल, तिच्यांतलें संस्कृतप्राचुर्य व तज्जन्य सौंदर्य, तिच्यांतला मोहक आवेश इत्यादि गोष्टी त्यांच्या व्यक्तित्वाइतक्याच लहानपणीं त्यांच्यावर झालेल्या मोरोपंतांच्या संस्कारांतून निर्माण झालेल्या आहेत. कृष्ण व कर्ण यांचा या संग्रहांतला तेजस्वी संवाद या दृष्टीनें अवश्य अभ्यासिला पाहिजे. कृष्णाच्या प्रत्युत्तरांत आधुनिक वक्त्याचे आणि निबंधकाराचे कितीतरी गुण प्रकट झाले आहेत.

या वाङ्मयीन् गुणांइतकाच या संवादाचा दुसराहि एक विशेष मला फार महत्त्वाचा वाटतो. तो म्हणजे कृष्णानें प्रतिपादन केलेला धर्माधर्मविवेक. पापाचें एकेक माप कर्णाच्या पदरांत टाकीत ' तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ' असा कृष्ण जेव्हां त्याला पुनः पुनः सवाल करतो, तेव्हां वाचकाच्या न्यायबुद्धीला मोठ्या गुदगुल्या होतात. मोरोपंत आधुनिक काळांत जन्माला आले असते तर दास-नेहरूंसारखे बडे वकील झाले असते असें त्याला वाटतें. तापलेल्या लोखंडावर लोहारानें एकामागून एक घातलेल्या घावाप्रमाणें पुनःपुन्हा येणारा तो चरण वाचकांच्या कानांत घुमूं लागतो आणि मग त्याच्या मनांत येतें — जीवनांतल्या अत्यंत अवघड अशा समस्येचें उत्तर किती रोखठोक रीतीनें या एका ओळींत मोरोपंतांनीं दिलें आहे ! केवढें मोठें जीवनविषयक तत्त्वज्ञान या चरणांतून सूचित झालें आहे ! इतरांनीं आपल्याशीं धर्मानें वागावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें प्रथम स्वतः धर्माचा अंगीकार करायला हवा ! जीवन हें युद्ध असलें तरी तें धर्मयुद्ध आहे यावर त्यानें श्रद्धा ठेवायला हवी.

जीवन हें युद्ध आहे हें कोण नाकारील ? जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक माणसाला या संग्रामांत भाग घ्यावाच लागतो; सतत अनेक शत्रूंशीं लढत राहावें लागतें. निसर्ग माणसाचा जेवढा मोठा मित्र आहे तेवढाच तो त्याचा जबरदस्त शत्रूहि आहे. यामुळें त्याच्याशीं तर त्याचा अखंड झगडा सुरू असतो. पण निसर्गापेक्षांहि माणसाचा दुसरा एक मोठा शत्रु आहे. त्याची गांठ घेण्याकरितां त्याला घर सोडून दूर जावें लागत नाहीं. मनुष्य घरांतल्या आरशापुढें जाऊन उभा राहिला, कीं तो त्याला दिसतो. हा शत्रु म्हणजे माणसाचें शरीर होय.

एकाद्याच्या मनांत येईल – शरीराच्या द्वारेंच आपण मिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतों, चवदार पेयें पितों, सुगंधी फुलें हुंगतों, गोड गाणीं ऐकतों, फार दिवसांनीं भेटलेल्या बाळमित्राला कडकडून मिठी मारतों, शेक्सपीअरचें हॅम्लेट किंवा कालिदासाचें शाकुंतल पाहतों आणि प्राणनाशक रोगांचा प्रतिकार करणारीं नवीं नवीं परिणामकारक औषधें शोधून काढतों. असें असून हें शरीर आपलें शत्रुत्व करतें ? छे ! असें म्हणणारा मनुष्य वेडा असला पाहिजे !

मी शरीराला कोणत्याहि दृष्टीनें कमी लेखीत नाहीं. परमार्थाची ओढ लागलेल्या संताप्रमाणें त्याची निंदा मी कधींच करणार नाहीं. माणुसकीची मर्यादा न ओलांडणारे सर्व शरीरधर्म मला पवित्र वाटतात. आत्म्याचें भलतेंच स्तोम माजवून शरीराला क्षुद्र लेखणें किंवा त्याच्या नैसर्गिक भुकांचा कोंडमारा करून आपण उदात्त होत आहोंत असा सोयिस्कर समज करून घेणें मला जमत नाहीं. पण शरीर लहान मुलांप्रमाणें फाजील लाडांनीं बिघडतें हें जीवनांतलें अत्यंत कटु सत्य मी कधींहि अमान्य करणार नाहीं. शरीर हा निसर्गाचाच एक भाग आहे. त्यामुळें त्याच्या सर्व सुखसंवेदना स्वाभाविक व म्हणूनच वैयक्तिक असतात; त्या सामाजिक बनूं शकत नाहींत. ज्या इंद्रियांच्या द्वारें तें अनिर्बंध सुख संपादन करूं शकतें, त्याचें तें नकळत गुलाम बनत जातें. अशा दुर्बळ शरीराच्या हातांत वासनांचे लगाम फार वेळ राहूं शकत नाहींत. मग घोडे सैरावैरा उधळतात आणि त्या बेफामपणानें धांवणाऱ्या रथाखालीं जीवनांतल्या असंख्य लहानमोठ्या कोमल आणि मंगल गोष्टींचा चोळामोळा होऊन जातो.

जगांत केवळ एकच मनुष्य असता तर शरीराच्या नैसर्गिक स्वच्छंदीपणावर नियंत्रण घालण्याचें कांहींच कारण पडलें नसतें. वृक्षवेलींप्रमाणें, पशुपक्ष्यांप्रमाणें, त्या माणसानें आपलें जीवन कंठिलें असतें.

धर्माचा — शरीराच्या स्वाभाविक प्रेरणांपलीकडे पाहण्याचा, त्या संयमित किंवा नियंत्रित करण्याचा — प्रश्न उपस्थित होतो तो जेव्हां एका मनुष्याचा दुसऱ्याशीं संबंध येतो तेव्हां. जों जों संबंधित माणसांची संख्या वाढूं लागते, जात, धर्म, वर्ग, राष्ट्र, समाज इत्यादि समूहांत माणसांच्या वांटण्या होऊं लागतात, तों तों मानवी संबंध अधिक गुंतागुंतीचे होत जातात. त्यांतून पदोपदीं चित्र-विचित्र संघर्ष निर्माण होतात. या संघर्षांना पुढें विकृत, संमिश्र व राक्षसी स्वरूप येत जातें. एका वेळीं एका बाणानें एकच मनुष्य मारणारे हात आज एका ॲटम बॉंबनें क्षणार्धांत लाखों लोकांचे विलक्षण क्रूरतेनें प्राण घेऊं शकतात. अशा स्थितींत माणसामाणसाचे संबंध निश्चित करणारा, प्रत्येकाच्या शारीरिक भुका मान्य करूनहि त्या अनियंत्रित राहिल्यामुळें होणारा अनर्थ टाळूं शकणारा, सूक्ष्म पण विश्वव्यापी आणि जितका अंतर्मुख तितकाच बहिर्मुख असा मानवधर्म निर्माण होण्याची आवश्यकता उत्पन्न होते. कृष्ण आणि कर्ण यांच्या संवादांत मोरोपंतांनीं हाच मानवधर्माचा प्रश्न उपस्थित केला आहे. तेथें त्याचें स्वरूप स्थूल आहे. कारण तत्कालीन मानवी संघर्ष आजच्याइतके गुंतागुंतीचे झाले नव्हते. पण मोरोपंतांकडून आपण केशवसुतांकडे वळलों, कीं या सनातन आणि दिवसेंदिवस अधिक बिकट होत जाणाऱ्या समस्येचें नव्या युगाला शोभेल असें उत्तर आपल्याला मिळतें. ‘ तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ’ ह्या चरणाहूनहि अधिक स्पष्ट, तीव्र आणि तेजस्वी वाटणाऱ्या वाणीनें केशवसुत तुतारी फुंकूं लागतात —

*‘ नीतीचें पद जेथें न ढळे*
*धर्म होतसे तेथेंच स्थिर ’*

*‘ वैर तयांना, जे गरिबी शिकवितात बालांस ’*

*‘ ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा*
*तेच पतित कीं जे आंखडती प्रदेश साकल्याचा ’*

*‘ अडवतील जर देव तरी*
*झगडूं त्यांच्याशीं निकरीं*
*हार न खाऊं रतीभरी*
*देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या ’*

*‘गतशतकांचीं पापें घोरें—*
*क्षालयाला तुमचीं रुधिरें—*
*पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर !’*

या मानवधर्माचा शोध हा केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या सर्व प्रमुख आधुनिक कवींचा एक महत्त्वाचा काव्यविषय आहे. इंग्रजी अमदानी सुरू झाल्यावर काळ बदलला, परिस्थिति पालटली, जीवनांतल्या सुखदुःखांच्या समस्यांनीं अत्यंत भिन्न व नवीं रूपें धारण केलीं, सामान्य माणसाची दृष्टि पारलौकिकाकडून ऐहिकाकडे वळली. या सर्वांचा परिणाम भारतीय जीवनावर आणि अर्थातच त्याच्या साहित्यावर अतिशय झाला. टिळक-केशवसुतांपासून कान्त-बोरकरांपर्यंत सर्व कवींच्या निर्मितींत महापुराच्या वेगानें आणि स्वरूपानें धांवणाऱ्या या संक्रमण-काळाचीं स्पष्ट-अस्पष्ट प्रतिबिंबें पडलीं आहेत. मराठी कविता ओवी अभंगांकडून उद्धव व पादाकुलक यांच्याकडे वळली आणि तेथून पुढें मुक्तछंदापर्यंत येऊन पोंचली, किंवा पूर्वी काव्यांत ती जे शब्द वापरूं शकत नव्हती त्यांचा आतां बिन-दिक्कत उपयोग करूं लागली, या गोष्टींना महत्त्व नाहीं असें नाहीं. पण तिच्या वेषभूषेंत आणि अलंकारांत कालमानानुसार झालेल्या बदलांपेक्षां तिच्या वृत्तींत पडलेला फरक, तिच्या कक्षांचा झालेला विकास, तिच्या आत्म्यानें व्यक्त केलेलें नवें तेज, या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. जुन्यांतलें सौंदर्य आधुनिक काळांतहि तिनें कसोशीनें कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बी, चंद्रशेखर, बालकवि आणि बोरकर यांच्या संग्रहांतल्या कविता वाचणारांना मुक्तेश्वर आणि रघुनाथपंडित यांच्याच नादमधुर व शब्दसुंदर रसवंतीच्या सहवासांत आपण वावरत आहों असा भास होईल. या आधुनिक कवींच्या कवितेच्या पायांतल्या पैंजणांची रुमझुम आणि तिच्या वेषभूषेंतली रंगसंगति प्राचीन कवींच्या काव्यापेक्षां कोणत्याहि दृष्टीनें उणी नाहीं. उलट, अनुभूतींच्या कक्षा वाढल्यामुळें, मनाच्या सर्व वेदना आणि संवेदना प्रामाणिकपणानें सांगण्याची प्रथा पडल्यामुळें, आधुनिक कवितेला अर्थ, कल्पना, भावना, चित्रण आणि चिंतन यांचें एक निराळ्या प्रकारचें सौंदर्य लाभलें आहे. ती सामान्य मनुष्याच्या अंतःकरणाच्या जवळ आली आहे; दैनंदिन जीवनांतलें उपेक्षित राहिलेलें सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व परोपरीनें प्रकट करून दाखविण्याचा ती प्रयत्न करीत आहे.

धर्माचा — शरीराच्या स्वाभाविक प्रेरणांपलीकडे पाहण्याचा, त्या संयमित किंवा नियंत्रित करण्याचा — प्रश्न उपस्थित होतो तो जेव्हां एका मनुष्याचा दुसऱ्याशीं संबंध येतो तेव्हां. जों जों संबंधित माणसांची संख्या वाढूं लागते, जात, धर्म, वर्ग, राष्ट्र, समाज इत्यादि समूहांत माणसांच्या वांटण्या होऊं लागतात, तों तों मानवी संबंध अधिक गुंतागुंतीचे होत जातात. त्यांतून पदोपदीं चित्र-विचित्र संघर्ष निर्माण होतात. या संघर्षांना पुढें विकृत, संमिश्र व राक्षसी स्वरूप येत जातें. एका वेळीं एका बाणानें एकच मनुष्य मारणारे हात आज एका ॲटम बॉंबनें क्षणार्धांत लाखों लोकांचे विलक्षण क्रूरतेनें प्राण घेऊं शकतात. अशा स्थितींत माणसामाणसाचे संबंध निश्चित करणारा, प्रत्येकाच्या शारीरिक भुका मान्य करूनहि त्या अनियंत्रित राहिल्यामुळें होणारा अनर्थ टाळूं शकणारा, सूक्ष्म पण विश्वव्यापी आणि जितका अंतर्मुख तितकाच बहिर्मुख असा मानवधर्म निर्माण होण्याची आवश्यकता उत्पन्न होते. कृष्ण आणि कर्ण यांच्या संवादांत मोरोपंतांनीं हाच मानवधर्माचा प्रश्न उपस्थित केला आहे. तेथें त्याचें स्वरूप स्थूल आहे. कारण तत्कालीन मानवी संघर्ष आजच्याइतके गुंतागुंतीचे झाले नव्हते. पण मोरोपंतांकडून आपण केशवसुतांकडे वळलों, कीं या सनातन आणि दिवसेंदिवस अधिक बिकट होत जाणाऱ्या समस्येचें नव्या युगाला शोभेल असें उत्तर आपल्याला मिळतें. ‘ तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ’ ह्या चरणाहूनहि अधिक स्पष्ट, तीव्र आणि तेजस्वी वाटणाऱ्या वाणीनें केशवसुत तुतारी फुंकूं लागतात —

*‘ नीतीचें पद जेथें न ढळे*
*धर्म होतसे तेथेंच स्थिर ’*

*‘ वैर तयांना, जे गरिबी शिकवितात बालांस ’*

*‘ ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा*
*तेच पतित कीं जे आंखडती प्रदेश साकल्याचा ’*

*‘ अडवतील जर देव तरी*
*झगडूं त्यांच्याशीं निकरीं*
*हार न खाऊं रतीभरी*
*देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या ’*

*‘ गतशतकांचीं पापें घोरें—*
*क्षालायाला तुमचीं रुधिरें—*
*पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर ! ’*

या मानवधर्माचा शोध हा केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या सर्व प्रमुख आधुनिक कवींचा एक महत्त्वाचा काव्यविषय आहे. इंग्रजी अमदानी सुरू झाल्यावर काळ बदलला, परिस्थिति पालटली, जीवनांतल्या सुखदुःखांच्या समस्यांनीं अत्यंत भिन्न व नवीं रूपें धारण केलीं, सामान्य माणसाची दृष्टि पारलौकिकाकडून ऐहिकाकडे वळली. या सर्वांचा परिणाम भारतीय जीवनावर आणि अर्थात्च त्याच्या साहित्यावर अतिशय झाला. टिळक-केशवसुतांपासून कान्त-बोरकरांपर्यंत सर्व कवींच्या निर्मितींत महापुराच्या वेगानें आणि स्वरूपानें धांवणाऱ्या या संक्रमण-काळाचीं स्पष्ट-अस्पष्ट प्रतिबिंबें पडलीं आहेत. मराठी कविता ओवी अभंगांकडून उद्धव व पादाकुलक यांच्याकडे वळली आणि तेथून पुढें मुक्तछंदापर्यंत येऊन पोंचली, किंवा पूर्वी काव्यांत ती जे शब्द वापरूं शकत नव्हती त्यांचा आतां बिन-दिक्कत उपयोग करूं लागली, या गोष्टींना महत्त्व नाहीं असें नाहीं. पण तिच्या वेषभूषेंत आणि अलंकारांत कालमानानुसार झालेल्या बदलांपेक्षां तिच्या वृत्तींत पडलेला फरक, तिच्या कक्षांचा झालेला विकास, तिच्या आत्म्यानें व्यक्त केलेलें नवें तेज, या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. जुन्यांतलें सौंदर्य आधुनिक काळांतहि तिनें कसोशीनें कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बी, चंद्रशेखर, बालकवि आणि बोरकर यांच्या संग्रहांतल्या कविता वाचणारांना मुक्तेश्वर आणि रघुनाथपंडित यांच्याच नादमधुर व शब्दसुंदर रसवंतीच्या सहवासांत आपण वावरत आहों असा भास होईल. या आधुनिक कवींच्या कवितेच्या पायांतल्या पैंजणांची रुमझुम आणि तिच्या वेषभूषेंतली रंगसंगति प्राचीन कवींच्या काव्यापेक्षां कोणत्याहि दृष्टीनें उणी नाहीं. उलट, अनुभूतींच्या कक्षा वाढल्यामुळें, मनाच्या सर्व वेदना आणि संवेदना प्रामाणिकपणानें सांगण्याची प्रथा पडल्यामुळें, आधुनिक कवितेला अर्थ, कल्पना, भावना, चित्रण आणि चिंतन यांचें एक निराळ्या प्रकारचें सौंदर्य लाभलें आहे. ती सामान्य मनुष्याच्या अंतःकरणाच्या जवळ आली आहे; दैनंदिन जीवनांतलें उपेक्षित राहिलेलें सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व परोपरीनें प्रकट करून दाखविण्याचा ती प्रयत्न करीत आहे.

जुन्या साहित्यशास्त्रांतल्या व्याख्यांच्या चौकटींत बसणारे महाकवि आधुनिक कवींत नसतील. विपुल, पल्लेदार अथवा लांबलचक रचना आजच्या कवींच्या हातून निर्माण होत नसेल. पण जगांतल्या आणि जीवनांतल्या हरतऱ्हेच्या सुरूपतेवर – आणि म्हणूनच हरतऱ्हेच्या कुरूपतेवरहि – पूर्वकाळीं घातलीं गेलेलीं कृत्रिम आवरणें नवी कविता दूर करीत आहे. सामान्य मनुष्याच्या उद्यांच्या आशा-आकांक्षा ती आज आपल्या अंतःकरणांत नाजुकपणानें फुलवीत आहे. आयुष्याच्या प्याल्यांतल्या विषमिश्रित अमृताचे घुटके घेऊन त्याची चव ती लोकांना सांगत आहे, धुमसून राख होऊं पाहणारीं जीवनमूल्यें आपल्या उत्कट आणि सौंदर्योपासक मनोवृत्तीच्या बळावर जिवंत व ज्वलंत करण्याकरितां ती धडपडत आहे. नव्या कवींत संतांचें वैराग्य नाहीं; पण त्यांचा उदार दृष्टिकोन आहे. त्यांच्यांत प्राचीन कवींचें परंपरागत पांडित्य नाहीं; पण पूर्व कवींना अपरिचित असलेला सामान्य मानवाविषयींचा ऐहिक जिव्हाळा आहे.

कवितेचें हें नवें स्वरूप आजहि किती विविधतेनें सजून आपल्यापुढें येत आहे याची पूर्ण कल्पना येण्याकरितां ‘ दैवतें मायतात ’ व ‘ झंझावात ’ आणि ‘ जलद भरुनि आले ’ व ‘ पितात सारे गोड हिंवाळा ’ या विद्यमान कवींच्या कवितांच्या दोन जोड्या पाहाव्या. यशवन्त व इंदिरा सन्त यांच्या कविता सर्वस्वीं कौटुंबिक आहेत. एका दृष्टीनें ते वैयक्तिक अनुभव आहेत. पण घराच्या चार भिंतींनींच पाहिलेल्या कृतज्ञतेच्या आणि विरहार्ततेच्या अश्रूंत आपल्या तरल कल्पकतेनें आणि गाढ भावनाशीलतेनें या दोन कवींनीं किती सर्वस्पर्शी उत्कटता निर्माण केली आहे. यशवन्तांच्या कवितेंतली जीवनाची अनुभूति अत्यंत सूक्ष्म, आर्त आणि उदात्त आहे. एका नैसर्गिक कटु सत्याला आपल्या भावसघनतेनें आणि चिंतनशीलतेनें कवीनें इथें किती रोचक रूप दिलें आहे ! आईबापांनीं आपल्यासाठीं सोसलेल्या हालअपेष्टांची मुलांना पूर्ववयांत कल्पना येऊं नये, उत्तरवयांत स्वतः आईबाप झाल्यावर तिची तीव्रतेनें जाणीव व्हावी, पण त्या वेळीं ज्यांचे पाय आंसवांनीं धुण्याची इच्छा मनांत निर्माण होते तीं मातापितरेंच जगांत असूं नयेत ! किती सूक्ष्म, पण किती दारुण दुःख आहे हें ! मानवी जीवन हें केवढें करुण महाकाव्य आहे याची साक्ष यशवन्तांच्यासारखे कवीच अशा कवितांच्या द्वारें आपल्याला पटवूं शकतात.

इंदिराबाईंच्या कवितेंत जीवनांतला विशाल विरोध दर्शविणारी किंवा त्यांत खोल बुडी मारून तळाशीं असलेलीं मौक्तिकें वेंचून आणणारी चिंतनशीलता नाहीं. पण त्यांची अनुभूतिसुद्धां अत्यंत दाहक आहे. निसर्ग आणि मनुष्य यांचा आंतरिक नात्याचा मोठ्या कुशलतेनें उपयोग करून या कवितेंतील आर्तता त्यांनीं वृद्धिंगत केली आहे. त्यांच्या कवितेंत झंझावाताचें आणि त्याच्या खांद्यावर बसून क्रीडा करण्याकरितां पृथ्वीवर उतरणाऱ्या पर्जन्याचें वर्णन आहे. पण या कवितेच्या पुनर्वाचनाच्या वेळीं ओळीओळींतून मनाला बसणारे चटके कांहीं त्या पावसानें कमी होत नाहींत; उलट त्याच्या पार्श्वभूमीवर ते अधिकच दाहक वाटूं लागतात.

'जलद भरुनि आले' ही बोरकरांची कविता आधुनिक कविमनाच्या एका नव्या पैलूवर प्रकाश पाडते. प्राचीन कवि कल्पक होते, सृष्टिसौंदर्याकडे आदरानें आणि विस्मयानें पाहूं शकत होते. पण उपदेश करणारी माता किंवा चित्र-रेखनाकरितां समोर उभी केलेली सुंदर तरुणी या दोनच दृष्टींनीं त्यांनीं तिच्याकडे पाहिलें.

'फुटे तरुवर उष्णकाळमासीं। जीवन तयासी कोण घाली?' आणि 'कीं पृथ्वीखंड त्या शाळुंखा। अनेकपर्यंत शिवपिंडिका। इंद्रें मांडिलें अभिषेका। गगनपात्रीं बहुधारा॥' या सृष्टीशीं येणारा माणसांचा संबंध वर्णन करणाऱ्या त्यांच्या प्रमुख पद्धति होत. सृष्टि त्यांची मैत्रीण होऊं शकली नाहीं. ही नवी दृष्टि बोरकरांच्या आणि मर्ढेकरांच्या कवितांत आढळते. 'धूसर हो क्षितिज त्वरित। ढोर पथीं अचल चकित। तृण विसरुनि जवळिल ते खिळवि गगनिं डोळे।' हें बोरकरांचें जितकें वास्तव तितकेंच रेखीव चित्रण, आणि 'डोकीं अल्गद घरें उचलती। काळोखाच्या उशीवरूनी।' व 'संथ बिलंदर लाटांमधुनी। सागरपक्षी सूर्य वेंचिती!' हें मर्ढेकरांचें जेवढें कल्पक तेवढेंच वास्तव वर्णन कुणाला मुग्ध करणार नाहीं?

● ● ●

कविता हें सर्व ज्ञानपुष्पांचें अत्तर आहे, अशा अर्थाचे उद्गार वर्ड्स्वर्थनें काढले आहेत. या संग्रहांतील प्रत्येक कविता वाचतांना अभ्यासकांना कमीअधिक प्रमाणांत या उक्तीचा प्रत्यय येईलच. पण या अत्तरांत नुसता मधुर सुगंध नसतो,

त्यांतून जीवन उजळविणारे अग्निकणहि बाहेर पडतात हें पाहून त्यांना सानंद आश्चर्य वाटेल. आधुनिक कवि जीवनांतल्या सर्व सूक्ष्म आणि सुप्त सौंदर्याची आपल्याला सतत जाणीव करून देत असतो हें खरें आहे. पण आजच्या जगांत त्या सौंदर्याची पूजा होऊं शकत नाहीं, हें कटु सत्य तो आपल्यापासून लपवून ठेवूं इच्छीत नाहीं. केवळ सौंदर्याची निष्क्रिय उपासना हा आजउद्यांच्या मानवाचा धर्म होऊं शकत नाहीं. त्या सौंदर्याला सामर्थ्याची आणि साधुत्वाची जोड दिली पाहिजे हें तो आपल्याला परोपरीनें सांगतो. केशवसुतांच्या ' तुतारी 'पासून कुसुमाग्रजांच्या ' कोलंबसाचें गर्वगीत ' या कवितेपर्यंत या संग्रहांतल्या आठ-दहा कविता तरी अशा आहेत, कीं ज्यांत आधुनिक मराठी कवितेचा हा झुंजार, सामाजिक दृष्टिकोन प्रभावीपणानें व्यक्त झाला आहे. कविमनाचा कोमलपणा आणि त्याचें वीरत्व हीं दोन्ही अशा कवितांत उत्कृष्ट रीतीनें प्रतिबिंबित झालेलीं दिसतात. अबिसीनियावर इटलीनें केलेलें अन्याय्य आक्रमण हूं कीं चूं न करतां उघड्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या ढोंगी पाश्चात्य राष्ट्रांचा ' पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास ' या कवितेंत माधव ज्यूलियनांनीं किती रोकड्या शब्दांत समाचार घेतला आहे ! मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत कपाळीं बंदिवास आलेला पाहून ' आतां तुझ्या कोमल मूर्तीचं दर्शन मला नको, तुझ्या उग्र स्वरूपाचीच पूजा मला करूं दे ', ही विनंति कवितेला सावरकरांनीं किती ओजस्वीपणानें केली आहे ! बिळांत लपणाऱ्या उंदराप्रमाणें संकुचित विचारांच्या, कल्पनांच्या आणि आकांक्षांच्या खुराड्यांत संसार थाटणारांना कोलंबसाच्या तोंडून कुसुमाग्रजांनीं केवढा स्फूर्तिदायक संदेश दिला आहे ! ' काम आणि आराम 'मध्यें एकीकडे भक्ष्य-भक्षक न्यायाची षोडशोपचारांनीं पूजा करीत असतांना दुसरीकडे आपल्या बुद्धिबलानें जगाच्या सुखांत भर घालूं इच्छिणाऱ्या आजच्या द्विधा झालेल्या मानवाचें सत्यस्वरूप अनिलांनीं किती कौशल्यानें चित्रित केलें आहे !

● ● ●

झाडांना जशीं पानें येतात तशी कवीला कविता सुचायला हवी, असें कीट्स म्हणत असे. अशी जीवनांतून स्फुरलेली आणि नव्या जीवनाला स्फूर्ति देणारी कविता या संग्रहांत निश्चित आहे. या काव्यवाटिकेंत ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरां-पर्यंत विविध वृक्ष डौलानें उभे आहेत. त्यांची उंची, फांद्या, पानें, फुलें आणि

फळें यांच्यांत अनेक साम्य-विरोध आढळतील; पण ते तादृश महत्त्वाचे नाहींत. आजचें मानवी जीवन रखरखणाऱ्या उन्हांतून अनवाणी चालणाऱ्या माणसा-प्रमाणें त्याच त्या जुन्यापुराण्या कंटाळवाण्या रस्त्यानें चाललें आहे. त्या जीवनाला या वाटिकेंतल्या रम्य, शीतल छायेंत क्षणभर विसांवा मिळेल. एवढेंच नव्हे, तर उपवन आणि तपोवन यांचा संगम साधणाऱ्या या भूमींत विश्रांति घेतां घेतां तें नव्या जीवनधर्माची पाऊलवाट चोखाळण्याचीं स्वप्नें पाहूं लागेल.

*शाहूपुरी, कोल्हापूर*
*१५-१०-४६*

*वि. स. खांडेकर*

१

## अमृतातेंही पैजेसीं जींके

### परिचय

‘ ज्ञानदेवें रचिला पाया ’ ही बहिणाबाईची उक्ति भागवतधर्मोइतकीच मराठी वाङ्मयाच्या बाबतींतहि सार्थ व समुचित आहे. काव्याचें सौंदर्य, तत्त्वज्ञानाचें सामर्थ्य आणि अध्यात्माचें साधुत्व यांचा ज्ञानेश्वरींत संगम झाला आहे. ती मराठी वाङ्मयाची गंगोत्री आहे. सात शतकें होत आलीं तरी अपूर्व कल्पकतेनें नटलेली आणि आध्यात्मिक अनुभूतीनें ओथंबलेली ज्ञानदेवांची वाणी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत, देवळारावळांत आणि कानाकोपऱ्यांत प्रतिध्वनित होत राहिली आहे. ती अद्यापहि पंडितांच्या बुद्धीला खाद्य पुरवीत आहे; भाविकांच्या तप्त हृदयाला समाधान देत आहे. पांगारकरांचे खालील उद्गार ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचें अपूर्वत्व उत्कृष्ट रीतीनें व्यक्त करतात —‘ महाराष्ट्रांत मराठ्यांचीं राज्यें झालीं आणि गेलीं. पुन्हा होतील आणि जातील. पण लक्षावधि लोकांच्या हृदयांत आत्मसुखाची शीतल छाया पाडणारा ज्ञानेश्वरीसारखा देदीप्यमान हिरा हें महाराष्ट्राचें आणि मराठी भाषेचें चिरकालीनचें परम ऐश्वर्य आहे. त्यांत अंतरंगाचा पूर्ण प्रसाद आहे व वाक्चातुर्याची सीमा आहे. जी जी ओवी समोर येते ती ती द्राक्षपाक. धर्म, तत्त्वज्ञान, कवित्व, साहित्य, साऱ्यांची एक मूस . भेदाची भावना कोठेंच नाहीं. ’

● ● ●

तो शांतू चि अभिनवैल । ते परियसां मऱ्हाटे बोल ।
जे समुद्राहीहूनि खोल । अर्थभरित ॥ १ ॥
जैसें बिंब तरि बचकेयेवडे । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ।
शब्दाची व्याप्ति तेणें पाडे । अनुभवांवीं ॥ २ ॥
ना तरि कामितेयाचिया इच्छा । फळे कल्पवृक्षु जैसा ।
बोलु व्यापकु होये तैसा । परि अवधान देयावें ॥ ३ ॥

हें असो कायें म्हणावें । सर्वज्ञ जाणती स्वभावें ।
तऱ्हीं नीकेनि चित्त देयावें । हे विनती माझी ॥ ४ ॥

जें साहित्य आणि शांती । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणयुवती । आणि पतिव्रता ॥ ५ ॥

आदिं च्चि साखर आवडे । आणि ते च्चि जरि ओखधा जोडे ।
तरि न सेवावी कां कोडें । नांवा नांवा ॥ ६ ॥

साहाजें मलयानीळु सुंदु । तेया ही होये अमृताचा स्वादु ।
आणि तेथ चि जोडे नादु । दैवं गल्या ॥ ७ ॥

तरि स्पर्शें सर्वांग जीववी । स्वादें जीभेतें नाचवी ।
तेवि च्चि कानाकरवि म्हणवी । बापु माझा ॥ ८ ॥

तैसें कथचें इयें आइकणें । एक श्रवणासि होये पारणें ।
आणि संसारदुःखा मोकलवणें । विकृतीविण ॥ ९ ॥

जरि मैत्रें चि वेरी मरे । तरि वायां कां बांधावें कटारे ।
रोगु जाये दूधें ओंगरें । तरि नींबु कां पियावा ॥ १० ॥

तैसा मनाचा मारु न करितां । इंद्रियां दुःख नेंदिता ।
एथ मोक्षु असे आइकतां । श्रवणांमाझि ॥ ११ ॥

• • •

माझा मऱ्हाटा चि बोलु कवतिकें । परि अमृतातेंही पैजेंसीं जींके ।
ऐसीं अक्षरें चि रसिकें । मेळवीन ॥ १ ॥

जिये कोवलिकेचेनि पाडें । दीसाति नादिंचे तरंग थोकडे ।
वधें परिमलाचें बीक मोडे । जेयाचेनि ॥ २ ॥

आइकां रसालपणाचेया लोभा । किं श्रवणिं चि होयि जीभा ।
वालें इंद्रियां लागे कलमा । येकमेकां ॥ ३ ॥

साहाजें शब्दु तरि विषो श्रवणाचा ।
परि रसना म्हणे कां रसु चि हा आमचा ।
घ्राणासि भावो जाये परिमलाचा ।
हा तो चि कां होईल ॥ ४ ॥

नवल बोलतिये रेखेची वाहाणी । दावितां डोलेयां हीं पुरों लागे आणि ।
ते म्हणाति उघडिली कां खाणि । रूपांची हे ॥ ५ ॥

जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मन चि धांवे बाहिरें ।
बोलुभुजां हीं आशे भरे । आलिंगावेया ॥ ६ ॥

ऐसां इंद्रियें आपुलालां भाविं । झोंबता परि तो सरिसेपणें चि बुझावी ।
जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ॥ ७ ॥

तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाठेयां भावाज्ञां फावति गुण । चिंतामणिचे ॥ ८ ॥

हें असो तेयां बोलाचीं ताटें भलीं । वरि कैवल्यरसें ओगरलीं ।
हे प्रतिपति मियां केली । निष्कामासि ॥ ९ ॥

आतां आत्मप्रभा नीचनवी । ते चि करूनि ठाणा दिवी ।
जो इंद्रियातें चोरुनु जेवी । तेयासी च फावे ॥ १० ॥

एथ श्रवणाचेनि पांगें । विण श्रोतेयां होआवें लागे ।
हें मनाचेनी चि आंगें । भोगिजे गा ॥ ११ ॥

आहाच बोलाची वालीप फेडिजे । आणि ब्रह्माचेया चि आंगा घडिजे ।
मग सुखेंसीं सुखाडिजे । तेयामाझि ॥ १२ ॥

ऐसें हळुवारपण जरि येईल । तरि चि हें उपेगा जाईल ।
यऱ्हविं आघवी गोठि होईल । मूकां बोलेतेयाची ॥ १३ ॥

परि तें असो आतां आघवें । न लगे श्रोतेयां कडसावें ।
जें एथ अधिकारिये स्वभावें । पूर्णकाम ॥ १४ ॥

जेहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरवंडी ।
ते वांचौनु एथिची गोडी । नेणति आणिक ॥ १५ ॥

जैसा वायसीं चंद्रु नोलखिजे । तैसा प्रकृतीं ग्रंथु हा नेणिजे ।
आणि तो हिमांशु जेविं खाजें । चकोरांचें ॥ १६ ॥

तैसा सज्ञानांसि तरि हा ठाउ । आणि अज्ञानांसि आन गाउ ।
म्हणौनि बोलावेया विषो पाहा हो । विशेषें नाहिं ॥ १७ ॥

ज्ञानेश्वर

• • •

## अभ्यास

१ ज्ञानदेवांच्या खालील ओव्यांचें रसग्रहण करा —

उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेंवि ॥

संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें विनटला
व्याधाहातौनि सुटला । विहंगम जैसा ॥

माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका
तैसा जो सकळिका । भूतांसम ॥

जो निंदेतें निघे । स्तुति न श्लाघे
आकाशा न लगे । लेपु जैसा ॥

२ 'ज्ञानदेवांची शिकवण' ह्या विषयावर चाळीस ओळींचा निबंध लिहा.

३ 'मनुष्यजात सकळ । हे स्वभावता भजनशीळ ।'
हें ज्ञानदेवांचें म्हणणें तुम्हांला पटतें काय ?

४ ' हें गीता नाम विख्यात
सर्व वाङ्मयाचें मथित
आत्मा जेणें हस्तगत
रत्न होय. '
असें ज्ञानदेव गीतेविषयीं कां म्हणतात ?

• • •

# २

## सात अभंग

### परिचय

जनाबाई ह्या ज्ञानदेवांच्या समकालीन कवयित्री. ज्ञानेश्वरांना उद्देशून ' ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।। मरोनिया जावें । बा माझ्या पोटा यावें । ऐसें करीं माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।। जावें ओंवाळुनि । जन्मोजन्मीं दासी जनी ।। ' असे जनाबाईनीं उद्गार काढले आहेत. पण त्यांचें सारें आयुष्य नामदेवांच्या घरीं दासी म्हणून गेलें. साहजिकच जनाबाईच्या लिहिण्यावर नामदेवांचे संस्कार अधिक झालेले दिसून येतात. या कवयित्रीची अभंगरचना मोठी प्रसन्न व प्रेमळ आहे. त्या अभंगांतली आर्तता मनाला चटका लावल्या-वांचून राहात नाहीं. प्राचीन काळांतल्या एका स्त्रीचें कविमन या अभंगांत अधूनमधून प्रतिबिंबित झालेलें दिसतें.

• • •

स्त्रीजन्म म्हणवुनि न व्हावें उदास ।
साधुसंतां ऐसें केलें जनीं ।। १ ।।

संतांचे घरची दासी मी अंकिली ।
विठोबानें दिली प्रेमकळा ॥ २ ॥

विदूर सात्त्विक माझिये कुळींचा ।
अंगिकार त्याचा केला देवें ॥ ३ ॥

न विचारितां कुळ गणिका उद्धरिली ।
नामें सरती[1] केली तिहीं लोकीं ॥ ४ ॥

ऋषींचीं कुळें उच्चारिलीं जेणें ।
स्वर्गावरी तेणें वस्ती केली ॥ ५ ॥

नामयाची जनी भक्तीतें सादर ।
माझें तें साचार विटेवरी ॥ ६ ॥

● ● ●

सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें ।
ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा विठ्ठला ॥ १ ॥

जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे ।
लावुनी पांची बोटें गे तूं येरे बा विठ्ठला ॥ २ ॥

सासु आणि सासरा दीर तो तिसरा ।
ओंव्या गाऊं भ्रतारा तूं येरे बा विठ्ठला ॥ ३ ॥

बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी ।
ओंव्या गाऊं बसूनी तूं येरे बा विठ्ठला ॥ ४ ॥

प्रपंच दळण दळिलें पीठ भरिलें ।
सासुपुढें ठेविलें तूं येरे बा विठ्ठला ॥ ५ ॥

सत्त्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरिलें ।
पाप तें उतूं गेलें तूं येरे बा विठ्ठला ॥ ६ ॥

---

१ मान्य.

जनी जातें गाइल कीर्त राहिल ।
थोडासा लाभ होईल तूं येरे बा विठ्ठला ॥ ७ ॥

● ● ●

परधन कामिनी समूळ नाणीं मना ।
नाहीं हे वासना माया केली ॥ १ ॥

तृष्णा हे अधर्म ग व्हावी मजला ।
प्रेमाचा जिव्हाळा देई तुझ्या ॥ २ ॥

निरपेक्ष वासना दे गा मज देवा ।
आणि तुझी सेवा आवडीची ॥ ३ ॥

शांतीचीं भूषणें मिरविती अंगीं ।
वैष्णव आणि योगी म्हणावे ते ॥ ४ ॥

असो तो अकुळी असो भलते याती ।
माथां वंदी प्रीती जनी त्यासी ॥ ५ ॥

● ● ●

आंधळ्याची काठी । अडकली कवणें बेटीं ॥ १ ॥

माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ॥ २ ॥

मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ॥ ३ ॥

तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ॥ ४ ॥

आतां जीव जाऊं पाहे । धांव घाली. माझे आये ॥ ५ ॥

माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ॥ ६ ॥

● ● ●

पाणी तेंचि मेघ मेघ तेंचि पाणी ।
काय या दोन्हीपणीं वेगळीक ॥ १ ॥

माती तेंचि धूळ धूळ तेंचि माती ।
भंडा[1] आणि भिंती काय दोन ॥ २ ॥
साखरीं गोडी गोडी साखरेसी ।
थिजलें तुपासी काय दोन्ही ॥ ३ ॥
डोळा तें बुबुळ बुबुळ तो डोळा ।
शांति ज्ञानकला काय भिन्न ॥ ४ ॥
वदन ते ओठ ओठ तें वदन ।
क्षेम आलिंगन काय दोन ॥ ५ ॥
जीभ ते पडजीभ पडजीभ ते जीभ ।
आशा आणि लोभ काय दोन ॥ ६ ॥
संत तेंचि देव देव तोचि संत ।
म्हणे जनी मात गोष्टी भिन्न ॥ ७ ॥

• • •

नाद पडे कानीं । मृग पैज घाली प्राणी ॥ १ ॥
आवडीं अंतरीं । गज मेला पडे गारीं ॥ २ ॥
चोख पाहे अंग । दिने नाडला[2] पतंग ॥ ३ ॥
गोडी रस गळा । मच्छ अडकला गळा ॥ ४ ॥
गंधें अलि[3] नेला । म्हणे जनी तोचि मेला ॥ ५ ॥

• • •

पक्षी जाय दिगंतरा । बाळकांसी आणि चारा ॥ १ ॥
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लांपासी ॥ २ ॥

१ मातीची न भाजलेली वीट.
२ मेला.
३ भुंगा.

माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापाशीं ॥ ३ ॥
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधुनी उदरीं ॥ ४ ॥
तैसी आम्हांसी विठ्ठल माये । जनी वेळोवेळां पाहे ॥ ५ ॥

*जनाबाई*

●●●

## अभ्यास

१ विठ्ठल हें बहुतेक महाराष्ट्रीय संतांचें आवडतें दैवत होतें. असें होण्यांचीं कारणें सांगा.

२ जनाबाईंच्या खालील अभंगांचें रसग्रहण करा —

गंगा गेली सिंधूपाशीं । त्यानें अव्हेरिलें तिसीं ॥
तरी तें सांगावें कवणाला । ऐसे बोले बा विठ्ठला ॥
जळ काय जळचरा । माता अव्हेरी लेकरा ॥
जनी म्हणे शरण आलें । अव्हेरितां ब्रीद गेलें ॥

३ लक्ष्मीबाई टिळकांचें ‘ स्मृतिचित्रें ’ हें आत्मचरित्र वाचा. जनाबाईंच्या अभंगाप्रमाणें लक्ष्मीबाईंच्या लेखनांतहि आर्तता, प्रसन्नता व प्रेमळपणा हें गुण प्रामुख्यानें प्रतिबिंबित झाले आहेत. यावरून स्त्रियांच्या वाङ्मयाविषयीं तुम्हांला कांहीं निष्कर्ष काढतां येईल काय ?

४ विठ्ठलाचें पदक चोरल्याचा आळ येऊन जनाबाईंना सुळीं देण्याची शिक्षा झाली, अशी कथा आहे. त्या वेळीं जनाबाईंनीं विठ्ठलाचा धांवा कसा केला असेल तें लिहा.

# ३

## नल-दमयंती

### परिचय

'मुक्तेश्वर हे एकनाथांचे नातू. प्राचीन मराठी कवींत त्यांचें स्थान जितकें उच्च तितकेंच अपूर्व आहे. प्राचीन कवितेच्या मुख्य परंपरा दोन — एक संत कवींची व दुसरी पंडित कवींची. मुक्तेश्वरांच्या प्रतिभेनें यांपैकीं कुठल्याहि चाकोरीचा स्वीकार केला नाहीं. ते स्वभावतः कालिदासासारख्या अभिजात कवींचे वारस आहेत. आपल्या काव्यविलासाकरितां त्यांनीं रामायण-महाभारतांचा आधार घेतला, पण त्यांतल्या आध्यात्मिक भागावर मुक्तेश्वरांनीं कधींच भर दिला नाहीं. काव्य रचावयाचें तें भक्ति किंवा अध्यात्म यांच्या विवेचनासाठींच रचावयाचें हा काव्याचा पारमार्थिक हेतु बदलून मुक्तेश्वरांनीं आपल्या सगुण सालंकार वाणीनें काव्यानंद चाखण्याची चटक रसिक वाचकांना लावली.' हें प्रो. पंगूंचें म्हणणें अक्षरशः सत्य आहे.

मुक्तेश्वरांच्या या भूमिकेमुळें त्यांचें काव्य आधुनिक रसिकांना अधिक जवळचें व हृदयंगम वाटतें. महाभारताचीं पांच पर्वें — आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक — हाच या कवीच्या प्रतिभेचा सर्वश्रेष्ठ विलास होय. प्रसाद, कल्पकता, भाषाप्रभुत्व, सृष्टीप्रमाणें मानवी मनाशीं समरस होण्याची आणि या दोन्हींचें उठावदार वर्णन करण्याची कला इत्यादि गुणांनीं मंडित झालेली त्यांची कविता हें मराठी काव्याचें चिरंतन भूषण आहे.

● ● ●

अर्धवस्त्र नेणता इतें । खंडोनी गेलें पाहिजे परतें ।
ऐसा विचार करुनी चित्तें । विलोकित काननीं ॥ १ ॥
कोशरहित पडलें शस्त्र । तेणें छेदिलें अर्ध वस्त्र ।
निद्रिस्त पतिव्रता पवित्र । निर्जन वनीं एकली ॥ २ ॥

त्यागुनी चालिला तो राया । परतोनी पातला त्याचि ठाया ।
निद्राभूत देखोनी जाया । जाता जाला मागुता ॥ ३ ॥
शिणली पायीं चालतां वाट । उपोषणीं आगळे कष्ट ।
चेतनारहित पडे काष्ट । तेंवी निद्रिस्त भूतळीं ॥ ४ ॥
म्हणे, ' हे पतिव्रता निर्दोष । स्पर्शों न शके परका पुरुष ।
इचे नेत्रींचा हुताश । भस्म करील दुष्टातें ॥ ५ ॥
माझिये आशीर्वचनीं । क्षेम कल्याण वांचो त्रिजनीं ।
दुःख न देखवे नयनीं । यालागीं त्यागुनी जातसे ॥ ६ ॥
आदित्य रुद्र आणि वसव । अश्विन मरुत नागदेव ।
सप्तऋषी सिद्ध सर्व । धर्मशील रक्षतु ॥ ७ ॥
गृहनक्षत्रपंचभूतां । श्वापदें पक्षी वनदेवतां ।
वृक्षवल्ली गुल्म लतां । नमन माझें साष्टांगीं ॥ ८ ॥
धरादेवी तुज नमन । तुजवरी कंटक बहु पाषाण !
दमयंतीचे सुकुमार चरण । छिन्नभिन्न न करावे ॥ ९ ॥
तुम्हीं समस्तीं स्नेहभावें । लावण्यलतिके सांभाळावें ।
तुम्हांसी निरवून स्वस्थ जीवें । मी जातसे वनपंथीं ' ॥ १० ॥
या परी सांडुनी दमयंती । नैषध गेला अरण्यपंथीं ।
स्वल्प उरली असतां रात्री । प्रबोधली पतिव्रता ॥ ११ ॥
निकट न देखे भ्रतार । भीमकी करी हाहाकार ।
सबळ दाटला अंधकार । भंवतें कांहीं दिसेना ॥ १२ ॥
घाबरेपणीं धांवोनि चरणीं । अडखळोनी पडे धरणीं ।
मस्तकीं लागोनी पाषाणीं । रक्त वाहे भडभडां ॥ १३ ॥
हांक मारी दीर्घ स्वरें । म्हणे, ' वल्लभा ! धांव कां त्वरें ।
मातें सांडोनी पुढारे । पाय कैसे चामकती ? ॥ १४ ॥

तुजवरी ठेवूनिया दृष्टि । मी विसरलें दुःख कोटी ।
तुझ्या संगीं सर्व सृष्टि । सुखभरित मज वाटे ॥ १५ ॥
धांव धांव नैषधराया ! । केशीं झाडीन तुझ्या पायां ।
झाडणें करूनी सांडीन काया । तुजवरूनी आवडी ' ॥ १६ ॥
पडे उठी; मागुती पडे । दिशा अवलोकुनी चहूंकडे ।
' नळा ! नळा ! ' म्हणउनी रडे । आकांतली काननी ॥ १७ ॥
' प्राणेश्वरा ! नळ नरेश ! ' । मुखें गाजवी हाचि घोष ।
उर्ध्व अवलोकी आकाश । रिघों पाहे पाताळीं ॥ १८ ॥
' नमन माझें ' म्हणे अनिला ! । ' माझी वार्ता जाणवी नळा ।
लोटुनी आणी मजजवळां । श्रेय घेई जीवाचें ॥ १९ ॥
नमन करितसें तुझिया चित्ता । उपजो नेदी निष्ठुरता ।
चर हो ! तुम्हातें वाहातसें माथां । परतोनी आणा नळातें ॥ २० ॥
पक्षी हो ! तुम्ही पक्षवळ । उडोनी शोधा माझा नळ ।
वार्ता सांगोन उतावीळ । शीघ्र आणा मजपाशीं ' ॥ २१ ॥
चक्रवाकाचिया युग्मा । म्हणे ' वेदना ठाऊकी तुम्हां ।
नळातें शोधुनियां श्रमा । माझिया हो ! परिहरीं ' ॥ २२ ॥
मधुकरातें बोले शब्द । तुम्हा प्रिय पुष्पगंध ।
नळाचा मुखाब्जमकरंद । सेवुनी सांगा शुद्धीतें ॥ २३ ॥
दुःखसमुद्रामाजीं मग्न । संकटीं गेला वर सांडुन ! ।
परी मुखें नुच्चारी अवगुण । निंदा कांहीं बोले ॥ २४ ॥
आठवुनी नळाचे कष्ट । दुःखें होतसे हृदयस्फोट ।
नाठवी आपुलें संकट । वनिताश्रेष्ठ दमयंती ॥ २५ ॥
' हा हा महाराज ! नळनरेश ! । मातें होत कां तुझे क्लेश ।
तुवां असावें सुखसंतोष । तुझें अरिष्ट मज लागो ॥ २६ ॥

माझा पतिव्रताधर्म । तुतें सर्वदा करूं क्षेम ।
तुझे अवदशेचा श्रम । सर्व हो कां मजलागीं ' ॥ २७ ॥

ऐशी मुखीं गाजवी ध्वनी । अश्रुधारा गळती नयनीं ।
मार्गरहित वनोपवनीं । कोमल पायीं चामके ॥ २८ ॥

वाहळ वोहळ दरे दरकुटे । विवरें कुहरें गिरिकपाटें ।
वनें भयानकें कष्टें । लंघूनियां जातसे ॥ २९ ॥

विशाळ देखोनि पर्वत । तया करूनियां प्रणिपात ।
पुसें, ' नैषध प्राणनाथ । येणे मार्गें देखिला ' ॥ ३० ॥

अशोक वृक्ष देखोनि त्यातें । प्रार्थूनी पुसे जोडिल्या हस्तें ।
' नळाची शुद्धि सांगोनी मातें । अशोक करी अशोका ! ' ॥ ३१ ॥

अनेक श्वापदांचिया थाटी । भये कोणी न येती निकटीं ।
म्हणती, ' पतिव्रता दृष्टी । भस्म करील आमुतें ' ॥ ३२ ॥

पुढें प्रचंट वनकेसरी । त्यातें विनवी जोडुनी करीं ।
म्हणे, ' कृपा करोनी माझे शिरीं । नैषध सांग केउता ? ' ॥ ३३ ॥

सव्य घालुनी पद्मनयना । केसरी गेला विशाल वना ।
पुढें जातां तापसारण्या । देखती जाली ती वनीं ॥ ३४ ॥

अमृतोदकें देव तटिनी । तैशी सरिता प्रवाहे जीवनीं ।
माजी विकासल्या नलिनी । श्वेत रक्त बहुवर्ण ॥ ३५ ॥

तेथें हंस कारंडक । चकोर मयूर चक्रवाक ।
सदां फळीं फुलले रूख । आम्रजंबूपनसादी ॥ ३६ ॥

वैसल्या तपोधनांच्या श्रेणी । जपी तपी अनुष्ठानीं ।
एकांतनिष्ठ ध्यानीं । ' सोऽहमस्मि ' या लक्षीं ॥ ३७ ॥

वसिष्ठ अत्री भृगु ऋषी । तयांसमान तपोराशी ।
दृष्टी देखोनी मानसीं । परम विश्रांती पावली ॥ ३८ ॥

तयांते करुनी नमस्कार । विदित केला समाचार ।
ऋषी म्हणती, ' वो साचार । सर्व आम्ही जाणतसों ॥ ३९ ॥

आतां चिंता त्यागी चित्तें । शीघ्र भेटशी वल्लभातें ।
तुमचें ऐश्वर्यपद तुम्हां तें । प्राप्त होईल जाण पां ' ॥ ४० ॥

ऐसें वदोनी ते क्षणीं । अदृश्य जाले सिद्ध मुनी ।
नदी ना ते वृक्ष नयनीं । एकही तेथें दिसेना ॥ ४१ ॥

मुक्तेश्वर

• • •

## अभ्यास

१ ' मुक्तेश्वरांची शैली गुणवती व ओघवती आहे ' असें प्रो. पंगु म्हणतात. त्यांच्या मताची सोदाहरण चर्चा करा.

२ कालिदासाच्या ' विक्रमोर्वशीय ' नाटकांत राजा रानावनांत त्या सर्व पशुपक्ष्यांपाशीं उर्वशीची चौकशी करीत फिरत आहे असें दृश्य आहे. त्या प्रसंगाशीं या कथाभागाची तुलना करा. काव्यगुणांच्या दृष्टीनें तुम्हांला कोण सरस वाटतो — कालिदास कीं मुक्तेश्वर ?

३ वनपर्वातल्या दहाव्या अध्यायाच्या शेवटीं कवीनें केलेलें वर्षाकालाचें वर्णन आणि सभापर्वाच्या पंधराव्या अध्यायांतलें द्रौपदीनें दुर्योधनाला दिलेलें तेजस्वी उत्तर वाचा.

४ ' गंगा पवित्र पतिव्रता । म्हणोनि शंकरें वाहिली माथां ।
अभागी मानुनी निजभर्ता । रत्नाकरा अनुसरली ॥ '
या मुक्तेश्वरांच्या कल्पनेचें रसग्रहण करा.

• • •

# ४

## तुका म्हणे

### परिचय

सर्व संतकवि आपापल्या परी थोर आहेत; पण समाजाच्या विविध थरांत प्रसार पावणें, त्याच्या अगदीं तळापर्यंत जाऊन झिरपणें, त्याच्या दैनंदिन जीवनांत त्याला धीर देण्याकरितां धांवून येणें, हीं कार्यें इतर संतांपेक्षां तुकारामांच्या वाणीनें अधिक प्रमाणांत केलीं आहेत असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांची अभंगरचना इतकी प्रासादिक आहे, कीं एकाद्या निर्मळ जलाशयाच्या तळाशीं पडलेली वस्तु जशी बाहेरून पाहणाराला क्षणार्धात दिसते, तसा त्यांच्या अनुभवांतला आणि उपदेशांतला जिव्हाळा वाचकाला तत्काळ जाणवतो. मनुष्य स्वभावतः प्रापंचिक आहे, तो पारमार्थिक नाहीं, हें ओळखूनच तुकोबा त्याला मार्गदर्शन करतात. कुठें साधा विनोद, कुठें बोचक उपरोध, कुठें चपखल व्यावहारिक दृष्टान्त, जरूर तिथें प्रेमानें गोंजारायचें, जरूर तिथें चाबकाचा फटकारा मारायचा अशी त्यांची पद्धति आहे. या विविध गुणांमुळेंच गेलीं तीन शतकें बहुजनसमाजाला ते आपल्या आतासारखे वाटत आले आहेत. त्यांच्या काव्यकर्तृत्वाच्या बाबतींत प्रो. शं. गो. तुळपुळे यांचे खालील उद्गारहि मननीय आहेत —

‘ दया, क्षमा, शांति इत्यादि नैतिक गुणांवर तुकारामांचा भर असून ‘ भूतांचें पालन ’ व ‘ कंटकांचें निर्दालन ’ हीच दया असा त्यांच्या धर्मनीतीचा व्यवहार आहे. पापपुण्य, धर्माधर्म, सोंवळें-ओवळें यांसंबंधींच्या त्यांच्या कल्पनाहि रूढ नसून परमार्थास पोषक अशा आहेत. परस्त्री आणि परद्रव्य यांच्या विटाळापासून जो दूर तोच खरा सोंवळा, परोपकार हेंच पुण्य व परपीडा हेंच पाप, संतसंग हाच स्वर्गवास व स्वैराचार हाच नरक, याप्रमाणें त्यांच्या सर्व नैतिक विचारांचें अधिष्ठान परमार्थ हें आहे. ’

● ● ●

वळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग, नाहीं जाला त्याग अंतरींचा;
ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवां, मनासी हा ठावा समाचार;
जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं, जातों विसरूनी सकळ हें;
प्रपंचावाहेरी नाहीं आलें चित्त, केले करी नित्य वेवसाय;
तुका म्हणे मज भोरप्याची परी, झालें सोंग वरी अंत तेसें; १

तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय?–वृथा सीण आहे चालण्याचा;
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर, वस्त्रासी हे भार चिंध्या ब्रिदीं;
निद्रेसी आसन उत्तम पाषाण, वरी आवरण आकाशाचें;
तेथें काय करणें कवणाची आस ? वाया होय नाश आयुष्याचा;
राजगृहा यावें मानाचिये आसे, तेथें काय वसे समाधान ?
रायाचिये घरीं भाग्यवंता मान, इतरां सामान्यां मान नाहीं !
देखोनियां वस्त्रेंभूषणांचें जन, तात्काळ मरण येतें मज;
ऐकोनियां मानाल उदासता जरी, तरी आम्हां हरि उपेक्षीना;
आतां हेंचि तुम्हां सांगणें कौतुक, भिक्षेऐसें सुख नाहीं नाहीं !
तप व्रत याग महा भले जन, आशाबद्ध हीन वर्ततातीं;
तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे, पूर्वींच दैवाचे हरिभक्त. २

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें, पक्षीही सुस्वरें आळवीती,
येणें सुखे रुचे एकांताचा वास, नाहीं गुण दोष अंगा येत;
आकाश मंडप पृथिवी आसन, रमे तेथें मन क्रीडा करीं;
कंथाकमंडलु देह उपचारा, जाणवितो वारा अवसरु;
हरिकथा भोजन परवडी विस्तार, करोनि प्रकार सेवूं रुची,
तुका म्हणे होय मनासी संवाद, आपलाचि वाद आपणांसी. ३

आली सिंहस्थपर्वणी, न्हाव्यां भटां झाली धणी;
अंतरीं पापाच्या कोडी, वरीवरी बोडी डोई दाढी;

बोडिलें तें निघालें, काय पालटलें सांग वहिलें;
पाप गेल्याची काय खुण, नाहीं पालटले अवगुण;
भक्तिभावेंविण, तुका म्हणे अवघा सीण ! ४

आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे, आपणासि डोळे दृष्टी नाहीं !
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न, तोंडासि कारण चवी नाहीं !
तुका म्हणे शुद्ध नाहीं जों आपण, तया त्रिभुवन अवघें खोटें ! ५

दह्याचिया अंगीं निघे ताक लोणी, एका मोलें दोन्ही मागों नये !
आकाशाचे पोटीं चंद्र तारागणें, दोहींशी समान पाहों नये !
पृथ्वीच्या पोटीं हिरा गारगोटी, दोहींसी संसारीं करूं नये !
तुका म्हणे तैसे संत आणि जन, दोहींशी समान भजूं नये. ६

परिसें गे सुनेबाई, नको वेचूं दूधदहीं;
आवा चालिली पंढरपुरा, वेसीपासुनी आली घरा;
ऐकें गोष्टी सादर बाळे, करी जतन फुटकें पाळें;
माझे हातींचा कलवडू, मजवांचूनि नको फोडूं;
बळवट क्षीराचें लिंपन, नको फोडूं मजवांचून;
उखळ मुसळ जातें, माझें मन गुंतलें तेथें;
भिक्षुक आल्या घरा, सांग गेली पंढरपुरा !
भक्षीं परिमित आहारु, नको फारसी वरो सारूं;
सून म्हणे बहुत निकें, तुम्हीं यात्रेसी जावें सुखें !
सासुबाई स्वहित जोडा, सर्व मागील आशा सोडा
सूनमुखींचें वचन कानीं, ऐकोनि सासू विवंची मनीं;
सवतीचे चाळे खोटे, म्यां जावेंसें इला वाटे !
आतां कासया यानें जाऊं, काय जाऊनि तेथें पाहूं ?
मुलें लेंकरें घरदार, माझें येथेंचि पंढरपुर !
तुका म्हणे ऐसें जन, गोविलें मायेंकरून ७

काय बा करिसी सोंवळेंओवळें, मन नाहीं निर्मळ, वाउगेंचि ?
काय बा करिसी पुस्तकाची मोट, घोकितां हृदयस्फोट हाता नये !
काय बा करिसी टाळ आणि मृदंग, जेथें पांडुरंग रंगला नाहीं !
काय बा करिसी ज्ञानाचिया गोष्टी, करणी नाहीं पोटीं बोलण्याची !
काय बा करिसी दंभ लौकिकातें, हित नाहीं मातें तुका म्हणे ८

तुकाराम

● ● ●

## अभ्यास

१ ' देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ॥
तेथें पैजारेचें काम । अधमासि तो अधम ॥ '
हा तुकारामांचा उपदेश तुम्हांला पटतो काय ? त्यांच्यासारख्या संतपुरुषानें असा उपदेश करणें तुम्हांला योग्य वाटतें कीं नाहीं ?

२ सर्व संतकवींत तुकाराम हे सामाजिक सुधारकांचे आवडते कवि आहेत. असें होण्याचीं कारणें काय ?

३ ' बरा देवा कुणबी केलों । नाहीं तरी दंभें असतों मेलों । '
या तुकारामांच्या उक्तींतून सूचित होणारी तत्कालीन सामाजिक परिस्थिति थोडक्यांत वर्णन करा.

४ तुकारामांइतकी दुसऱ्या कुणाहि कवीचीं वेंचक वचनें सर्वसामान्य मनुष्याच्या तोंडीं आपल्याला आढळत नाहींत. त्यांच्या अशा पांच उक्ति सांगून त्या लोकप्रिय होण्याच्या कारणांचें विवेचन करा.

● ● ●

५

# कृष्ण आणि कर्ण

## परिचय

पंडित कवींविषयींच्या चर्चेत मोरोपंतांच्या कवितेइतकीं रणें दुसऱ्या कुणाच्याहि काव्यावर झालीं नसतील. क्लिष्टतेचा, रसशून्यतेचा, यमकामागून यमकें जुळवून कवितेचीं विटाळीं पाडीत जाण्याचा, एक ना दोन असले अनेक आक्षेप मोरोपंतांच्या बाबतींत घेतले गेले आहेत. सुदैवानें विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून प्रो. बनहट्टी-पर्यंत अनेक चतुर वकिलांनीं कवीची कैफियतहि दिली आहे.

मोरोपंतांच्या काव्यगुणांचें मूल्यमापन करतांना त्यांचा पेशा, परिस्थिति व प्रकृतिधर्म या सर्वांचा साकल्यानें विचार केला पाहिजे. पुराणिकाच्या पेशाचा त्यांच्या काव्यविषयक कल्पनांवर निश्चित परिणाम झाला आहे. लावण्या, पोवाडे हें जसें त्या काळांतल्या मराठमोळ्या समाजाचें मनोरंजनाचें साधन होतें, तसें मोरोपंतांसारख्यांचें कवित्व हें पांढरपेशा समाजाच्या विनोदनाचें आणि उद्बोधनाचें महत्त्वाचें स्थान होतें. कथा-कीर्तनें हा त्या वेळच्या मध्यम वर्गातील स्त्री-पुरुषांचा केवळ विरंगुळ्याचा विषय नव्हता; तें त्यांचें बौद्धिक खाद्य होतें. त्यांच्या धार्मिक भावनांना उजाळा मिळण्याची जागाहि तीच होती. त्या काळीं हा वर्ग संस्कृतशीं निकट संबंध असलेला, सामान्यतः व्युत्पन्न, असाच असे. लहान मुलालाहि सहज समजेल अशा काव्यापेक्षां ज्याचा अर्थ सांगून आपल्याला श्रोत्यांना चकित व आनंदित करतां येईल असें कवित्व त्या वेळच्या हरिदासांनाहि धंद्याच्या दृष्टीनें अधिक प्रिय असावें. मोरोपंतांची कविता या परिस्थितींत घडविली गेली आहे.

संतकाव्य आणि आधुनिक कविता यांच्या कसोट्या बाजूला ठेवल्या तर कल्पना-चातुर्य, रचनेची विदग्धता, असामान्य भाषाप्रभुत्व, रसनिर्मितीची शक्ति इत्यादि पंतांचे अनेक गुण आजच्या वाचकांच्या डोळ्यांत भरल्यावांचून राहणार नाहींत.

● ● ●

तो वृष भूमिग्रस्तस्यंदनचक्रासि उद्धरायातें
उतरे स्वरथाखालें, करुनि असें तुमुल युद्ध राया ! तें. १
उद्धरण करूं पाहे कर्ण भुजाहीं धरूनि चक्राचें,
परि पृथिवी सोडीना; जाणों व्रत घेतलें चि नक्राचें ! २
सप्तद्वीपा पृथ्वी वृष उचली च्यार अंगुळें वरतीं,
वडिशासि जसी मत्सी नुगळी चक्रासि, कांपली, पर तीं. ३
सद्रसना नामातें कीं, सोडी बंधुता न दायातें,
तेसीं क्षिति चक्रातें; श्रम झाला फारसा तदा यातें. ४
त्या व्यसनीं तो पाणी आणी नेत्रासि वृष, म्हणे, ' हाय ! '
काय करील ? न साहे तें; बहु मर्मीहि साहिले घाय. ५
स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे, ' बळ तुझें अनंत रहा
स्वस्थ मुहूर्तभरि ; रणश्रद्धा पुरवील गा ! अनंतर हा. ६
रक्षावा धर्म बुधें, कुशळांचा धर्म हा निधी; राहें
स्थिर; जें करिसि निरायुधमथन करिल धर्महानि धीरा ! हें ७
रथचक्र उद्धरूं दे; श्रुतिशास्त्रज्ञा ! महारथा ! कुळज्या !
साधु न हाणिति अरिला, पाहति अधृतायुध व्यथाकुळ ज्या ८
जी कीर्ति पूर्वजांची, वृद्धिमती करिति पुनरपी कवि ती;
यश बुडउनि अयशातें सुकुळक्षेत्रांत कुनर पिकवीती. ९
सत्पुरुषा ! न करावें कापुरुषाचीर्ण कर्म, थांब कसा;
हो राजहंस; होसी मलिनें कर्में करूनि कां बकसा ? १०
तूं वेदांतावभृतस्नात ख्यात स्वसत्क्रियायुक्त,
दिव्यास्त्रज्ञा ! नाहीं स्वगुरूंचें विसरलासि तूं उक्त. ११
तूं स्वरथीं क्षितिवरि मीं, तूं सायुध मीं अशस्त्रकवच रणीं,
न वधावें मज जों मीं रथचरणीं, लाग तूंहि भवचरणीं. १२

भ्यालों न तुज हरिस ही; जो न तुला विमुख काय कातर तो?
कथितों यास्तव कीं, जन धर्में भवसिंधु नायका तरतो!' १३
कृष्ण म्हणे, 'राधेया! भला बरा स्मरसि आजि धर्मातें;
नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवासि, न स्वकर्मातें; १४
जेव्हां तूं दुर्योधन दुःशासन शकुनि एकमति झालां,
कैसे कपटद्यूतीं चित्तीं हि न धर्म लंघितां भ्यालां? १५
जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता! तुझा धर्म? १६
राज्य न देसी, करवुनि वनवासाज्ञातवास ही, जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना! तेव्हां? १७
केले दग्ध जतुगृहिं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना! तेव्हां? १८
चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले नृपें; असें खोटें
कर्म करवितां, कर्णा! होता तव धर्म तेधवां कोठें? १९
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया अंग,
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां वृषा!? सांग. २०
खरदुर्वाक्यशरशतें भेदित होतासि जेधवां मर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता! तुझा धर्म? २१
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता! तुझा धर्म? २२
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि तो जसा कुचला,
आतांचि बरा सुचला? धर्मगृहा, सर्व व्हा परासु, चला. २३
नळ होय धर्मराजा, कळहोत्सुक पुष्करहि तुम्ही सर्व
बळ होतें सत्याचें, खळ हो! तुमचा न चालिला गर्व. २४

मागें चि तुम्हीं भजतां धर्माला तरि तुम्हांसि वांचवितां.
आतां मरा; न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचवितां. २५

मागें चि धर्म करितां, जरि देतां राज्य, धर्म वांचवितां.
न जगे तो दुर्भिक्षव्यसनापूर्वी न धान्य सांचवितां. २६

आतां रक्षील कसा धर्म, तुम्हीं वित्तमद्यमत्तांनीं
जो लोटिला दहादां स्वहितहि मानूनि अहित लत्तांनीं. २७

रक्षावा धर्म असा करिसी उपदेश, तरि असे मान्य.
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका नान्य. २८

*मोरोपंत*

● ● ●

**अभ्यास**

१ कृष्णानें कर्णाला दिलेल्या उत्तराचें मर्म आजकालचें एकादें उदाहरण घेऊन विशद करा.

२ 'चिपळूणकरांपासूनच्या सुश्लिष्ट व डौलदार गद्याची पूर्वतयारी मोरोपंतांच्या कवितेनें करून ठेविली होती'—या विधानाची चर्चा करा.

३ कृष्णानें कर्णाला निरुत्तर केलें असें पंतांनीं दाखविलें आहे. कर्णाच्या बाजूनें खरोखरच कांहीं बोलतां येण्याजोगें नव्हतें का ? असल्यास त्याची व्यवस्थित मांडणी करा.

४ या कवितेंतलीं कोटलीं स्थळें क्लिष्ट म्हणतां येतील ? तीं तुम्हांला कां क्लिष्ट वाटतात तें सांगा. हें विवेचन करतांना कृष्णाच्या उत्तराची कवितेच्या पहिल्या भागाशीं तुलना करा.

● ● ●

# ६

## सवाई माधवराव यांचा मृत्यु

### परिचय

प्रभाकर शाहीर यांचें संपूर्ण नांव प्रभाकर जनार्दन दातार. हा दुर्दैवी कवि पेशवाईच्या उत्तर काळांत जन्माला आला व इंग्रजी राज्य दृढमूल झाल्यानंतर दिवंगत झाला. खर्ड्याच्या लढाईवर तेजस्वी पोवाडा लिहिणाऱ्या या शाहिरावर पोटासाठीं सटरफटर लोकांवर कवनें करण्याची पाळी पुढें आली.

पोवाडे, लावण्या व देवादिकांवर रचलेल्या कविता हे प्रभाकरांच्या कवितेचे तीन विभाग होत. या तीनहि विभागांत त्यांची कल्पकता, भाषाप्रभुत्व, वर्णन-कौशल्य आणि भावनांना आवाहन करण्याचें सामर्थ्य दिसून येतें.

• • •

कमि नव्हते पृथ्वींत अवंतर प्राणी न्यायाला ।
औक्ष कसें कमि झालें सवाइ माधवरायाला ।। ध्रुवपद ।।
बाईसाहेब कल्पांत जिवाचा तळतळूनी करती ।
कां ग कुळस्वामिणी कोपलिस आजी मजवरती ।
पतिपूर्वी सौभाग्यवत्या ज्या पुत्रवत्या मरती ।
इहलोकीं परलोकीं धन्य त्या कुळास उद्धरती ।
कसें माझें दुर्दैव उपजलें चांडाळिण पुरती ।
म्हणुन श्रीमंत प्रभुची मजला अंतरली मूर्ति ।। [ चाल ] ।।
निरोगी सात सहस्र उंट न पार स्वामीचे ।
वीस सहस्र तुरग निवडक भीमथडी ग्रामीचे ।
सबल दोनशें नव्वद कुंजर विशाल हरकामीचे ।।
( चाल ) म्हशी दोन सहस्र कांठिदार वाणीच्या ।

सहा सहस्र गाई फारतरी वाणीच्या ।
कांहीं सफेत कपिला व्याघ्रांबर खाणीच्या ॥ ( चाल पहिली ) ॥
बैल बारा सहस्र एवढया जिवांस खायाला ।
कोण श्रीमंतांवांचुन दुसरा समर्थ द्यायाला ॥ कमि नव्हते० ॥ १ ॥

परिक्षिताला मरण यावें काय ब्राह्मण शापानें ।
दंश करावा काय किडीच्या तक्षक सापानें ॥
तसेंच जहालें काय प्रभूंना कोणाचे कोपानें ॥
संकट पडलें काय दिलासेल जिव संतापानें ॥
जांवई पहाले काय श्रीमंत माझ्या बापानें ।
वाटे आतां वैराग्य होइल काय ह्या अनुतापानें ॥ चा० ॥
एकवीस वर्षें पूर्णमासवर सवा पांच, अग ॥
दिसं दिवस भाग्याचा उदय हे दयाळुमहाराज ग ॥
अंतरले ते मला आतां आण जहर तरी पाज ग ॥ चा० ॥
ईश्वरा कशी मजवर आग पाखडलिस ॥
आयुष्य दोरि तूं मधेंच कातरलिस ॥
कां पेशव्यांची ही वंशवेल खुडलिस ॥ चा० ॥
अपार दिधलिस संपदा सुख भोगायाला ।
शतायु केलेंस नाहीं तसें हरी प्राणविसांव्याला ॥ कमि नव्हते० ॥ २ ॥

हरिघरचा नाहीं नेम टळाचा परंतु हा टळला ।
पहा पहिल्या प्रहरांत सूर्यनारायण मावळला ॥
गरिब गाईवर विशाल पर्वत समूळ कोसळला ।
वंशवनावर चहुंकडून क्षयदावाग्नी वळला ॥
बाळाजी विश्वनाथ तारक सर्वांना मिळला ।
रत्नदीप झळझळीत केवळ कुळांत पाजळला ॥ चा० ॥
काशीबाइ ती धन्य सती रावबाजी पुत्र प्रसवली ॥

छत्तीस महिने लढुन वसई पुढें आपांनीं वसविली ॥
दक्षण साडेसहा सुभ्यांत सरदेशमुखी बसविली ॥ चा० ॥
नानांची कंची वासना नाहिं राहिली ॥
पुरुषार्थ करुन दादांनीं अटक पाहिली ॥
भाऊंनीं कुरुक्षेत्रास कुडी वाहिली ॥ चा० ॥
रणीं जागा विश्वासरायें तीं पाहिली निजायाला ।
जनोवास मारून मुठ काय मिळाले बायाला ॥ कमि नव्हते० ॥ ३ ॥

दर रिकिबीस तलवार जरब सर्वांवर दाबाची ।
हुकूम मोडिल कोण कठिण मेहेनत रावसाहेबांची ॥
निवडक चाळिस सहस्र बरोबर फौज कराराची ।
शौर्य तेज पाहून छाती तडके नबाबाची ॥
कावेरी उत्तर तीर हद ठरवून शिवाराची ।
भोंसल्याची रग जिरवुन धरली आस हेरंबाची ॥ चा० ॥
थेवरास तें समाप्त होतां वैरी फिरून पोसती ॥
वीर पदरचे दिलगिर सारे रायाविन असती ॥
करून निर्वानिरव रमाबाईसाहेब गेलि सती ॥ चा० ॥
नंतर नारायणराव तें पद पावले ॥
दहा महिने मात्र सौख्याचे दिवस दावले ॥
गारद्यांस दुपारीं अडचणींत घावले ॥ चा० ॥
घाबरून चुलत्यांचीच गेले पाठ रिघायाला ।
ढकलुन देतां क्षणीं साधली संघ शिपायाला ॥ कमि नव्हते० ॥ ४ ॥

झाला जन्म त्या कुळांत माझ्या बाई राजेंद्राचा ।
केवळ माधवमूर्ति म्हसोबा नव्हेच शेंदराचा ॥
अणीक मंत्री मर्द मराठा चंद्रोचंद्रांचा ।
ऐरावत बांधून आणातिल प्रसंगिं इंद्राचा ॥

येथें न चाले यत्न ब्रहस्पती भार्गव चंद्राचा ।
उपाय असता तरी न मरता बापू रामचंद्राचा ॥ चा० ॥
हरहर जगन्निवासा, अतां काय करूं ॥
पोटीं जरी एक झालें असतें राजबीज लेकरूं ॥
राज्य न बुडतें मी मात्र मरत्यें शोक सदां कर करूं ॥ चा० ॥
पुढें काळ सख्यांनों कसा मी घालवूं ॥
हिरकणी कुटुन जाऊं पाण्यामधें घालवूं ॥
ती पिउन पौढत्यें नका मज हालवूं ॥ चा० ॥
जा समया मालवून आपल्या घरास न्हायाला ।
जिवंत मी असल्यास उद्यां या नेत्र पुसायाला ॥ कमि नव्हते० ॥ ५ ॥
धन्य वंश एकेक पुरुष कल्पवृक्ष पिकले ।
शत वर्षें द्विज पक्षी आनंदें त्या तरुवर टिकले ।
जलचर हैदर नबाब सन्मुख रण करितां थकले ।
ज्यांनीं पुण्याकडे विलोकिले ते संपत्तिला मुकले ।
असे प्रभु कसे अमर कराया ब्रह्मदेव चुकले ।
गहन गती कर्माची सर्व जण पूर्वी फळ विकलें ॥ (चाल) ॥
संपविला अवतार धन्यांनीं म्हणे गंगु हैबती ।
ध्वज पडले उलथुनी थडकल्या सुरुसाहेब नौबती ।
कोण करिल प्रतिपाळ तूर्त मुलुखास लागली बती ॥ (चाल) ॥
महादेव गुणीराज श्रुती गादिचे ।
नवें नुतन नव्हती शाईर जदिप वादिचे ।
पीळ पेच अर्थ अक्षरांत वस्तादिचे ॥ (चाल पहिली) ॥
प्रभाकराचें कवन तिष्ठित सभेंत गायाला ।
अशा कवीची बूज नाहीं कोणी करायाला ॥ कमि नव्हते० ॥ ६ ॥

प्रभाकर

●●●

## अभ्यास

१ 'लक्ष्मी-पार्वती विनोद' ही प्रभाकराची कविता वाचून तिचें रसग्रहण करा.

२ 'प्रभाकराची जडण घडण कडकडीत म्हणांयाला', हें वर्णन या कवितेला कितपत लागू पडतें तें सोदाहरण सांगा.

३ प्रत्येक वाङ्मयप्रकाराचें त्या त्या काळांतले कांहीं संकेत असतात. हे संकेत प्रतिभासंपन्न लेखकांनासुद्धां पाळावेच लागतात; त्यामुळें त्यांच्या वाङ्मयांत वैगुण्यें निर्माण होतात. या पोवाड्यांत अशीं कांहीं स्थळें आहेत काय ?

४ पोवाड्यांत अभिजात कवितेप्रमाणें सुंदर गीताचेहि गुण असावे लागतात. त्या दृष्टीनें या पोवाड्याचें परीक्षण करा.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८४२०
ग्रंथ शाखा (स्थळ ग्रंथ)

# ७

## तुतारी

### परिचय

कादंबरीक्षेत्रांत जो मान हरिभाऊ आपट्यांचा तोच आधुनिक कवितेंत केशवसुतांचा. त्यांच्या प्रतिभेच्या स्पर्शानें मराठी काव्याचा जणूं कांहीं कायापालट झाला. नवे विषय, नवीं वृत्तें, नव्या कल्पना आणि नव्या भावना यांचा त्यांनीं कसोशीनें पुरस्कार केला; उत्कटतेनें आविष्कार केला. 'नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे', हे त्यांचे उद्गार कवितेच्या क्षेत्रापुरते त्यांना स्वतःला अक्षरशः लागू पडतात. त्यांची कविता आत्मलक्षी आहे; पण ती आत्मकेंद्रित नाहीं. व्यक्तीच्या सुखदुःखाइतकेंच ते समाजाच्या वेदना-संवेदनांशीं समरस होतात. फुलपांखरूं पाहून त्याच्याभोंवतीं घुटमळणारें त्यांचें मन 'झपूर्झा'मध्यें ज्ञाताच्या

कुंपणावरून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करतें. विद्याभ्यासाकरितां पुण्याला आल्यावर घराची आठवण होऊन ते जितक्या व्याकुळतेनें 'तातास या बघुनिया हृदयांत खातें। होऊन हें हृदय विव्हल सर्व जातें। त्याच्या तरी पदयुगावरि या पडूनी। न्हाणूं तयास मग का वद आसवांनीं?' असे उद्गार काढतात, तितक्याच त्वेषानें 'वैर तयाला थप्पड बसतां चोळिति जे गालास। वैर तयाला जे गरिबी शिकवितात बालांस।' असे तळमळीचे बोल त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतात.

केशवसुत दिवंगत होऊन जवळ जवळ दोन पिढ्या होत आल्या. तथापि त्यांच्या कवितेविषयींचें पंडितांचें कुतूहल आणि रसिकांचें प्रेम अद्यापि ओसरलेलें नाहीं. हरिभाऊंच्या कांहीं कादंबऱ्यांप्रमाणें केशवसुतांच्या पंचवीस-तीस कविताहि पिढ्यान् पिढ्या महाराष्ट्रांत लोकप्रिय राहतील.

● ● ●

एक तुतारी द्या मज आणुनि
फुंकिन मी जी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें—
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें;
अशी तुतारी द्या मजलागुनि. १

अवडम्बरलीं ढगें कितीतरि
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहोर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे!
गाफीलगिरी तरिहि जगावरि! २

चमत्कार! 'तें पुराण तेथुनि
सुन्दर, सोज्वळ, गोडें, मोटें!'
'अलिकडलें तें सगळें खोटें!'
म्हणती, धरुनि ढेरीं पोटें!
धिक्कार अशा मूर्खांलागुनि! ३

जुनें जाउं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरूनि टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध ! ऐका पुढल्या हाका !
खांद्यास चला खांदा भिडवुनि ! ४

प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुन्दर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरतीं नोंदा
बसुनी कां वाढवितां मेदा ?
विक्रम कांहीं करा, चला तर ! ५

निसर्ग निर्घृण, त्याला मुरवत —
नाहीं अगदीं पहा कशाची !
कालासह जी क्रीडा त्याची,
ती सकलांला समान जाची —
चुरूनि टाकी प्रचंड पर्वत ! ६

संघशक्तिच्या भुईंत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले,
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले —
घ्या त्यांत उड्या तर बेलाशक ! ७

धार धरलिया प्यार जिवावर
रडतिल रडोत रांडा पोरें,
गतशतकांचीं पापें घोरें —
क्षालायाला तुमचीं रुधिरें —
पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर ! ८

धर्माचे माजवूनि डम्बर
नीतीला आणिती अडथळे,
विसरुनियां हें जातात खुळे,
नीतीचें पद जेथें न ढळे —
धर्म होतसे तेथेंच स्थिर. ९

हल्ला करण्या तर दंभावर — तर बंडावर
शूरांनो! या, त्वरा करा रे!
समतेचा ध्वज उंच धरा रे!
नीतीची द्वाही पसरा रे!
तुतारिच्या ह्या सुरावरोबर! १०

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती!
देवांच्या मदतीस चला तर! ११

केशवसुत

## अभ्यास

१ 'देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या', असें केशवसुत 'स्फूर्ति' या कवितेंत म्हणतात. 'तुतारी'च्या शेवटच्या कडव्यांत 'सुरासुरांचा' असाच उल्लेख आहे. या विशिष्ट शब्दप्रयोगाच्या द्वारें केशवसुतांना काय सुचवायचें होतें तें सविस्तर सांगा.

२ ‘ तुतारी ’तल्या तुम्हांला आवडलेल्या कल्पना सांगून त्यांपैकीं प्रत्येकीचें सौंदर्य कशांत आहे याचें विवेचन करा.

३ केशवसुतांच्या काव्यविषयक कविता वाचून कवि व कविता यांविषयींचीं त्यांचीं मतें थोडक्यांत मांडा. जुन्या मतांशीं तीं कितपत जुळतीं होतीं ?

४ ‘ क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास ’, ही केशवसुतांची कविता वाचा. ती आत्मचरित्रात्मक आहे असें तुम्हांला वाटतें काय ?

● ● ●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ८

## तारातरङ्ग

### परिचय

चंद्रशेखरांची कविता वाचतांना एकादी सुंदर शिल्पकृति पाहात असल्याचा भास होतो. तिच्या चरणाचरणांतून त्यांची कलादृष्टि प्रतीत झाल्यावांचून राहात नाहीं. पांडित्य व रसाळपणा यांचा सहसा न घडणारा संगम त्यांच्या काव्यरचनेंत झाला आहे. ‘ काय हो चमत्कार ’, या खंडकाव्यांतील जिऊचें वर्णन करणाऱ्या खालील दोनच आर्या पाहाव्यात —

*गोधूम वर्ण तीचा हरणाच्या पाडसापरी डोळे*
*स्नेहाळ वदन नामा, प्रसन्न विधुबिंब जेंवि वाटोळें*
*तो केशपाश काळा भाळावरि लांब आडवें कुंकू*
*जणुं म्हणाति शब्द तीचे आम्हां कोकिलरवासही जिंकूं*

या आर्यांत मोरोपंतांचें भाषाप्रभुत्व आहे; पण त्यांची क्लिष्टता नाहीं. जणूं मुक्तेश्वरच आपल्या प्रासादिक वाणीनें आर्यावृत्तांत रचना करायला प्रवृत्त झाले आहेत

असें त्यांचें हें खंडकाव्य वाचतांना वाटतें. त्यांच्याविषयीं प्रसिद्ध टीकाकार माडखोलकर यांनीं पुढील उद्गार काढले आहेत : ' चंद्रशेखरांचे शब्द इतके मृदु आणि रसगर्भ असतात कीं, त्यांचें सौष्ठव पाहून कमलांची कांति हरपावी; त्यांची रचना इतकी घोटीव असते कीं, तिच्या आरसपानी अंगांतूक ध्वन्यर्थांच्या छटा विविधतेनें झळाळतात आणि वागर्थांचें अद्वैत त्यांच्या कवितेंत इतकें सुंदर साधलेलें असतें कीं, त्याच्या मानानें भारवीचे क्लिष्ट अर्थगौरव साहजिक रुक्ष वाटतें. '

विचार हा चंद्रशेखरांच्या कवितेचा आत्मा आहे. पण तो विचार बहुधा रम्य, भव्य, गंभीर अथवा उदात्त असतो. त्यामुळें त्यांची कविता भावप्रधान नसली तरी तिला केवळ बौद्धिक क्रीडेचें किंवा कल्पनांच्या कसरतीचें स्वरूप येत नाहीं. ती वाचकाला शांत, गंभीर अशा वातावरणांत किती लीलेनें नेऊन सोडते हें ' तारातरङ्गा 'वरून दिसून येईल.

● ● ●

कृष्णरात्रीचिया कृष्णपीठावरी
कृष्णआकाश हें कृष्णछत्रापरी;
त्यांत कोट्यावधी तारकांचे हिरे
लाविले, ज्यांमधीं दिव्य तेज स्फुरे १
कृष्ण तें जीतुकें, शुभ्र हे तीतुके,
स्थूल तें जीतुकें, सूक्ष्म हे तीतुके;
अंबरें तारका शोभती सुंदर,
तारकांही दिसे शोभिवंतांबर. २
ज्यामधीं शांतसा कांतिचा संग्रह
दीसताहे, असे हे अनेक ग्रह;
अन्यतारावली केंद्र ह्या तारका,
स्वप्रकाशें कशा हो मनोहारका ! ३

चंद्र मार्तंडशा त्या प्रचंडा, तरी
भासती अल्पशा काजव्यांच्या परी !
बाह्यरूपास ह्या पाहुनी लोचनीं
वस्तुचें वास्तव ज्ञान नोहे मनीं. ४

हे असंख्यातशा तारकावृंदहो !
काय हीं आमुचीं लोचनें अल्प हो !
वृंद हे तूमचे पाहतां पाहतां
होतसे त्याजला भ्रांति कीं तत्त्वतां. ५

नम्रभावें तुम्हां वंदुनी प्रार्थुनी,
तूमच्या प्रेक्षणें नेत्र हे तर्पुनी,
योजितो कल्पना मी तिथें संप्रति,
दृष्टिचीही जिथें कुंठताहे गति. ६

उंच उंच स्थलीं,— फार उंच स्थलीं
ती भरारी पहा ! मारुनी चालली;
शैल तों लंधिले, वातही लंधिले.
तारकासंघही सर्व उल्लंधिले. ७

• • •

सर्व तारांगणांतूनि देवांगना
दिव्य वीणांवरी बैसल्या गायना;
रम्य गंभीरसें तंतु ते वाजती,
भैरवीचे ध्वनी अंबरीं गुंगती. ८

गूढ लीला तुझी मूढशा बालकां
जाणवेना अम्हां गा जगत्-चालका !
गोल एकैक हा अद्भुतांचा निधि !
ह्या परी निर्मिले गोल कोटयावधी ! ९

काय ही कल्पना ! काय कौशल्य हें !
कायं औदार्य हें ! काय गांभीर्य हें !
ह्याच तर्कांमधीं गर्क झाली मती;
हे अगम्या ! असो तूजलागीं नती ! १०

चंद्रशेखर

• • •

## अभ्यास

१ 'चंद्रशेखरांची काव्यरचना म्हणजे वीणावादन आहे', या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

२ आकाशांतल्या तारकांच्या दर्शनानें आपल्या मनांत उद्भवलेले विचार कवीनें या कवितेंत ग्रथित केले आहेत. पौर्णिमेच्या मध्यरात्रीं तो समुद्रतीरीं उभा आहे अशी कल्पना करून त्याच्या मनांत येणाऱ्या विचारतरंगांचें चित्र रेखाटा.

३ रघुनाथपंडितांचें 'नल-दमयंती आख्यान' वाचून त्याच्या शैलीशीं चंद्रशेखरांच्या शैलीची तुलना करा.

४ 'कुंजकूजन' ही चंद्रशेखरांची कविता वाचून तुम्हांला त्यांच्या कवितेचे मुख्य गुण कोणते वाटतात तें सांगा.

• • •

# १

## बालविहग

### परिचय

सृष्टिसुंदरीचा लाडका बाळ, असेंच आधुनिक मराठी कवितेच्या इतिहास-काराला बालकवींचें वर्णन करावें लागेल. इतर कवि दुरून सृष्टि पाहतात. तिच्यांतल्या सुंदर दृश्यांनीं त्यांची बुद्धि अथवा कल्पना जागृत होते. बालकवीचें तसें नाहीं. ते भावनेनेंच सृष्टीशीं एकरूप होतात. एकाद्या लहान मुलाला कुशींत घेऊन आईनें त्याच्या कानांत हितगुज करावें तशी सृष्टि त्यांच्याशीं बोलते, हांसते, खेळते. अशा प्रकारच्या मधुर तंद्रींत बालकवींनीं जीं गीतें लिहिलीं आहेत त्यांचा गोडवा केवळ अपूर्व आहे.

*‘ हिरवे हिरवे गार गालिचे । हरित तृणाच्या मखमालाचे ’*
*‘ कड्यावरुनि घेऊन उड्या । खेळ लता वलयीं फुगड्या ’*

अशा ओळी त्यांच्या काव्यलतिकेवर पदोपदीं फुलतात. सुंदर संगमरवरी मूर्तींच्या मुखांतून सारंगीचे मधुर सूर बाहेर पडावेत तसा त्यांचें काव्य वाचतांना भास होतो. केशवसुतांनीं कवितेच्या आत्म्याला नवयुगाला अनुरूप असें वळण लावलें. पण त्या आत्म्याला सुंदर शरीराची जोड बालकवींनींच प्रथमतः करून दिली. हें सौंदर्य अकृत्रिम आहे हा त्याचा मोठा विशेष होय. मराठी कवितेच्या दुर्दैवानें, इतकी तरल आणि कोमल प्रतिभा लाभलेला हा कवि तिशी उलटण्या-पूर्वीच आगगाडीखालीं सांपडून दिवंगत झाला !

● ● ●

सांज खुले सोन्याहुनि पिवळें हें पडलें ऊन
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान !

पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल

त्या तेजाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बालविहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत !
क्षणभर येथें क्षणभर तेथें, भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची !
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी
गिरीशिखरांचें गोड फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं !
अष्टदिशांचा गोफ सभोंतीं हा भिरिभिरि पाहे.
मंद झुले वनमाल वाहतां शांत झरा राहे
समाधिस्त जणुं काय जाहलें हा गिरि हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून !
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मित चित्तें स्तब्ध उभा ठेला.
सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगिं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते कां घेउनिया हातीं ?
सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
वनवावें मन धुंद रंगुनी काव्य सुधापानीं !

अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें.

बालकवि

• • •

## अभ्यास

१ या कवितेंतलें शब्दसौंदर्य, कल्पनासौंदर्य व भावसौंदर्य यांच्यावर एकेक परिच्छेद लिहा.
२ बालकवि सृष्टीचे कवि होते. असें असून तिच्या कुटल्याहि रुद्र आविष्कारावर त्यांनीं कविता लिहिलेली नाहीं. त्यांच्या चरित्राचा परिचय करून घ्या व त्याच्या अनुरोधानें या गोष्टीचा उलगडा करतां येतो किंवा काय हें सांगा.
३ 'To a Skylark' ही शेलेची कविता वाचून तिच्याशीं 'बालविहग' या कवितेची तुलना करा.
४ 'संध्यातारक' ही बालकवींची कविता वाचून तिचें रसग्रहण करा.

• • •

# १०

## वात्सल्य

### परिचय

नारायण मुरलीधर गुप्ते हे केशवसुतांच्या पिढींतले कवि; पण त्यांची कविता केशवसुतांच्या मृत्यूनंतर चार वर्षांनीं प्रसिद्ध होऊं लागली. यानंतर दहा-बारा

वर्षांतच त्यांनीं आपलें सर्व महत्त्वाचें काव्यलेखन केलें. ' बी ' या इंग्रजी टोपण-नांवानें त्यांनीं आपली कविता प्रसिद्ध केली असली, तरी त्यांचा मराठीचा व्यासंग आणि अभिमान फार मोठा होता. सर्व प्रकारच्या प्राचीन मराठी काव्यांचे विविध सुंदर संस्कार त्यांच्या कवितेवर झाले आहेत. त्यांच्या कवितांत कल्पकतेइतकीच अंतर्मुखताहि आहे.

प्रौढ, गंभीर पण नादमधुर रचना हा त्यांच्या काव्याचा संस्मरणीय विशेष होय. ' कमला ' या त्यांच्या करुणरम्य दीर्घ कवितेंत तो प्रकर्षानें प्रकट झाला आहे.

● ● ●

पूर्वेला स्पर्शुनि शशि अस्तंगत झाला;
उदरस्थ बिंब तदनंतर ये उदयाला.

पाहतां पुत्रमुख अश्रु तिचे ओघळले,
हिम होउनि होते ते सृष्टीवरी पडले.

व्योमस्थ दृश्यसाम्य तें तदा महिवरलें
पाहिलें; नष्ट शैशवस्मरण टवटवलें.

निष्कलंक मुख विस्तीर्ण भाळ तेजाळ,
तनुवर्ण धवल, करुणालय नयन रसाळ.

ती मातृदेवता उंच समोर करांत
शिशु धरूनि होती तन्मुखदृक्सुख पीत.

या निखळ सुखाचा सहकारी प्रेमाचा
तो होता तिजला अंतरला जन्माचा.

दामिनीदामसम दारुणतर तें स्मरण
हृदरवी स्फुरुनियां तदीय अंतःकरण.

हृदयाच्या दिसला खोल कपारीं-आंत
शून्याचा अंधुक देश अपार अनंत;

दुःखाचा अन्तःप्रवाह वाहत होता,
ओलावा त्याचा स्फोट मुखीं हो करितां.

पर्णस्थ बिंदु मृदु गंधवाह हलवोनी
दों बिंदूंतें करि एक जीव मिळवोनी;

या विश्वकदंबीं तेविं मातृबिंदूतें
शिशु बिंदु मिळे जगदंब दयामृतवातें.

• • •

आरक्तरेणु रविहास्य उधळलें तिकडे,
तें उदित बालसुमहास्यपरागहि इकडे,

तें बालभानुपदलास्य नभावर चाले,
तें मातृहृदावर चंचल शिशुपद—चाळे.

पाहतां प्रभातीं बालजगा वर खालीं
कृष्णस्मृति संपुनि मातृमुखीं ये लाली,

सद्गदित हृदय तद्गात्रांसह थरथरलें,
नेत्रांतुनि अविरत वात्सल्याश्रु गळले.

वात्सल्य दिसे तें बहुविध विश्वविकासीं,
तें विश्वात्म्याचें विमल हास्य अविनाशी.

तें स्वार्थसमर्पण धन्य परार्थासाठीं
प्रत्यक्ष निर्मितें स्वर्गधरेच्या पाठीं.

'बी'

• • •

## अभ्यास

१ ‘ वात्सल्य हें विश्वात्म्याचें विमल हास्य आहे ’ असें ‘ बी ’ म्हणतात. त्यांच्या या उक्तीचें सविस्तर विवेचन करा.

२ ‘ बी ’ आणि ‘ चंद्रशेखर ’ यांची रचना व शैली या दोन्ही दृष्टींनीं तुलना करा.

३ ‘ वात्सल्य ’ या कवितेंत कवीनें सृष्टीचा कोणत्या पद्धतीनें उपयोग करून घेतला आहे ? ‘ बालविहग ’ व ‘ वात्सल्य ’ या कवितांची या विशिष्ट दृष्टीनें तुलना करा.

४ ही कविता वाचून एकादा कुशल चित्रकार सुंदर चित्र काढूं शकेल असें तुम्हांला वाटतें काय ? चित्राला अनुकूल असें या कवितेंत काय आहे !

●●●

# ११

# नदी आणि कवि

## परिचय

विनायक हे टिळक-केशवसुतांचे समकालीन कवि. विनायकांची कविता प्रसाद-पूर्ण व राष्ट्रप्रेमानें नटलेली अशी आहे. विनायकांच्या काळांत पारतंत्र्याचा अंधार सर्वत्र दाटलेला होता. परक्या सत्तेच्या गुलामगिरींत सुशिक्षित लोक समाधान मानीत होते. त्यामुळें निर्माण झालेल्या निराशेची छाया त्यांच्या अनेक कवितांवर पसरली आहे.

*‘ तळहातीं टेकुनि ही स्वाशिरातें बैसली*
*मस्तकीं केश विखुरले*
*श्वास चालले अश्रु लोटले ’*

‘ गळे जल गालीं-चिंतेनें पोळली ’ हें त्यांनीं केलेलें मातृभूमीचें वर्णन किंवा सर्केशींतला सिंह पाहून ‘ ही इष्ट नव्हे परवशतेंत ब्हाली, नाचरंग दीस महालीं ’ हा त्यांनीं त्या वनराजाला दिलेला इशारा, या गोष्टीभोंवतालची परिस्थिति पाहून त्यांचें मन कसें तडफडत असे याची कल्पना आणून देण्याला समर्थ आहेत.

पद्मिनी, पन्ना, दुर्गावती, अहिल्या वगैरे शूर व सत्त्वधीर स्त्रियांचीं चरित्रें त्यांनीं आपल्या कांहीं कवितांत वर्णन केलीं आहेत. त्यांचीं ‘ वीरमती ’, ‘ गणिकोद्धार ’ व ‘ भ्यास तो भास ’ हीं तीन खंडकाव्यें असून त्यांत सुबोध व सरस रचनेवरलें त्यांचें प्रभुत्व दिसून येतें. त्यांच्या स्फुट कवितांपैकीं ‘ जोहार ’, ‘ स्त्री आणि पुरुष ’, ‘ सुवास ’ व ‘ प्रीति निमाली तर ’ यांत त्यांची कवित्वशक्ति विशेष उत्कट रीतीनें प्रकट झाली आहे.

● ● ●

असो कवीचें कुल अप्रसिद्ध ।
होई कवीच्या कवनें प्रसिद्ध.
तसा नदीच्या उगमस्थलाला ।
नदीमुळें गौरवलाभ झाला १

काव्यें कवीचीं जगतांत गावीं ।
त्याचें न त्यांच्या परि चोज गांवीं
नदी सुदूरस्थ जनां पवित्र ।
विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र २

बाल्यांत उच्छृंखल वृत्ति दोन्ही ।
ठावा नसे आडथळा म्हणोनी;

लागो दरी खोल, उभा पहाड, ।
जातात तीं धांवत धाड धाड ३

जाई जसें अंतर होत खोल ।
गांभीर्य ये वृत्ति निवे विलाल;
रेखून मार्ग क्रमितात संथ ।
करीत कल्याण जगीं अनंत. ४

अभंग त्यांच्या हृदयीं तरंग ।
निःसंग ते त्यांत सदैव दंग,
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं ।
ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं. ५

स्वजीवनानें उगवून दाणे, ।
नदी जिवा दे चिर जीवदानें.
तैसें कवीच्या कविताप्रवाहें ।
जीवांत संजीवन दिव्य लाहे. ६

राष्ट्रें बुडालीं नृप थोर गेले, ।
नदी कवी मात्र अनंत ठेले; !
भागीरथीला खळ लेश नाहीं ।
अखंड रामायण लोक गाई. ७

महाकवी थोर नदीप्रमाणें; ।
मी बापडा ओघळ अल्प, जाणें;
थाके न ओढा झुळझूळ वाहे ।
माझी तशी ही गुणगूण आहे. ८

*विनायक*

• • •

## अभ्यास

१ ' विनायकांची रचना प्रसन्न असते ' या विधानाचा सदरहू कवितेच्या आधारें परामर्श घ्या.

२ या कवितेंतलें वर्णन ज्यांना लागू पडेल असे कोणाहि कवींच्या आयुष्यांतले तीन प्रसंग थोडक्यांत सांगा.

३ ' गाऊन गार्गी भ्रमतात रानीं ' असें या कवितेंत कवींचें वर्णन केलें आहे तें तुम्हांला पटतें काय ? का असें वर्णन करणें हा एक कविसंकेत आहे ?

५ ' राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले । नदी कवी मात्र अनंत ठेले । ' या ओळींतलें सत्य सोदाहरण विशद करा.

• • •

# १२

# कोण रोधील ?

## परिचय

तांबे हेसुद्धां केशवसुतांच्या पिढींतलेच कवि; पण त्यांच्या काव्यशक्तीला आयुष्याच्या पूर्वार्धापेक्षां उत्तरार्धांत अधिक सुंदर आणि रसपूर्ण असा बहर आला. १९२० पूर्वी ते एक चांगले कवि मानले जात असत. पण १९२० ते ३० या दशकांत लिहिलेली त्यांची कविता जेव्हां रसिकांपुढें आली, तेव्हां ते केशवसुतांपेक्षां भिन्न प्रवृत्तीचे पण त्यांच्याइतकेच प्रभावी व प्रतिभासंपन्न कवि आहेत हें सर्वांना कळून चुकलें. त्यांची ही कविता प्रसिद्ध झाली तेव्हां रवि-किरण मंडळांतले प्रमुख कवि लोकप्रियतेच्या शिखरावर होते. असें असूनहि त्यांच्या मानानें जुन्या असलेल्या या कवीनें जनतेचीं मनें पूर्णपणें अंकित केलीं.

तांब्यांच्या कवितेचा रविकिरण मंडळाच्या प्रमुख कवीवर जो परिणाम झाला, तो अप्रत्यक्ष होता; पण १९३० नंतर उदयाला आलेल्या बहुतेक लहानमोठ्या कवींवर त्यांच्या कवितेचे कांहीं ना कांहीं संस्कार झालेले दिसतात. बोरकरांच्या कवितेंत ते अधिक स्पष्टपणें जाणवतात. पण निकुम्ब, कान्त, इंदिरा सन्त किंबहुना कुसुमाग्रज इत्यादि विविध प्रवृत्तींच्या तरुण कवींची रचना पाहिली म्हणजे तांब्यांच्या प्रभावित्वाची पूर्ण कल्पना येते.

तांब्यांची कविता जितकी विविध तितकीच रसपूर्ण आहे. त्यांचीं प्रेम-गीतें आणि संसार-गीतें जशीं चटकदार वाटतात, तशीं मृत्यूच्या छायेंत अंतर्मुख होऊन त्यांनीं लिहिलेलीं चिंतनपर गीतें किंवा विधवेच्या दुःखानें, सामाजिक विषमतेनें अथवा राजकीय दास्यानें व्यथित होऊन त्यांनीं लिहिलेल्या कविताहि मन आकृष्ट करतात. 'कोण रोधील ?' या कवितेला गांधीजींच्या चळवळींतून प्रेरणा मिळाली असून, कवीला आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं वाटणारी आशा तिच्यांत सुंदर रीतीनें प्रतिबिंबित झाली आहे.

● ● ●

या भविष्याचिया दिव्य कारागिरा
कोण रोधील ? दे कोण कर सागरा ? ध्रु०

शूळराजा, तुझा रक्त ह्यांचें पिओ,
गृध्रगण भक्षण्या पुण्य गात्रां शिवो,
दुर्गि त्यांचीं शिरें अधम कुणि लोंबवो,
अंत त्यांचा नको समजुं हा नृपवरा ! १

ज्योति मृत्युंजय प्रबळ पिंडाहुनी
समज दावाग्निशा चहुंकडे पेटुनी
देशकालासि रे टाकितिल व्यापुनी
अंतिं फडकेल रे ध्वज तयांचा खरा. २

ज्यावरी भार तव, ज्यावरी गर्व तव
विफल तोफा तुझ्या, पलटणी सर्व तव,

विफल बलदर्प तव, यांत का शर्व तव ?
उघड लोचन, पहा दूर राजा, जरा. ३

भव्य ते स्तंभ बघ तुंग अट्टालिका,
त्या कमानी पहा, त्या गवाक्षादिकां,
सौध ते, कळस तो सोनियाचा निका,
ध्वज वरी प्रीतिचा मोहवी भास्करा. ४

तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं
लखलखे भरतभूजननि बघ विजयिनी !
प्रणय, नय, सत्य हे सज्ज गण रक्षणीं,
बघ भविष्याचिया दिव्य त्या मंदिरा. ५

*भा. रा. तांबे*

● ● ●

## अभ्यास

१ ' ज्योति मृत्युंजय प्रबळ पिंडाहुनी ' या ओळींतली कवीची श्रद्धा हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. त्या दृष्टीनें या ओळीचें सविस्तर विवेचन करा.

२ ' विफल तोफा तुझ्या, पलटणीं सर्व तव ' हें कवीचें म्हणणें तुम्हांला पटतें काय ? गेल्या दहा वर्षांचा जगाचा इतिहास तुम्हांला काय सांगतो ?

३ या कवितेच्या ध्रुपदाच्या दोन ओळींतलें सौंदर्य सविस्तर वर्णन करून सांगा. केशवसुत, बालकवि, यशवंत व कुसुमाग्रज यांचीं अशीं परिणामकारक ध्रुपदें शोधून काढा.

४ 'प्रणय नय सत्य हें सज्जगण रक्षणीं', ही ओळ लिहितांना तांब्यांच्या मनावर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम झाला होता असें तुम्हांला वाटतें काय ? कां केवळ ती कवितेच्या ओघांत आली आहे ?

• • •

# १३

## दैवाची निर्दयता

### परिचय

श्रेष्ठ नाटककार या नात्यानें गडकरी आजच्या पिढीला प्रिय व परिचित असले, तरी ते प्रथमतः कवि म्हणूनच पुढें आले. अवघ्या सात-आठ वर्षांत कवि या नात्यानें त्यांनीं मिळविलेली लोकप्रियता केवळ अपूर्व होती. १९१० ते २० या दशकांतल्या महाराष्ट्रांतल्या सुशिक्षित मध्यम वर्गानें मोहून वेडें होऊन जावें असेंच त्यांच्या कवितेचें स्वरूप होतें. तिच्यांत बुद्धिविलास होता; कल्पनेच्या हरतऱ्हेच्या चमत्कृतीबरोबर तिच्या भराऱ्याहि होत्या. किंचित् कृत्रिम वाटणाऱ्या पण डोळे दिपवून सोडणाऱ्या शब्दसौंदर्यानें ती नटली होती. तिचा मुख्य भाग प्रेम-गीतांनीं भरलेला होता. भग्न प्रीतीच्या पार्श्वभूमीवर गडकऱ्यांची या प्रकारची बरीचशी कविता रचिली गेल्यामुळें तिच्यांत एकप्रकारचें उदास परंतु रम्य सौंदर्य प्रकट झालें आहे.

'दैवाची निर्दयता' हें गडकऱ्यांच्या अशाच करुणरम्य प्रेम-गीतांपैकीं एक कवन आहे. मात्र त्यांच्या इतर प्रेम-गीतांपेक्षां तें थोडें निराळें आहे. रसिकांना चकित करून सोडणारी त्यांची कल्पकता ह्या कवितेच्या मध्यवर्ती कल्पनेंत दिसून येते. कुब्जेच्या कृष्णावरल्या मूक प्रेमावर या कवितेची त्यांनीं उभारणी केली आहे. त्यांच्या इतर कवितांत आढळून येणारी चमत्कृति इथें नाहीं; भाषेच

शृंगारहि नाहीं. पण आर्ततेमुळें, गुदमरणाऱ्या हृदयाच्या अस्फुट आक्रंदनामुळें, वाचकाच्या मनाला ती चटका लावल्यावांचून राहात नाहीं.

● ● ●

श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें ।
प्राणिमात्र नच केवळ परि तें यमुनेचें जळही जळतें ॥

कळे सकळ हें श्रीगोपाळा कळवळुनी मनिं आणि दया ।
धाडुनि दिधला व्रजांत उद्धव प्रियजनसांत्वन करावया ॥

सत्वर हरिचा निरोप घेउनि उद्धव भेटे सकळांतें ।
वृत्तश्रवणा क्षणांत जमलें गोकुळ सारें त्या भंवतें ॥

हें नंदाला, यशोदेस हें, कोणाला कांहीं कांहीं ।
निरोप सांगे सांत्वनपर तो; सुनें कुणी उरलें नाहीं ॥

या गोपीला, त्या गोपीला, गोड शब्द दे वाटुनियां ।
राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया ।
प्रेमकथांच्या संस्मरणानें जल सर्वांच्या ये नयनां ।
व्याकुळ विव्हळ झाली राधा, सांवरितां हो पुरे जनां ॥

सुखदुःखांच्या मिश्रसागरीं निमग्न गोकुळ सर्व असे ।
परि दुर्दैवी एक जीव तो त्या काळीं त्या स्थळीं नसे ।
अष्टावक्रा, काळी कुबडी, कुब्जा तेथें नच दिसली ।
दीन बिचारी एकटीच ती कुठें तरी जाउनि बसली ॥

स्मरण कशाचें तिचें कुणाला जी बघवेना डोळ्यांनीं ।
गजबजतां जग आनंदानें दुर्दैवी पळती रानीं ॥

तोंड झांकुनी, ओंठ दाबुनी, रडे आंतल्या आंत मनीं ।
पुसुनी टाकी झणिं पदरानें अश्रू आले जरि नयनीं ।

‘ प्रेमळ देवा, जिवलगा देवा, माझ्या जीवाच्या देवा, ।
कसे विसरलां या दासीला, देवा हो, एकच देवा ! ॥

कशी विचारूं उद्धवजींना क्षेम तुझें या लोकांत ।
म्हणेल कोणी काय मला हें त्या नकळे भर आनंदांत ॥

सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठीं ।
परि कुठें मी आणि कुठें तूं लोकसुंदरा जगजेठीं ॥

रडायासही मुक्तकंठ हा देवारे जीवचि लाजे ।
श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होइल माझें. ’ ॥

( अनुष्टुप् )

घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचूनि कोणतें ।
हंसायातेंच न परी रडायातेंहि लागतें ॥

असावें लागतें भाग्य हंसायातें न काय तें ॥
रडायातेंहि जीवातें या लोकीं भाग्य लागतें. ॥

गडकरी

• • •

## अभ्यास

१ ‘ प्रेम आणि मरण ’ ( काव्यज्योति ) ही कविता वाचा आणि तिची या कवितेशीं तुलना करा. प्रत्येकीचें सौंदर्य कशांत आहे ?

२ कृष्णानें कुब्जेला एका शब्दाचा देखील निरोप पाठविला नाहीं असें कवि सांगतो. असें कां व्हावें ?

३ ‘ सुखदुःखांच्या मिश्र सागरीं निमग्न गोकुळ सर्व असे ’ या ओळीचें सविस्तर विवेचन करा.

४ ‘ रडायातेंहि जीवातें या लोकीं भाग्य लागतें ’ या चटका लावून सोड-णाऱ्या ओळीनें गडकऱ्यांनीं या कवितेचा शेवट केला आहे. त्यांच्या वाङ्मयांतून अशा प्रकारचीं दहा हृदयस्पर्शी सुभाषितें शोधून काढा.

●●●

# १४

## मूर्ति दुजी ती

### परिचय

वि. दा. सावरकरांच्या देशभक्तीइतकीच त्यांची काव्यप्रतिभाहि प्रखर आहे. मातृभूमीची गुलामगिरींतून मुक्तता हें ध्येय अगदीं लहानपणींच त्यांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवल्यामुळें त्यांचीं अनेक सुंदर कवनें या एकाच उत्कट आणि उदात्त भावनेंतून उत्स्फूर्त झालीं आहेत. केवळ या क्षेत्रापुरतें पाहिलें तर त्यांचें कवियश अपूर्व आहे. वीर व क्वचित् करुण हे त्यांच्या अशा प्रकारच्या काव्यांतले मुख्य रस होत. ‘ बाजी देशपांडे यांचा पोवाडा ’ किंवा ‘ श्रीबंदावीर ’ यांच्यासारखी त्यांची रचना वाचतांना आपल्यापुढें एक धगधगीत यज्ञकुंड पेटलें आहे असा भास होतो. अग्निज्वाळांप्रमाणें त्यांच्या कल्पना आपल्या मनाला चाटून जातात — त्याला प्रदीप्त करून सोडतात. त्यांचीं असलीं प्रकरणें ओजोगुणानें नुसतीं रस-रसलेलीं आहेत.

‘ सागरास ’ व ‘ माझें मृत्युपत्र ’ या कवितांत जेव्हां त्यांची हीच भावना अधिक कोमलरूप धरून प्रकट होते, तेव्हां तिच्याबद्दल साश्चर्य कौतुक वाटल्या-वांचून राहात नाहीं. पण तसें पाहिलें तर त्यांत नवल करण्याजोगें काय आहे ? सावरकरांनीं काव्यलेखन थोडें केलें असलें तरी त्यांची प्रतिभा मूलतः महाकवीची आहे. विशाल कल्पकता, उद्दाम भावना, अभिजात पांडित्य, असामान्य भाषा-प्रभुत्व इत्यादिकांचा दुर्मिळ संगम त्यांच्या काव्यप्रतिभेंत झाला आहे. ‘ जगन्नाथाचा

रथोत्सव ' या कवितेंत विश्वनियंत्याच्या अनंत प्रवासाचें त्यांनीं केलेलें कल्पकतापूर्ण वर्णन कुणाला स्तिमित करून सोडणार नाहीं? खालील उतारा ' मूर्ति दुजी ती ' या त्यांच्या तेजस्वी काव्यांतून घेतला आहे. सन १९१० सालीं इंग्लंडमध्यें सावरकरांना बंदिवान करण्यांत आलें. त्या बंदिवासांत त्यांनीं ही कविता लिहिली आहे.

● ● ●

अपरिचित न जो तुझिया मधुर विलासा:
रम्य सरें तीं, नलिनें, नाल सुभग ते,
ते सुगंध भृंगगुंज, सुमंजुला
सारंग्या, गीतें तीं गोड, गोड तीं
दयित-स्मृति आलिंगन जीस तृप्तवी,
शेती ती हिरवी, आल्हादिते मळे,

सरिता पुलिनोत्थ थंड तीं कलिंगडें,
मुक्त नील आकाशश्री मनोहरा,
मुक्त नील सागरतल, मुक्तवायुते,
राजमार्गीं भक्तीच्या गजर गोड वा

टाळमृदंगांचा हरिनाममत्त तो,
चंद्रबिंब शारद मेघांत धावतें,
आशा कीं रिक्त संशयांत सुखभरें:
ऐसें जें नवसंगत, मंजु, मुक्त-जें

त्या त्यांतिल मधुर विलासासि जो तुझ्या
मूर्तीच्या लावण्यश्रीस वर्णिता
भाटचि तो लंपट तव : देवि! तोहि मी
आजि अहह अच्छितसें रूप देखण्या

तें दुजेंचि तव ! तव ती मूर्ति दुजीची !
मूर्ति मधुर ना : परंतु ती भयंकरा
तव दुसरी घोर मूर्ति दावि ती मला !
कारण तूं बघसि कां न आज मज इथें
ऐशा ह्या लोह-पिंजऱ्यांत कोंडिला
हिंस्र कुणीं पशु जैसा वध्य तसाची;

• • •

या भयाण एकलकोंडींत अेक ह्या
निःसहाय, निंदित, मी बघतसें स्वयें
जीवनरस नाड्यांतुनि माझिया अहा
थंड पडत जातांना ! दगडचुन्यांच्या
या नंग्या अंधाऱ्या भिंतीच्याहुनि
गार गारठा अंगीं असह्य भरुनि ये.
कारेच्या कोठडींत नागव्या अशा
नंगें कर्तव्य असें मजसि गांठतें !
आणि अधांतरिं शिखरावरति वायुच्या
संभाळुनि तोल सतत चढत धावण्या
आज्ञा मज दे ! पाठीवरति लादुनि
पर्वतसम दुर्धर सद्‍गर्व भार हा
राष्ट्राचा अखिलाची ! ये तरी अहा
तूंहि ! तुझ्या त्या दुसऱ्या चंडमूर्तिचें
दर्शन मज दे ! कवि ते, आजि दुजा तो
छेड सूर कर्कश, जो भिवविं भैरवा !
सूर ललित ना ! रुणझुणु ताल तोल ना !
आवडते ज्याचे आघात कोंवळे

हृदयकुंजिं नाचविती गोड गुलगुल्या
मंजु गीतगोविंदांतील छंद ते :
अबलांच्या अबल हृदा अधिक अबल जे
करिती ते बिल्हणीय करुण छंद वा.
परि, कविते, भेरीचे सूर ते दुजे
छेड आजि, अबलांच्या अबल हृदांही
करिते जे प्रबल प्रलयोर्मि सिंधुसे !
मृत्युंजय मंत्र कुणी प्रकटवील जो
मूर्ति चंडिकेची अुद्दंड, द्यावया
चंड मनोबळदाता मजसि वर अजी !

*सावरकर*

● ● ●

## अभ्यास

१ केशवसुत व सावरकर यांच्या काव्याचें स्वरूप परिस्थितीमुळें भिन्न झालें; पण या दोघांच्या प्रतिभांत समान असे अनेक गुण आहेत; या विधानाचा परामर्ष घ्या.

२ ' ओज हा कांहीं केवळ सावरकरांच्या कवित्वाचा गुण नाहीं. तो त्यांच्या व्यक्तित्वाचा आत्मा आहे ' असें एक टीकाकार म्हणतात. सावरकरांचे निबंध वाचून या मताची चिकित्सा करा.

३ ' जगन्नाथाचा रथोत्सव ' ही कविता वाचून तिचें रसग्रहण करा. या कवितेंत सावरकरांनीं कवितेचीं दोन रूपें वर्णन केलीं आहेत तीं लक्षांत घेऊन कलेचें स्वरूप व कार्य यांवर कांहीं विशेष प्रकाश पडतो किंवा काय याची चिकित्सा करा.

४ ' गीत-गोविंद ' व बिल्हण यांची माहिती मिळवून त्यांच्यावर सविस्तर टीपा लिहा.

● ● ●

अनुक्र. २३९५२
विभाग ३/व्य
क्र. ५८२
नों. दि. २/१/१९५८

# १५

## दैवतें माय-तात

### परिचय

बालकवि व गडकरी हे अनुक्रमें १९१८ व १९१९ सालीं दिवंगत झाले. केशवसुतांपासून स्फूर्ति घेतलेल्या आणि आधुनिक कवितेच्या ज्या निर्मितीला विविध गोष्टी प्रेरक झाल्या, त्यांच्या वातावरणांत वाढलेल्या कवींची पिढी या दोघांच्या मृत्यूनें संपली. पुढें तीन-चार वर्षांनीं नव्या पिढींतल्या कांहीं कवींनीं एकत्रित येऊन 'रविकिरण-मंडळ' स्थापन केलें. १९२५ ते १९३५ हा या मंडळाचा ऐन भरभराटीचा काळ होता. या मंडळानें काव्यरचनेंत जसे विविध प्रयोग केले त्याचप्रमाणें नवी कविता सामान्य जनतेपर्यंत नेऊन पोंचविली. आधुनिक काव्य वाचण्याची, ऐकण्याची नि गुणगुणण्याची गोडी 'रविकिरण-मंडळा'च्या काळांतच महाराष्ट्रांत निर्माण झाली असें म्हणायला हरकत नाहीं.

यशवन्त हे या मंडळांतले एक प्रमुख कवि. साधुदासांसारख्या वामनपंडित आणि मोरोपंत यांच्या पंक्तींत शोभणाऱ्या कवीपासून काव्यलेखनाचे पहिले धडे त्यांनीं घेतले असले, तरी त्यांची कविता सर्वस्वीं आधुनिक वळणाची आहे. 'देहाचा पूल' या ऐतिहासिक कवितेपासून 'जमेचि ना, घडेचि ना —' या जगाची सद्य:स्थिति वर्णन करणाऱ्या कवितेपर्यंत आणि 'आई' या बालकाचा शोक चित्रित करणाऱ्या कवनापासून 'दैवतें माय-तात' या अनुभवानें अंतर्मुख होणारें आई-बापांचें मन सांगणाऱ्या कवनापर्यंत त्यांच्या प्रतिभेनें केलेला प्रवास पाहिला म्हणजे वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या विविध अनुभूतींशीं समरस होण्याची त्यांची असामान्य शक्ति दिसून येते. 'यशोधन', 'यशोगन्ध' वगैरे त्यांचे काव्यसंग्रह व 'बन्दीशाळा' हें त्यांचें खंडकाव्य त्यांची काव्यनिर्मिति किती विविध आहे, ओज व कल्पकता या गुणांबरोबरच भावनेची तरलता आणि उत्कटता यांचाहि आविष्कार त्यांची प्रतिभा किती कुशलतेनें करूं शकते याची साक्ष देण्याला समर्थ आहे. 'दैवतें

-माय-तात ' या कवितेंत कवीनें व्यक्त केलेली अनुभूति जितकी सूक्ष्म तितकीच हृदयंगम आणि जितकी कौटुंबिक तितकीच विश्वव्यापी आहे.

● ● ●

तुम्ही होतां मज पूज्य पूर्व काळीं
नाहिं आजहि ती पूज्यता निमाली
जधीं तुमचें देहावसान झालें
लोचनांचीं झिरपलीं आलवालें १

जन्मदात्यांच्या दुक्ख वियोगाचें
पालकांच्या वात्सल्य समाप्तीचें
आणि जगतांतिल एकलेपणाचें
किती दुबळ्या दाखवूं वदुनि वाचे ! २

मास-वरुषांच्या परी अंतरानें—
नव्हे,—काळाच्या गार फुङ्करानें
दाह विरहाचा शमुनि अन्तरींचा
झरा नयनीं आटला आंसवांचा ३

आणि आतां थाटल्या प्रपञ्चांत
अहो झालों आम्हीच माय-तात !
माय-तातांच्या ह्याच भूमिकांनीं
दिली तुमची थोरवी जाणवोनी ४

पांखरांची किलबील दीनवाणी
बघुनि भंवतीं, हें हृदय होइ पाणी.
किडा-मुङ्गींची वाण नेहमींची !
क्षुधाव्याकुल तोषवूं केविं चोंची ! ५

थिट्या अमुच्या पङ्खांत ऊब कोठें ?
प्राण चिमण्यांचा लोचनांत गोठे !
आणि कळतें सोसतां ताण हाल
किती आम्हांस्तव कष्टलां असाल ! ६

गिरिशृङ्गांना जेविं मेघमाला
तुम्हीं पोटाशीं घेतलें अम्हांला
जेविं दिग्गज ह्या वसुंधरेसाठीं
तुम्ही अमुच्या राहिलां पुढें-पाठीं. ७

कळा वृश्चिकदंशशा साहुनीया
अम्हां दिधली शैशवीं अङ्कशय्या.
झोंप बाळांची पावुं नये नाश
म्हणुनि अपुले रोधिले तुम्हीं श्वास. ८

दीप तेवावा जेविं अहोरात्र
मनें निरलस जागला श्रान्तगात्र
मानहानी पतकरुनि रोष लोकीं
तुम्हीं केली नित पाठराखणी कीं. ९

शिळेंपाकें सेवून सणावारीं
जुनें-पानें लेवून घरीं दारीं
सदा पुरवावें गोड धड मुलांना
असे अवघड संसार, यज्ञ जाणा १०

आज आचरतां तोच यज्ञ-धर्म
थोरवीचें आपुल्या कळे मर्म

आणि येति न जरि आंसु लोचनांत
मना झालीं दैवतें माय-तात. ११

यशवंत

• • •

## अभ्यास

१ ‘ आई ’ ( काव्यज्योति ) व ‘ दैवतें माय-तात ’ या कवितांतल्या भाव-सृष्टींची तुलना करा. कुठली सृष्टि तुम्हांला अधिक गंभीर व विशाल वाटते ?

२ ‘ गिरिशृङ्गांना जेविं मेघमाला ’ या दिंडींतील भव्य कल्पनांनीं या कवितेंत इष्ट रसाचा परिपोष होतो काय ?

३ ‘ संसार हा यज्ञ आहे ’ असें कवि कां म्हणतो ?

४ या कवितेंतल्या कोणत्या ओळी तुम्हांला अतिशय हृदयंगम वाटतात ? तुमच्या आवडीचीं कारणें सविस्तर सांगा.

• • •

# १६

## पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास

### परिचय

माधव ज्यूलियन हे ‘ रविकिरण-मंडळा ’तले प्रतिभासंपन्न कवि. ‘ रविकिरण-मंडळा ’नें काव्यक्षेत्रांतील वृत्तांचे, विषयांचे आणि रचनेचे जे विविध प्रयोग केले त्यांना माधवरावांची प्रेरणाच मुख्यतः कारणीभूत होती. ते फारसी वाङ्मयाचे

पंडित होते. त्या वाङ्मयांतील अनेक आकर्षक गोष्टी त्यांनीं मराठींत आणल्या. आधुनिक काव्याला — गझलाला लोकप्रियता त्यांनींच मिळवून दिली. प्रेम-गीतांतून पूर्वीपेक्षां अधिक मोकळेपणानें आणि डौलदारपणानें विविध भावना चित्रित करण्याचें श्रेय त्यांच्याकडेच जातें. असें असूनहि त्यांचें कविमन आत्मनिष्ठ नव्हतें. प्रीतीइतकेच ते समतेचे आणि उदात्ततेचे पूजक होते; अन्यायाचे, विषमतेचे आणि ढोंगासोंगांचे कट्टर विरोधक होते. ' भ्रांत तुम्हां कां पडे ? ', ' पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास ', ' सुधारक ' वगैरे त्यांचीं लहानमोठीं काव्यें त्यांचें सामाजिक मन किती जागृत आणि भावनाशील होतें हें दर्शवितात.

' मराठी असे आमुची मायबोली ' या मातृभाषेवरील भक्ति व्यक्त करणाऱ्या कवितेपासून ' रामद्वारीं ' या विश्वाचें नियंत्रण करणाऱ्या अदृश्य शक्तीविषयीं वाटणारी आर्तता दर्शविणाऱ्या कवितेपर्यंत विविध रसांच्या, भावनांच्या आणि विचारांच्या कविता माधवराव पटवर्धनांनीं लिहिल्या आहेत. किंबहुना त्यांच्या कवितेनें त्यांच्या जीवनाच्या जोडीनें प्रवास केला आहे. त्यांतल्या चढउतारांच्या आणि सुखदुःखांच्या अनुरोधानें ती बदलत गेली आहे. आयुष्याच्या निरनिराळ्या कालखंडांतील विविध अनुभूति त्यांच्या काव्यांत प्रामाणिकपणानें प्रतिबिंबित झाल्या आहेत. ' विरहतरङ्ग ' हें त्यांचें खंडकाव्य त्यांचें पांडित्य, कल्पकता व भावनाशीलता यांतून निर्माण झालें आहे. ' सुधारकां 'त त्यांची उपरोधप्रियता व सामाजिक दृष्टिकोन या गुणांचें वाचकांना स्पष्ट दर्शन होतें. मराठी कवितेच्या दुर्दैवानें बालकवि व गडकरी यांच्याप्रमाणें हा प्रतिभासंपन्न कवीहि अकालींच दिवंगत झाला. ' पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास ' ही माधवरावांची कविता दुसऱ्या महायुद्धापूर्वी इटलीनें अबिसीनियावर जें आक्रमण केलें त्या प्रसंगाला उद्देशून लिहिली आहे.

● ● ●

पश्चिमेच्या मारुताचे हे उसासे ऊन कां ?
ऊन हें सेवूं नका.
कां उसासे टाकितों मी — सत्य घ्या हें ऐकुनी —
येइं मी जें देखुनी

तो पहा दूर प्रतीची डोम्ब आगीचा पहा,
होय त्याचा ताप हा.

आर्द्र अङ्गीं सागराच्या लोळुनी आलों तरी
आग होई अन्तरीं.

पावलों उत्तुङ्ग ह्या सह्याद्रिच्या शृङ्गावरी
दाह जीवाचा परी.

धूर जो तेथील माझ्या काळजाला झोम्बला
घेरि आणी तो मला.

जाइना डोळ्यांपुढूनी दृश्य जें मीं पाहिलें
जाइना तें साहिलें!

ने कसे कासार काठीं शान्तिपाठीं पण्डितीं,
मञ्जुनादें मण्डिती.

आणि त्यांची गोड पुङ्गी दुर्बळांना गुङ्गवी,
स्वत्व त्यांचें लुङ्गवी.

जाणती नेणीव साधूंची न साधे ती मला,
जीव हा वैतागला.

कृष्ण राष्ट्राच्या इतिश्रीची घडी ही पातली,
दिग्बुभुक्षा मातली.

धाड घाली लाण्डगी साम्राज्यलोभें झिङ्गली
श्यामलांच्या जङ्गलीं.

स्वीय उच्छ्वासासवें दे सोडुनी नाना विषें
मुक्तिदानाच्या मिषें.

अन्तराळांतून झेपा घालुनी घारीपरी
वृष्टि अग्नीची करी.

चाङ्गलें भाजून खावें मांस साङ्गे संस्कृती
गौरवर्णँ चारु ती

संस्कृताची याच शिक्षा श्यामलांनीं द्यावया
पातली देखा बया.

हीं द्विपाद प्राणधारी जङ्गली का माणसें ?
मेन्दु हा त्यांना नसे.

बाहुचें सामर्थ्य आहे कोट छातीचा खडा,
होय जीवाचा धडा.

फोल हें यन्त्रापुढें; बुद्धिप्रतापांच्या पुढें
क्षात्र आतां बापुडें.

हें हटे, झुञ्जे हटानें, घाव घे छातीवरी,
साह्य कोठें ईश्वरी ?

फोल आतां न्यायनीतीच्या जुन्या त्या कल्पना,
धर्मभोळ्या जल्पना.

धर्मबन्धुत्वाचिया डोक्यावरी ही पाय दे
माजली सत्तामदें.

युद्ध धर्माशींच चाले, धर्मयुद्धीं या नव
दीन तो जो मानव

हिंस्र शस्त्रास्त्रें नवीं जो निर्मुनी नानापरी
दुर्बलांना संहरी,

आपुल्या देवापरी जो दुर्बलांचा घातकी
तो कशाचा पातकी ?

हा निमित्ताचा धनी योगेश्वराचा हा सखा
दोष या पार्थास कां ?

दुर्बलत्वालाच मानी पाप तो जिङ्की जगा
सत्य सैतानी बघा.

दोष आतां आपुल्या ह्या रानटी नीतीप्रती
जीर्ण होई क्षिप्र ती.

बायका पोरें रडूं द्या, त्यांस रक्षा जोहरीं,
अन् रणींचीं मोहरीं.

घेउनी गाडूनि खेतीं झुञ्जुं द्या हारींत ही
राजपूती रीत ही !

सर्वनाशाच्या प्रसङ्गीं स्वत्व अर्धे सोडिना
शत्रु मैत्री जोडिना,

त्या नृसिंहाला शहाणे निन्दिती, निन्दोत ते
भानु तो खद्योत ते !

टेकला अस्ताचलीं तो तापल्या सोन्यापरी
स्वप्रभा दावी खरी.

वानु द्या चङ्गीझ-तैमूरादि जे त्यांना कुणी
दास अर्थाचे गुणी;

या पराभूतापुढें झुञ्जार माझी मान मी
वांकवूनी त्या नमीं

श्यामलाच्या हे नरेन्द्रा तूजसाठीं आंसवें
उष्ण उच्छ्वासासवें.

मीहि जातों संस्कृतीच्या पार कैवल्याश्रमीं —
कां भ्रमूं येथें श्रमी ?

खड्ग त्या दुर्धर्ष गौरीशङ्कराच्या सङ्गती
वीण कोठें सद्गती ?

*माधव ज्यूलियन*

• • •

## अभ्यास

१ ' युद्ध धर्माशींच चाले, धर्मयुद्धीं या नव दीन जो तो मानव. ' या ओळींत कवीनें वर्णन केलेल्या युद्धाचें स्वरूप स्पष्ट करून सांगा.

२ या कवितेंतला ओजस्वीपणा विविध आहे. तो कोणकोणत्या कारणांनीं निर्माण केला आहे तें पाहा.

३ या कवितेंतला नृसिंह कोण, त्याची माहिती मिळवा. कवीनें त्याची केलेली स्तुति योग्य आहे असें तुम्हांला वाटतें काय ?

४ या कवितेचा आरंभ व अंत यांवरून दिसून येणाऱ्या कवीच्या कल्पकतेचें सौंदर्य विशद करून सांगा.

• • •

# १७

## कषायपेयपात्रपतित माक्षिकेप्रत —

### परिचय

मराठी वाचकांना श्री. अत्रे अनेक नाट्यांनीं प्रिय व परिचित आहेत. पण त्यांच्या प्रतिभेचा सर्वांत चमकदार पैलू विनोदाचाच आहे. त्यांच्याइतकी विविधतेंत रमणारी, पदोपदीं बुद्धिचापल्य दर्शविणारी आणि आपल्या भोंवतालच्या

दैनंदिन जीवनांतून स्फूर्ति घेणारी विनोददृष्टि क्वचितच आढळते. त्यांच्या या अपूर्व शक्तीचा आविष्कार पुढें ‘ साष्टांग नमस्कार ’ व ‘ लग्नाची बेडी ’ यांसारख्या नाटकांत आणि ‘ ब्रह्मचारी ’ व ‘ अर्धांगी ’ यांसारख्या चित्रपटांत झाला असला, तरी ती किती तेजस्वी आहे हें ‘ झेंडूचीं फुलें ’ या त्यांच्या १९२५ सालीं प्रसिद्ध झालेल्या विडंबनपर काव्यसंग्रहावरूनच प्रथम सिद्ध झालें. ‘ झेंडूचीं फुलें ’ प्रसिद्ध होण्यापूर्वी मराठींत विडंबनपर कविता क्वचितच लिहिली जाई. त्यामुळें कल्पकतेनें नटलेलीं, मिस्किलपणानें फुललेलीं आणि ओळीओळींतून हास्याचीं कारंजीं उडविणारीं ‘ झेंडूचीं फुलें ’ प्रथमतः प्रसिद्ध झालीं तेव्हां वाचक जितके विस्मित तितकेच आनंदित झाले. गेल्या दोन तपांत या बाबतींत अत्र्यांचें पुष्कळ अनुकरण झालें. पण त्यांच्या विडंबनांतली चमक आणि खुमारी दुसरा कोणीहि दाखवूं शकला नाहीं. हीं विडंबनपर काव्यें म्हणजे एक प्रकारच्या पद्यमय विनोदी टीकाच आहेत. ज्यांच्यांतले समास सोडविण्याकरितां एकाद्या शास्त्रीबोवांनाच बोलवावें लागेल अशा ‘ कषायपेयपात्रपतित मक्षिकेप्रत —’ या मालगाडीसारख्या लांबलचक नांवावरूनच अत्र्यांची विडंबनाची धार किती तीक्ष्ण आहे याची कल्पना येईल ! कविता ही भावनेच्या आविष्काराकरितां असते हें विसरून क्लिष्ट संस्कृत शब्दांच्या लांबलचक समासांच्या आणि रुक्ष कल्पनांच्या गोणी तिच्या पाठीवर लादणाऱ्या कवींचें या कवितेंतलें विडंबन तर अत्यंत मनोरंजक आहेच; पण त्यापेक्षांहि अत्र्यांच्या विनोदी कल्पकतेनें तिला जी रंगत आणली आहे, उपहास आणि उपरोध यांच्या साहाय्यानें त्यांनीं या लहानशा कवितेंत जी प्रखर सामाजिक टीका केली आहे तिला मराठी विनोदी कवितेंत दुसरी तोड नाहीं.

● ● ●

‘ हा हन्त हन्त नलिनीं गजमुज्जहार ! ’

अयि नरांग—मल—शोणित—भक्षिके
जनु—विनाशक—जंतु—सुरक्षिके, !
असु—परीक्षित—हारक—तक्षिके,
‘ क्या हुआ अफसोस ! ’ मक्षिके

या प्रभातसमयास मंगल,
चमकती दंवमौक्तिक निर्मल,
गात[1] पक्षिगण हा गगनीं फिरे,
पण दशा तव काय अरे–अरे–!
ओसरीवरुनि या तव मैत्रिणी
गात स्वैर फिरतात सुलक्षणी
परि तुला न बघती मुळि ढुंकुनी
'संकटीं जगिं कुणा न असे कुणीं!'
मंडई नव्हति का तुज मोकळी,
कीं मिठाइ 'मथुरा[2]–भुवनां'तली,
नव्हति कां 'उपहार[3]–गृहें' खुलीं,
म्हणुनि आलिस नेमकि या स्थळीं!
त्यजुनि शांत शहरांतिल बोळ ते,
मनुजवस्तिंत आलिस कां इथें?
करित 'दत्तु–भट'[4] काय तपासणी
म्हणुनि घाबरुनि आलिस तूं झणीं!

---

१ माशांचें गाणें निवळ माशा मारीत बसणाऱ्या लोकांना कोठून ऐकूं येणार? जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे!

२ उदबत्त्यांनीं पुण्यांत म्हैसूर आणलें तर आटीव दुधानें पुण्यांत मथुरा आणली. सदर 'भुवनां'तून मिठाईबरोबर माशाहि मनमुराद मिळतात.

३ प्रस्तुत शब्दांतील एका मात्रेचा फराळ पुण्यांतील हॉटेलांनीं केला असल्या-मुळें येथें मात्रादोष अपरिहार्य आहे.

४ सदरहू महात्म्याच्या नांवाचा एकवचनी उल्लेख केवळ त्या ओळींत अधिक शब्द बसेनात म्हणून केलेला आहे, याबद्दल उदार रसिक क्षमा करतील अशी आशा आहे.

शर्कराकण येथिल सांडले
सेवुनी न तुज सौख्य जाहलें ?
कीं ' यमी 'करिचें गुळखोबरें,
शमवि भूक न काय तुझी बरें ?
पेय बोलुनिचालुनि घातकी,
बुडवितें बघ भारतियांस कीं
या अशा व्यसनांत विलायती,
अडकतां फळ दारुण शेवटीं !
नर जसा बुडतो भवडोहीं
तेविं खालिंवर जासि अयाई !
काडि वांचवि तरी बुडल्याला,
काडिचा न परि आश्रय गे तुला !
स्थिति तुझी करुणास्पद ही अशी,
बघुं तरी उघड्या नयनीं कशी ?
अंगि तेंवि भरलें भयकांपरें,
आणि त्यांत निवला न चहा बरें !
हाय ! सोडुनि जाशिल ना अम्हां,
छे, सले नुसती मनिं कल्पना !
समिप पाउसकाळहि पातला,
आणि तूं निघुनि जाशिच आजला
अहह, आम्रफळ—मोसम[१] येइल,

---

१ सदरहू समासांतील मिश्र उत्पत्तीच्या शब्दांचा उघड उघड संकर केल्यामुळें मिश्रविवाहाला प्रस्तुत कवीचा पाठिंबा आहे अशी गैरसमजूत आर्यवाचकांनीं करूं नये.

अम्हि[1], असूं परि तूं नसशील !
फेकुं साल्टिं चोखुनि चोखुनी,
तुजविना पण जातिल वाळुनी
तुजविना कविमुखें दिसतील कीं,
भृंगहीन कमळासम तीं फिकीं,
कौन्सिलांत, सभासद आणी,
मारतील कवणा तुजवांचुनी ?
राजकारण रोज नवें नवें
राष्ट्रभक्त करण्यास तयार हे.
शिंकुनी अहह ! देइल यापुढें,
त्या इशारत कोण तरी गडे ?
यापरी नव–तरंग मनांत,
येउनी हृदय होय कंपित
पेयपृष्ठिं उठली इतुक्यांत,
मंद–श्वास–लहरीसह लाट !

• • •

फड फड फड पंखा हालवी ती तराया,
तडफड बहु केली, जाहले कष्ट वायां,
मिटवुनि इवलेसे पाय, ती शांत झाली;
अहह, तडक आणी खालतीं खोल गेली !

१ सदरहू मात्रालोप हेतुपुरःसर करतांना कवीला पुढील ओळीचा अभिमानानें उल्लेख करावासा वाटत आहे. ‘ स्वराज्य **आणि** त्यासवें **अम्हि** गमाविला मोहरा ! ’

टाकुनी लांब सुस्कारा, उमाळा दाबुनी उरीं,
चहा तो शांत चित्तानें, प्राशिला वरचेवरी.

केशवकुमार

● ● ●

## अभ्यास

१ ह्या कवितेंतल्या अत्यंत हास्यकारक अशा पांच कल्पना सांगा. त्यांपैकीं प्रत्येक हास्य कोणत्या कारणामुळें निर्माण करतें याचें विवेचन करा.

२ ' उपहार-गृहें ' या शब्दाची या कवितेंतील योजना व तिच्यावरली कवीची टीप यांची चर्चा करा.

३ ' आम्रफळ—मोसम ', ' क्या हुआ अफसोस मक्षिके ', ' पण दशा तव काय अरे—अरे ',—' आणि असु परीक्षित हारक तक्षिके ', ' फड फड फड पंखा हालवीती तराया ' यांपैकीं प्रत्येकांत कवीनें कोणत्या कवीचें विडंबन केलें आहे तें सोदाहरण सांगा.

४ विडंबनपर कविता व विनोदी कविता यांतला फरक काय ? ही कविता तुम्ही कोणत्या वर्गात घालाल ?

● ● ●

# १८

## चांदरात

### परिचय

विविध प्रकारचें गद्यलेखन करणारे वरच्या दर्जाचे लेखक – विशेषतः श्रेष्ठ लघुनिबंधकार म्हणून श्री. काणेकर ओळखले जातात. तथापि त्यांना पहिली लोक-

प्रियता मिळाली ती त्यांच्या ‘ चांदरात ’ या संग्रहांत समाविष्ट झालेल्या कवितांमुळें. ‘ चांदरातीं ’तल्या कांहीं थोड्या कवितांवर बालकवींची अंधुक छाया असली, तरी काणेकर कवि म्हणून पुढें आले तेव्हां लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या ‘ रविकिरण-मंडळा ’च्या कवितेचे अस्पष्ट प्रतिध्वनीसुद्धां त्यांच्या काव्यांत कोठें आढळत नाहींत. त्यांच्या कवितेचा थाट बहुतांशीं स्वतंत्र आहे; त्यामुळेंच ती चटकन् लोकांच्या डोळ्यांत भरली. ती विपुल नसली तरी विविध आहे. सृष्टिसौंदर्यानें वेडावून जाणाऱ्या मनापासून सामाजिक विषमता पाहून संतप्त होणाऱ्या मनापर्यंत अनुभूतींच्या सर्व छटा काणेकरांनीं कवितेंत चित्रित केल्या आहेत. विविध गीतें लिहितांना कल्पकता, भावना व विचार यांच्यांतल्या परंपरागत संकेतांचा ते आंधळेपणानें स्वीकार करीत नाहींत. त्यामुळें लहान लहान चुटक्यांसारख्या वाटणाऱ्या त्यांच्या कवितांतूनहि जिवंतपणामुळें निर्माण होणारा गोडवा अथवा चटकदारपणा आढळतो. ‘ ३१ डिसेंबर १९२६ ची मध्यरात्र ’ ही त्यांची अगदीं साधी कविता घेतली तरी ती त्यांच्या व्यक्तित्वानें रंगली आहे असें दिसून येईल. एक वर्ष संपलें, दुसरें सुरू झालें या भावनेनें विषण्ण झालेलें कविमन —

*‘ असेल काळाहातीं मरणें । परी आमुच्या हातीं जगणें*
*कां नच मग वीरोचित जगणें ? । अभिमानानें हांसत मरणें ’*

या विचारापर्यंत कसें पोंचतें हें त्यांनीं या कवितेंत दाखविलें आहे. ‘ दिवाळी, तो आणि मी ’ हें त्यांचें हृदयस्पर्शी सुनीत असेंच आकर्षक आहे. बाह्यतः अगदीं साधें पण भावनेच्या सूक्ष्म अग्राच्या एका टोंचीनें काळजाला बेचैन करून सोडणारें! दिवाळीच्या दिवशीं घरोघर मंगल अभ्यंगस्नानें सुरू असतांना हौदावर थंड पाण्यानें आंघोळ करीत बसलेला एक मनुष्य कवीला दिसतो, एवढाच तिचा विषय आहे. ‘ चांदरात ’ या त्यांच्या कवितेंत कल्पकता, चित्रण-सौंदर्य आणि कवीचें व्यक्तित्व यांचें सुंदर मिश्रण झालें आहे.

● ● ●

चान्दरात पसरिते पांढरी माया धरणीवरी;
लागली ओढ कशी अन्तरीं !

हा तालतरू गंभीर शांतता धरी;
लेवूनि सुधेचें वल्कल अंगीं शिरीं,
कुणि शुचिर्भूत मुनि तपा जणूं आचरी !
केंस पिंजुनी उभी निश्चला कोणी वेडीपिशी,
भासते छाया काळी तशी !
जलवलयाचे तरल रुपेरी नूपुर पदिं बांधुनी,
खळखळत गुंग झरा नर्तनीं.
पाण्ढरा पारवा हूं हूं कोठें करी,
क्षण मंद वायुनें लता हले कांपरी,
जणु शांतताच ही निःश्वसनातें करी !
लपतछपत विधुकरण खेळती हिरव्या पानांवरी;
लागली ओढ कशी अन्तरीं !
निळ्या, तांबड्या, हिरवट, पिवळ्या तेजाची सांडणी,
करितसे व्याधाची चांदणी.
बेफाम पसरिते पंख हृदय-पांखरूं,
उडुनिया पहातें अनंत अंबर भरूं !
या इवल्या देहीं कसें तया आवरूं !
चैन पडेना काय करूं — ही आग लागली उरीं,
लागली ओढ कशी अन्तरीं !

*अनंत काणेकर*

• • •

## अभ्यास

१ 'केंस पिंजुनी उभी निश्चला, कोणी वेडीपिशी, भासते छाया काळी

तशी ' या ओळींची चर्चा करा. त्यांच्यामुळें कवितेच्या सौंदर्यांत भर पडली आहे काय ?

२ ' कवीची कल्पकता आणि त्याची निरीक्षणशक्ति यांचा सुंदर मेळ या कवितेंत पडला आहे ', या विधानाचें विवेचन करा.

३ निसर्गसौंदर्याच्या सान्निध्यांत कवि अस्वस्थ कां होतो ?

४ ' दोन देवभक्त ' ही काणेकरांची कविता वाचून या दोन्ही कवितांतल्या भाषाशैलींची तुलना करा.

• • •

# १९

## काम आणि आराम

### परिचय

कवि अनिल हे माधव ज्यूलियन व यशवन्त यांच्याच पिढींतले कवि. ' फुलवात ' आणि ' पेर्ते व्हा ' हे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. ' भग्नमूर्ति ' या नांवाचें एक खंडकाव्यहि त्यांनीं लिहिलें आहे. अनिल रविकिरण-मंडळाचे सम-कालीन कवि असले तरी प्रतिभा व प्रवृत्ति या दोन्ही गोष्टींत ते या कवींच्यापेक्षां बरेचसे भिन्न आहेत. मुक्तछंदाचा पुरस्कार करून त्यांनीं मराठी कवितेला नव्या काळाला अनुरूप असें वळण लावण्याचा प्रयत्न केला. ' निर्वासित चिनी मुलास ' या प्रदीर्घ कवितेंत मुक्तछंदाचा त्यांनीं प्रभावी रीतीनें उपयोग केला असून, नवे नवे कवि या रचनेकडे अधिक अधिक प्रमाणांत आकृष्ट होत आहेत, याचें श्रेय मुख्यतः त्यांनाच दिलें पाहिजे.

' फुलवात ' या काव्यसंग्रहांतील त्यांची कविता बरीचशी आत्मलक्षी व क्वचित् किंचित गूढ आहे; पण ' पेर्ते व्हा ' या त्यांच्या पुढल्या काव्यसंग्रहांत त्यांची वृत्ति पूर्णतः समाजनिष्ठ झालेली दिसते. ' गरीब आणि पावसाळा ',

'मानवता', 'बंड' इत्यादि त्यांच्या कविता या वृत्तीच्या द्योतक आहेत. मात्र त्यांची वृत्ति समाजसन्मुख झाली असली तरी त्यांच्या कल्पनेचा आणि शैलीचा कोमलपणा 'फुलवाती' प्रमाणेंच 'पेर्ते व्हा' या संग्रहांतहि आढळतो. 'काम आणि आराम' ही त्यांची मुक्तछंदांतली कविता विसाव्या शतकानें मानवापुढें निर्माण केलेल्या विचित्र समस्येचें — सोन्याच्या ताटांतल्या विषसिंचन केलेल्या पंचपक्वान्नाप्रमाणें वाटणाऱ्या आजच्या जीवनाचें चित्रण करीत आहे.

● ● ●

असंख्य फुलें
डोलत आहेत उषःप्रभेचीं
झुळझुळणाऱ्या तरल वायूच्या लहरीवरी
निळा रंग त्यांचा
तसेंच वरती निळें आकाश
प्रसन्न प्रभात
नभांत—मनांत
ओसरल्या आतां हस्ताच्या सरी
ते काळे ढग—भेसूर वादळें—
आणि ते विजांचे कडकडाट—
गंभीर गर्जना —
पावसाच्या झडी—अंधारल्या दिशा—
संपलें सारें
त्यांतूनच आली पुन्हा ही उषा......
आनंद...आल्हाद... !
निसर्गसौंदर्य—
विभवसंपदा मानवजातीची—
हा शांतरस—जीवनरस—

मानवासाठीं
निश्चिंत घ्यावया अखंड आस्वाद......
चाखतो पण तो जरा न कुठें
सुखभरानें भारावून डोळे
तोच हो त्याचें मन विन्मुख
अस्थिर अधीर...
वाहूं लागतो किंचित् वेगानें
रुधिरप्रवाह......
तीं त्याचीं कामें......!
हीं आणि तीं—ते वाढते ढीग—
ते व्याप व्यापार—
अपरंपार......
छे–छे–निसर्गा
नाहीं वेळ त्याला
पाहाया तुझ्या ह्या अनंत लीला
हा तुझा खेळ
आहे मात्र त्याचा वेळ घेणारा
धावपळ त्याची अखंड चालू
ह्या जन्मीं नाहीं—
निदान आतां—
रिकामपणाची सोबत तुझी—!
आधीं त्याचें काम...नंतर आराम !!
आणि त्याचीं कामें
आतां न राहिलीं आहेत त्याचीं
त्याच्या जीवनाचीं—

जीवनहि आहे त्याचें कुठें आतां ?
त्यानेंच निर्माण केलेलीं भुतें
करून घ्यायाला आपलें काम
त्यालाच आहेत राबवीत नित्य
गुलामापरी
रात्रंदिन आणि अर्ध्यापोटींहि !
पाहा हीं कामें–त्याचीं–मानवाचीं...
निसर्गा तुझ्याशीं झुंज देऊन
विजय पाहा हे मिळविले त्यानें
पाहिलेस का ते हजारों मजूर—
मानवच बरें—
रात्रीचा दिवस करून बिचारे
बांधीत आहेत प्रचंड नौका
तुझ्या ढगांचा गडगडाटहि
विरून जाईल एवढा प्रचंड घणघणाट
चाललेला आहे वर्षभर येथें...
आतां ही नौका
शिरणार तुझ्या अथांग सागरीं
कितीहि जरी तूं उसळविलें
बेफाम तुफान
तेंहि न शकेल बुडवूं तिला
ती शक्ति नाहींच तुझ्यांत आतां
तेंहि आहे कार्य मानवांचेंच
कुशलतेचें !
पाहा ते शास्त्रज्ञ—ते थोडे लोक—

ते कारागीर—किती काळजीनें
घडवीत तो आहेत तेथें
पाणसुरुंग
पेरूनी देतील त्यालाहि तेच
त्याच सागरांत

आणि त्याचा होतां जरा कुठें स्पर्श
उडेल धडाका
प्रचंड नौका ती जाईल क्षणांत
रसातळाला !

हासत असेल निसर्ग तेव्हां
उपहासानें
पाहून हीं सारीं कामें मानवांचीं
सहस्रांचें तें अहोरात्र कार्य
एका वर्षाचें
एकाच क्षणांत
चक्काचूर करणारें तें
दुसरें कार्यहि थोड्या लोकांचें !

इकडे जीवास वांचवावया
कुशल त्याचे धन्वंतरी, वैद्य
औषधें, गोळ्या...

तिकडे तेच जीव घ्यायाला
त्याहून कुशल शास्त्र–कारागीर
तोफा आणि गोळे.....
..................

म्हणत असेल .........
............उपद्व्याप हे
ह्यांच्याचसाठीं कां मानवालागी
ते दोन हात
एक जोडाया ... एक मोडाया ?
दोन्हीहि आहेत करीत काम !
मिळेल कसा ह्यांना आराम ! !

अनिल

• • •

**अभ्यास**

१ या कवितेच्या प्रारंभीं निसर्गसौंदर्याचें वर्णन कवीनें कशासाठीं केलें आहे ?

२ ‘ माणसाचा खरा शत्रु माणूसच आहे; निसर्ग नाहीं ’, या विधानाची या कवितेच्या आधारें चर्चा करा.

३ मुक्तछंदामुळें या कवितेंत कांहीं विशेष सौंदर्य किंवा सामर्थ्य निर्माण झालें आहे असें तुम्हांला वाटतें काय ?

४ ‘ त्यानेंच निर्माण केलेलीं भुतें — त्यालाच आहेत राबवीत नित्य ’, या ओळींचें सविस्तर विवेचन करा. या भुतांच्या तावडींतून मनुष्य कसा मुक्त होईल ?

• • •

अनुक्रम
विभाग ..............
क्रमांक ....
नों. दि. ....

# २०

## जलद भरुनि आले

### परिचय

' रविकिरण–मंडळा 'नंतरच्या पिढींतील कवींपैकीं बोरकर हे एक प्रमुख कवि होत. त्यांची कविता विविध संस्कारांनीं सुशोभित झाली आहे. तरल कल्पकतेचें व नाजुक भावगर्भतेचें लेणें त्यांच्या प्रतिभेला स्वभावतःच मिळालें आहे. त्यांतच लहानपणापासून संत-वाङ्मयाची गोडी लागलेली. मुग्ध वयापर्यंतचें सारें जीवन गोमंतकाच्या अत्यंत सुंदर अशा निसर्गाच्या सान्निध्यांत गेलेलें. त्यामुळें त्यांच्या कवितेला एकीकडून उदात्ततेची व दुसरीकडून सौंदर्याची बैठक मिळाली. पुढें काव्यलेखन सुरू केल्यावर तांब्यांच्या कवितेचा त्यांच्यावर थोडाफार परिणाम झाला. तसें होणें स्वाभाविकच होतें. प्रतिभेच्या प्रकृतिधर्माच्या दृष्टीनें आधुनिक कवींपैकीं इतर कोणापेक्षांहि त्यांचें तांब्यांच्याशींच अधिक साम्य आहे. मात्र त्यांच्या पहिल्या कांहीं कवितांवर तांब्यांच्या रचनेची छाया असली तरी पुढें लौकरच त्यांचें स्वतंत्र मोहक व्यक्तित्व कवितेंतून प्रकट होऊं लागलें. ' प्रतिभा ', ' जीवन संगीत ' व ' दूधसागर ' हे त्यांचे तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. ' जीवन संगीत ' व ' दूधसागर ' यांच्यांतल्या अनेक कवितांत त्यांचे सर्व काव्य-गुण समरसतेनें प्रकट झाले आहेत. त्यांची नादमधुर सुंदर शब्दरचना पाहावयाची असेल तर ' सांध्यसुंदरी 'चा आरंभ पाहावा. ' इंद्रनील चंद्रकान्त सांध्यसुंदरी ही। येइ हंसत मधुरमंद विश्वमंदिरीं ही। ' या ओळींशेजारींच ' दुखणाईत दिवा ' या कवितेंतल्या दारूबाजाच्या दरिद्री खोपटाचें वर्णन करणाऱ्या ' दुखणाइत हा जळे दिवा। खोकत खोकत काजळ ओकत। कुजट करी ही दमट हवा। बघति त्याकडे जीर्ण चिरगुटें। मडकीं, डबडीं आणि तवा। ' या ओळी ठेवल्या म्हणजे ते केवळ शब्दांच्या नादानें गुंगून जात नसून रसपरिपोषक शब्दयोजना करण्याचें कौशल्य त्यांच्या अंगीं विपुलतेनें वास करीत आहे अशी खात्री होते. ' स्पर्श 'मधली ' धूप जळे हा तिमिराचा पवनीं। विनिद्रनयना व्याकुळ अवनी। पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळ्या। ' या कडव्यांतली त्यांची कल्पकता जेवढी विलोभ-

नीय आहे, तेवढीच ' साद ' कवितेंतली ' परदुःखावर शिजलें जें सुख। विटाळलें जरि तेणें हें मुख। या हृदयांतुनि त्या दुःखाचे उठवी शत पडसाद। ' या परमेश्वराला केलेल्या प्रार्थनेंतली आर्त भावनाहि हृदयंगम आहे. ' दूधसागर 'मधल्या ' बांगड्या ' आणि ' सायंप्रार्थना ' या कविता एकदम वाचल्या कीं बोरकरांची प्रतिभा सर्वस्पर्शी व जितकी बहिर्मुख तितकीच अंतर्मुख आहे हें ध्यानांत येतें. ' जलद भरुनि आले ' या त्यांच्या कवितेंत निसर्गाचें मोठें रम्य व रेखीव चित्र आहे. या कवितेंतलें शब्दसौंदर्य, नादमाधुर्य, रंगसौंदर्य इत्यादि सर्वच गोष्टी मोठ्या मोहक आहेत. तांबे, बालकवि, केशवसुत वगैरे कवींची उज्ज्वल परंपरा पुढें चालविण्याचें सामर्थ्य ज्या तीन चार तरुण कवींनीं निःसंशयपणें प्रकट केलें आहे त्यांच्यांत बोरकरांची गणना कुणीहि रसिक न चुकतां करील. महात्मा गांधींच्या जीवनयात्रेवर एक महाकाव्य लिहिण्यांत ते सध्यां गुंतले आहेत.

• • •

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले ॥ ध्रु० ॥

दिन लंघुनि जाय गिरी
पद उमटे क्षितिजावरि
पद्मराग वृष्टि होय माड भव्य न्हाले १

धुंद सजल हसित दिशा
तृणपर्णीं सज्ज तृषा
तृप्तीचें धन घनांत बघुनि मन निवालें. २

उलट बघुनि हरिकरुणा
हरित धरा हो गहना
मंदाकिनिवरुनि धवल विहगवृंद डोले ३

रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल, पल सलील
हिरव्या तटिं नांवाचा कृष्ण मेळ खेळे. ४

मीन चमकुनी उसुळे
जलवलयीं रव मिसळे
नवथर रसरंग गहन करिति नयन ओले ५

धूसर हो क्षितिज त्वरित
ढोर पथीं अचल चकित
तृण विसरुनि जवळिल तें खिळवि गगनिं डोळे ६

टप, टप, टप पडति थेंब
मनिं वनिंचे विझति डोंब
वत्सल ये वास, भूमि आशीर्वच बोले, ७

बा. भ. बोरकर

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## अभ्यास

१ या कवितेंतील वृत्तयोजना, शब्दयोजना व प्रतिमायोजना यांचें सौंदर्य स्पष्ट करून सांगा.

२ पावसाच्या पहिल्या सरीनें ‘ मनिं वनिंचे विझति डोंब ’ असें कवि कां म्हणतो ?

३ बोरकर गोमंतकीय कवि आहेत हें सुचविणाऱ्या कोणत्या गोष्टी या कवितेंत आहेत ?

४ ‘ बालविहग ’ व ‘ चांदरात ’ यांच्याप्रमाणें ही कविताहि सृष्टिवर्णनपर आहे; तथापि यांपैकीं प्रत्येक कवितेंत त्या त्या कवीचें व्यक्तित्व प्रतिबिंबित झालें आहे. तें शोधून काढून या तीन कवितांची सौंदर्यदृष्टीनें तुलना करा.

●●●

# २१

## नवें वर्ष

### परिचय

वा. रा. कान्त हे औरंगाबादचे कवि बोरकर, कुसुमाग्रज वगैरेंच्या बरोबरीचेच. 'रुद्रवीणा' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्याशिवाय 'आशिया', 'अग्निपथ' वगैरे खंडकाव्यें त्यांनीं लिहिलीं असून त्यांच्या शंभर रुबायांचा एक संग्रहहि प्रसिद्ध व्हावयाचा आहे.

तांब्यांच्या कवितेचा गेल्या दहा-बारा वर्षांत पुढें आलेल्या तरुण कवींवर थोडाफार परिणाम होणें अपरिहार्य होतें. कान्तांचीं प्रेम-गीतें वाचतांना तो किंचित् जाणवतोहि. पण कान्तांचें सारें कविजीवन हैदराबाद संस्थानांत अगदीं अस्वस्थतेच्या काळांत गेल्यामुळें त्यांची कविता एका बाजूनें जितकी नाजुक व कल्पक, तितकीच दुसऱ्या बाजूनें उग्र व क्रांतीच्या आवाहनाला उत्सुक अशी झाली आहे. त्यांची कल्पकता पाहिली म्हणजे त्यांच्या हातून सर्व रसांचें व विविध भावनांचें चित्रण करणारी कविता निर्माण व्हायला कांहींच हरकत नाहीं असें वाटतें. परिस्थितीनें त्यांच्या या विविधतेला आतांपर्यंत मर्यादा घातल्या असाव्यात. आतां त्या कृत्रिम मर्यादा दूर झाल्यामुळें त्यांच्या प्रतिभेचा अधिक मनोहर विलास प्रकट होण्याचा संभव आहे. कारण रचनेच्या दृष्टीनें जसे तांब्यांच्या तसे मनोवृत्तीच्या दृष्टीनें केशवसुतांच्या ते अगदीं जवळ आहेत.

'नवें वर्ष' ही कान्तांची कविता १९४२ सालीं लिहिली गेली. 'कंठीं नररुंडांच्या माळा', 'साम्राज्यांचें भस्म कपाळा' या नव्या वर्षाचें वर्णन करणाऱ्या दोन ओळींचें मर्म कवितेच्या त्या रचनाकाळावरून लक्षांत येईल. क्रांतीशिवाय सध्यांच्या समाजाच्या प्रगतीला दुसरा मार्ग नाहीं अशी कान्तांची श्रद्धा आहे. जुनें इतकें कुजलें आहे कीं तें कापूनच टाकलें पाहिजे, तें औषधोपचारानें बरें होण्यासारखें नाहीं, या तीव्र भावनेनें त्यांच्या ज्या अनेक कविता रंगलेल्या आहेत त्यांपैकींच 'नवें वर्ष' ही एक आहे. त्यांची कल्पकता ह्या कवितेंतहि चांगल्या रीतीनें व्यक्त झाली आहे.

• • •

वर्ष नवें प्रकटलें
आज हें वर्ष नवें प्रकटलें.
प्रकटत असतां स्वर्गधरेचे सात ताळ हद्‌रले
वाहटुळी घोंघावत फिरती
स्तंभ धुळीचे गगन वेंधती
पिकलीं पानें मार्गि आक्रोशति
जुन्या जगाचे बंध आमुच्या देंठांसह उपटले !
आज हें वर्ष नवें प्रकटलें १

तोफांचा गडगडाट झाला
पश्चिमेस अन्‌ पूर्व दिशेला
घोरंदर रणयज्ञ भडकला
समुद्र उकळे, शिसें नभाचें त्या आगींत वितळले !
आज हें वर्ष नवें प्रकटलें २

रणधुमाळिची धूळ मुखावर
पोट रितें, प्रक्षुब्ध हृदंतर
नेसुनिया असिपत्र भयंकर
विराट तृष्णेंतुन संहारक संवत्सर उगवलें
आज हें वर्ष नवें प्रकटलें ३

कंठीं नररुंडांच्या माळा
साम्राज्यांचें भस्म कपाळां
प्रेतावरतीं नाच मांडिला
ओल्या मानवचर्माचें करिं निशाण फडकाविलें !
आज हें वर्ष नवें प्रकटलें ४

अपलक नेत्रीं ज्वाला फुलती
धूर लोळ केसांतुनि उठती
निश्वासीं बारूद पेटती
स्फोटक कुलुपी गोळे झेलित युद्धदेव पातले !
आज हें वर्ष नवें प्रकटलें ५

ये नव वर्षा, प्रलय करित चल,
नगरें, राज्यें नांगरीत चल,
शिरें बळींचीं अन् पेरित चल,
मानवतेचें पीक नवें ये उद्यां, सुगी ती साध बळें !
आज हें वर्ष नवें प्रकटलें ६

*कान्त*

## अभ्यास

१ ' शिरें बळींचीं अन् पेरित चल ', या चरणांतल्या कल्पनेचें सौंदर्य आणि सामर्थ्य विशद करून सांगा.

२ ' जलद भरुनि आले ', या कवितेंतली मृदु, मधुर भाषा आणि या कवितेंतली उग्र, कठोर भाषा यांची तुलना करा. वर्ण्य विषयाप्रमाणें कवीची भाषा बदलत जाते असें तुम्हांला वाटतें काय ?

३ या कवितेंतल्या तुम्हांला आवडणाऱ्या तीन कल्पना सांगा. त्या तुम्हांला कां आवडतात याविषयीं सविस्तर विवेचन करा.

४ कवीनें नव्या वर्षाचें रुद्ररूप या कवितेंत चित्रित केलें आहे. नवें वर्ष मानवतेला आशीर्वाद देण्याकरितां येत आहे अशी कल्पना करून त्याचें वर्णन करा.

# २२

## झंझावात

### परिचय

इंदिरा सन्त यांच्या कांहीं थोड्या कविता त्या व त्यांचे पति श्री. ना. मा. संत यांच्या ' सहवास ' नांवाच्या काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. तथापि त्या कवितांपेक्षां अधिक सुंदर व अधिक भावपूर्ण कविता त्यांनीं अलीकडे बरीच लिहिली आहे. ती निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली असली तरी अद्यापि संग्रहरूपानें प्रकाशित झालेली नाहीं. त्यांची प्रस्तुत कविता ' साहित्य ' द्वैमासिकाच्या ऑगस्ट १९४७ च्या अंकांतून घेतली आहे. इंदिराबाई अधून-मधून वाचनीय लघुकथाहि लिहितात.

भावना, कल्पना, रचना व शब्दयोजना ह्या सर्व दृष्टींनीं ' झंझावात ' कविता हृदयंगम आहे. झिमझिम पडणाऱ्या पावसाचें ' शिरिं पाझरणारी घागर घेउन कोणी । लाजून उभी ही गवळण वाटे धरणी । ' हें वर्णन, किंवा सैरावैरा वाहणाऱ्या वाऱ्याचें ' हा पिसाटापरी धावत वारा ओला । खळ दुःशासन कीं झोंबतसे धरणीला । ' हें चित्रण त्यांच्या कल्पकतेचा चांगला परिचय करून देतें. अगदीं आधुनिक अशा वातावरणाचें चित्रण करूनहि कवितेंतली रंगत कायम राखतां येते; त्या रंगतीला जुन्या संकेतांचीच आवश्यकता असते असें नाहीं, हें त्यांच्या ' हे मधें ठेविले दोन चहाचे पेले । चवदार तयांतिल वाफ उफाळुन खेळे । अन् तुझ्या करांतिल उंची शुभ्र सिगार । वलयांतुनि वितरे दर्प तिचा सुकुमार । ' या ओळींवरून स्पष्ट दिसून येतें. ' झंझावात 'मधली चिरविरहाची करुण कल्पना कवयित्रीनें मोठ्या आर्ततेनें आणि सूचकतेनें व्यक्त केली आहे. भावनेची तीव्रता वाढवायला वातावरणाचा किती कौशल्यानें उपयोग करून घेतां येतो हें या कवितेच्या रचनेवरून दिसून येईल.

● ● ●

तव आवडता बघ आला वर्षाकाल
किती कुंद गारठा भरुनी येत अभाळ
नाजूक झिमझिमे पाउस कौलांवरतीं
मधु वर्षागानीं तन्मय होती वृत्ती

शिरिं पाझरणारी घागर घेउन कोणी
लाजून उभी ही गौळण वाटे धरणी
तो धुंद लाजरा ओला डौल पहात
बेभान जाहलों आपण येथ घरांत

बाहेर गारठा बंद घराचीं दारें
किति ऊब सुखावह धगधगतात निखारे
अन् लपेटुनीया उनी कोट अंगाशीं
किती सुखकर वाटे बसणें खिडकीपाशी

हे मधें ठेविले दोन चहाचे पेले
चवदार तयांतिल वाफ उफाळुन खेळे
अन् तुझ्या करांतिल उंची शुभ्र सिगार
वलयांतुनि वितरे दर्प तिचा सुकुमार

सैगलचें चाले गान करुण गंभीर
त्या वातावरणा आणित न्यारा नूर
क्षणिं तोंच कडाडे वीज किती जोरांत
क्षणभरी लखलखे वसुधा अंधारांत !

अन् स्वप्नांतुन हें दचकुन उठलें चित्त
तें स्वप्नच कां हें स्वप्न पडावी भ्रांत !
नभ अवघें गेलें मेघांनीं व्यापून
चारही दिशांनीं आलें अंधारून

हा पिसाटापरी धावत वारा ओला
खळ दुःशासन कीं झोंबतसे धरणीला !
भयभीत बिचारीं गुरें, पांखरें पळती
त्या पाचोळ्याची कुणास ठावे नियती.

अन् थेंब टपोरे सर्पापरि ते थंड
वेगांत धावती फोडुन काळे खंड
कडकडे वीज मग उठे काय कल्लोळ
मिळण्यास निघाला तया धुळीचा लोळ.

हीं अतां घराचीं सताड उघडीं दारें
बेफाम धावती उभे त्यांतुनी वारे
तें पहात तांडव उभी राहते येथ
दडपून मनांतिल मनांत झंझावात !

इन्दिरा सन्त

● ● ●

## अभ्यास

१ आधुनिक वातावरण निर्माण करण्याकरितां कवयित्रीनें या कवितेंत कोण-कोणत्या गोष्टींचा उल्लेख केला आहे ? त्या साऱ्यांनीं कवितेच्या सौंदर्यांत कोणकोणत्या प्रकारची भर घातली आहे ?

२ एरव्हीं काव्यमय न वाटणारे कोणते शब्द या कवितेंत योग्य जागीं पडल्यामुळें रसपरिपोषक झाले आहेत ? केशवसुतांच्या 'तुतारीं'तलीं अशीं उदाहरणें शोधून काढा.

३ कवयित्रीनें पावसाळी वाऱ्याला दुःशासन म्हटलें आहे. तुम्हांला ही तुलना सार्थ व समुचित वाटते काय ?

४ ' तें पहात तांडव उभी राहते येथ। दडपून मनांतील मनांत झंझावात।' या ओळींतील कवयित्रीच्या मनःस्थितीचें वर्णन करा. निसर्ग आणि मनुष्याचें मन यांचा फार निकटचा संबंध आहे हें दर्शविणारीं अशींच इतर कवितांतलीं दोन उदाहरणें द्या.

●●●

# २३

## भविष्यकाला —

### परिचय

कृ. ब. निकुंब यांची कविता ' उज्ज्वला ' या काव्यसंग्रहांत समाविष्ट झाली आहे. तांबे, गिरीश व अनिल या पूर्व कवींचे संस्कार त्यांच्या कवितेवर झाले असले तरी शब्दांच्या नाजुकपणाबरोबर कल्पनेच्या कोमलपणाचें लेणें तिला जन्मतःच लाभलें आहे हें ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' यासारख्या त्यांच्या कवितेवरून सहज दिसून येतें. एका नववधूचें मन त्यांनीं या कवितेंत चित्रित केलें आहे. तिचें लग्न होऊन नुकतेंच वर्ष झालें आहे. सासरीं ती सुखी आहे; पण असें असूनहि माहेरच्या आठवणीनें तिचे डोळे भरून येतात. कालिदासाच्या मेघदूतांत यक्षानें जसा मेघाबरोबर आपल्या पत्नीला संदेश पाठविला, तशी येथें ही मुलगी वाऱ्याला आपल्या माहेरीं जायला, तिथें जाऊन आईच्या कानांत आपला निरोप सांगायला, विनवीत आहे. हा निरोप सांगतांना तिला माहेरच्या ज्या आठवणी येतात त्या किती हृदयंगम आहेत ! या मधुर गीतांत जी एकच उपमा आली आहे तीहि घरगुती आणि रसपरिपोषक आहे ! माहेराची ओढ लागलेली ही नववधू म्हणते —

' कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय। माया माझ्यावर दाट जशी तुझी माय।'

या कवितेप्रमाणेंच ' मी ', ' प्राजक्ताच्या शय्येवर झोंपलों ', ' हलुहलु येई रात ' व ' अकारण हुरहूर ' वगैरे त्यांच्या कविता सर्व दृष्टींनीं मोहक वटल्या आहेत.

मुक्तछंदामध्येंहि त्यांनीं रचना केली असून ‘ शिशिर अजून संपलाहि नाहीं ’, ‘ भविष्यकाला — ’ वगैरे या प्रकारच्या कविताहि वाचनीय झाल्या आहेत.

मानवी मन ज्या स्वप्नांवर जगत असतें त्यांचें जीवनांतलें महत्त्व ‘ भविष्य-काला —’ या कवितेंत त्यांनीं अत्यंत सुंदर रीतीनें वर्णन केलें आहे. रचनेची सफाई, शब्दांचा नाजुकपणा आणि मधूनच येणाऱ्या एकाद्या कल्पनेनें कवितेचें वृद्धिंगत होणारें सौंदर्य हे त्यांच्या इतर कवितांतले गुण याहि कवितेंत प्रकट झाले आहेत.

● ● ●

‘ फुङ्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन
येणार कधीं तूं भविष्य-काला ? ’

उध्वस्त माझें हें जीवन आज
जीवन-द्यूतांत उलटे फांसे पडले सारे—
नेमकें आलें नि नको तें दान हातांत आतां !
पराभव आतां टळावा केवीं ?

बैसलों खेळाया जेधवां आधीं
टाकिलें जेधवां नि देव-दान
‘ मीच जिङ्कणार ! ’ —विश्वास तेव्हां जीवास होता;
कर्तृत्व फुलतें पाठिशीं होतें;
आकाङ्क्षा नृत्यानें भारलों होतों !
—मनोरथ सारे तेव्हांचे आतां—
वीरभद्रानें उत्सन्न केल्या त्या दक्ष-यज्ञासम
निष्प्रभ झाले !

तरीही कधीं स्मरण तुझें
मनास होतें भविष्य-काला !

—आणि वसन्ताची लागतां चाहूल
हेमन्तीं वठला तरूहि दावितो
नाजुक, नूतन, पाचूंचे उन्मेष—
तेवींच माझें
निर्माल्य कर्तृत्व पाहते उमलूं !
कांहीं निराळाच उत्साह फुलतो रोमरोमांत
'तूंच जिङ्कणार ?'—साङ्गते कोणी
कानांत हळूच विश्रब्धतेनें !
म्हणून तुला ही घालणें साद :
'फुङ्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन,
येणार कधीं तूं भविष्य-काला ?'
कितीकदां तरी—
रम्य स्वप्नापरी त्वदीय मूर्ति
तरळून जाते लोचनांपुढून
आणि आभासांत
मन हें स्वप्नाळु राहतें गुङ्गून !
दिसते तुझी सहास मुद्रा
फुललें जीवर जुईचें मार्दव
जिवन्तपणाची न्यारीच झळाळी
खेळते सारखी मात्र नयनीं !
पाठीवर स्वैर लोळतो आहे केसांचा संभार
अवखळ तुझा उत्साह जणूं नाचतो त्यांतून !
कण्ठांत एकच रुळते आहे

'चिन्तामण्यां'ची अद्भुत माला.

त्यालास अङ्गीं वस्त्र हें आगळें
इन्द्रधनूच्या कोवळ्या तन्तूंची गुम्फण त्याची
आणिक त्यावर केलेली दिसे
जीवनरसाची किमया कांहीं !

—सहस्र हस्तांचे करिसी विन्यास शङ्करापरी
परी न तयांत रुद्रता कांहीं
सारें स्निग्धच, स्नेहल, सुन्दर !
—शोभतो आहे हातांत, उत्तुङ्ग,
श्वेत-मंगल हा विजय-ध्वज
फडकतो आहे
वाऱ्यावर स्वैर एकसारखा
साङ्गतो जणूं गर्जून जगाला :
'जिङ्काया निघालों अवघें ब्रह्माण्ड !'

—दिसतो स्कन्धीं अपूर्व श्रेयांचा विराट घट
आशांचीं पांखरें करीती कूजन
भोंवतीं जयाच्या उत्सुकतेनें !

अनन्त पथावरून असा
निःशङ्कपणें चालतो आहेस भविष्य-काला !
मनीं मानसीं कितिकदां तरी

स्वरूप तुझें हें
देतें उधळून दिलासा—विसांवा !
क्षणभर होतें शान्त होमकुण्ड आंतलें जळतें
क्षणभर होतें हृदयसमृद्धि !

म्हणून लालसा तुझिया भेटीची—
म्हणून उत्सुक तुझिया दर्शना—
म्हणून घालणें तुजला साद :

' फुङ्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन
येणार कधीं तूं भविष्य-काला ? '

निकुम्ब

• • •

## अभ्यास

१ या कवितेंतले पौराणिक उल्लेख शोधून काढून त्यांचा रसपरिपोषाच्या कामीं कवीनें कसा उपयोग करून घेतला आहे तें सांगा.

२ ' जीवनद्यूतांत उलटे फासे पडले सारे ', ' साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें ' आणि ' आशांचीं पांखरें करीती कूजन ', या ओळींचें सौंदर्य विशद करा.

३ ' पाठीवर स्वैर लोळतो आहे केशांचा संभार ', असें कवीनें भविष्य-कालाचें वर्णन केलें आहे, तें तुम्हांला योग्य वाटतें काय ?

४ कवि भूतकालाचा निरोप घेत आहे अशी कल्पना करून तो त्याच्याशीं कोणत्या प्रकारचें संभाषण करील तें लिहा.

• • •

# २४

## पितात सारे गोड हिंवाळा

### परिचय

बा. सी. मर्ढेकर हे कवि, टीकाकार व कादंबरीकार या तीन नात्यांनीं मराठी वाचकांना परिचित आहेत. ' वाङ्‌मयीन महात्मता ' हें त्यांचें टीकात्मक निबंधांचें पुस्तक एके काळीं बरेंच गाजलें होतें. ' रात्रीचा दिवस ' या त्यांच्या कादंबरींत त्यांनीं एका नवीन तंत्राचा प्रयोग करून पाहिला आहे. ' तांबडी माती ' ही त्यांची दुसरी कादंबरी वाचनीय असून ' पाणी ' ही तिसरी कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ' शिशिरागम ', ' कांहीं कविता ' हे त्यांचे दोन काव्य-संग्रह होत. मर्ढेकर हे बोरकर-कुसुमाग्रजांच्या पिढींतले कवि आहेत. पण दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या ' कांहीं कविता ' या त्यांच्या काव्यसंग्रहांतून त्यांनीं परंपरागत व प्रचलित अशा काव्यरचनेच्या पद्धति सोडून अगदीं निराळ्या घाटाची व थाटाची रचना रसिकांना सादर केली. विषय, रचना, कल्पना व भावना या सर्वच गोष्टींत त्यांची कविता बोरकर-कुसुमाग्रजांच्याहून अगदीं भिन्न आहे. इंग्रजी वाङ्‌मयांत अशा प्रकारची कविता गेलीं अनेक वर्षे लिहिली जात आहे. आपल्याकडे ती अपरिचित असल्यामुळें मर्ढेकरांच्या या नव्या कवितेनें चहाच्या पेल्यांतलीं अनेक वादळें निर्माण केलीं. तिचें मंडन व खंडन करणाऱ्या लोकांनीं अभिनिवेशानें अनेक मतें प्रतिपादन केलीं आहेत. त्यांची योग्यायोग्यता ठरविण्याच्या भानगडींत न पडतां सर्वसामान्य मनुष्य बुद्धीला थोडे कष्ट देऊन मर्ढेकरांची कविता वाचील तर तिचें रहस्य आकलन करणें त्याला फारसें कठीण जाणार नाहीं. त्यांची सूचकता अनेकदां दुर्बोधतेच्या सीमेला जाऊन भिडते. संकेत, कल्पना, भावना इत्यादिकांच्या बाबतींत त्यांनीं मूर्तिभंजकाची भूमिका स्वीकारली असल्यामुळें परंपरागत काव्यांत रममाण होणाऱ्या वाचकाला त्यांची कविता वाचतांना अडखळल्यासारखें, चुकल्या चुकल्यासारखें वाटतें.

पण मर्ढेकरांची कल्पकता तरल व नावीन्यावर प्रेम करणारी आहे. जगांत आज सर्व मंगल आणि पवित्र गोष्टींचा जो विध्वंस चाललेला आहे, माणूस हा

माणूस राहिला नसून त्याला जें यंत्राचें स्वरूप आलें आहे—त्याचीं शल्यें मर्ढे-करांच्या मनाला तीव्रतेनें टोंचतात. आपल्या मनाची ही चीड, दिवसेंदिवस विकृत होत चाललेल्या जीवनाविषयींची किळस, त्यांनीं अनेक ठिकाणीं केवळ वास्तवच नव्हे तर अतिवास्तव दृष्टिकोनांतून रंगविली आहे. त्यामुळें त्यांच्या कित्येक कविता व त्यांच्यांतल्या अनेक कल्पना यांच्यावर टीकाकारांनीं गहजब केला आहे. पण ' फलाट दादा 'सारखी त्यांची कविता वाचतांना किंवा—

*' बोंड कपाशीचें फुटे — उले वेचतांना ऊर*
*आज होईल का गोड — माझ्या हातची भाकर ?*
*वांगीं झालीं काळींनिळीं — कांटा बोचे काढतांना*
*आज होतील का खुषी — माणसं ग जेवतांना ! '*

अशा ओळींतला नाजुकपणा पाहिला म्हणजे त्यांच्या काव्यशक्तीविषयीं मन निःशंक होतें. ते काव्यांत जे नवे प्रयोग करीत आहेत ते पांच-दहा वर्षें अनेक कवि निष्ठापूर्वक करीत राहतील तेव्हांच त्यांची उपयुक्तता सिद्ध होईल. तथापि मुंबईतल्या हिंवाळ्यांतल्या एका सकाळचें त्यांनीं खालीं केलेलें कल्पकतापूर्ण पण वास्तव वर्णन आजच्या कवींत त्यांना मानाच व वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे हें सिद्ध करण्याला समर्थ आहे.

● ● ●

न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या
सोज्वळ मोहकतेनें बंदर—
मुंबापुरिचें उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर.

सचेतनांचा दुरूप शीतल;
अचेतनांचा वास कोंवळा;
हवेंत जातीं मिसळुनि दोन्ही !
पितात सारे गोड हिंवाळा !

डोकीं अलगद धरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी;
पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी
नितळ न्याहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेतीं;
संथ बिलंदर लाटांमधुनी
सागर–पक्षी सूर्य वेंचती.
गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन् नारिंगी,
धक्क्यावरच्या अजून बोटी
साखरझोपेमधीं फिरंगी.
कुठें धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध;
कुठें डांबरी रस्त्यावरच्या
भुऱ्या शांततेचा निशिगंध.
ह्या सृष्टीच्या निवांत पोटीं
परंतु लपली सैरावैरा,
अजस्र धांदल, क्षणांत देइल
जिवंततेचे अर्घ्य भास्करा.
थांब ! जरासा वेळ, तोंवरी—
अचेतनांचा वास कोंवळा;
सचेतनांचा हुरूप शीतल;
उरे घोटभर गोड हिंवाळा !

मर्ढेकर

माणूस राहिला नसून त्याला जें यंत्राचें स्वरूप आलें आहे – त्याचीं शल्यें मर्ढेकरांच्या मनाला तीव्रतेनें टोंचतात. आपल्या मनाची ही चीड, दिवसेंदिवस विकृत होत चाललेल्या जीवनाविषयींची किळस, त्यांनीं अनेक ठिकाणीं केवळ वास्तवच नव्हे तर अतिवास्तव दृष्टिकोनांतून रंगविली आहे. त्यामुळें त्यांच्या कित्येक कविता व त्यांच्यांतल्या अनेक कल्पना यांच्यावर टीकाकारांनीं गहजब केला आहे. पण ' फलाट दादा 'सारखी त्यांची कविता वाचतांना किंवा—

*' बोंड कपाशीचें फुटे उले वेचतांना ऊर*
*आज होईल का गोड माझ्या हातची भाकर ?*
*वांगीं झालीं काळींनिळीं कांटा बोचे काढतांना*
*आज होतील का खुषी माणसं ग जेवतांना ? '*

अशा ओळींतला नाजुकपणा पाहिला म्हणजे त्यांच्या काव्यशक्तीविषयीं मन निःशंक होतें. ते काव्यांत जे नवे प्रयोग करीत आहेत ते पांच-दहा वर्षें अनेक कवि निष्ठापूर्वक करीत राहतील तेव्हांच त्यांची उपयुक्तता सिद्ध होईल. तथापि मुंबईतल्या हिंवाळ्यांतल्या एका सकाळचें त्यांनीं खालीं केलेलें कल्पकतापूर्ण पण वास्तव वर्णन आजच्या कवींत त्यांना मानाचं व वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे हें सिद्ध करण्याला समर्थ आहे.

● ● ●

न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या
सोज्वळ मोहकतेनें बंदर—
मुंबापुरिचें उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर.

सचेतनांचा हुरूप शीतल;
अचेतनांचा वास कोंवळा;
हवेंत जातीं मिसळुनि दोन्ही !
पितात सारे गोड हिंवाळा !

डोकीं अलगद धरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी;
पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी
नितळ न्याहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेती;
संथ बिलंदर लाटांमधुनी
सागर–पक्षी सूर्य वेंचती.
गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन् नारिंगी,
धक्क्यावरच्या अजून बोटी
साखरझोपेमधीं फिरंगी.
कुठें धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध;
कुठें डांबरी रस्त्यावरच्या
भुऱ्या शांततेचा निशिगंध.
ह्या सृष्टीच्या निवांत पोटीं
परंतु लपली सैरावैरा,
अजस्र धांदल, क्षणांत देइल
जिवंततेचे अर्घ्य भास्करा.
थांब! जरासा वेळ, तोंवरी—
अचेतनांचा वास कोंवळा;
सचेतनांचा हुरूप शीतल;
उरे घोटभर गोड हिंवाळा!

मर्ढेकर

## अभ्यास

१ या कवितेंतल्या भव्य व सुंदर कल्पना सांगा.

२ कवीची नावीन्य शोधून काढणारी दृष्टि कोणकोणत्या ओळींत दिसते ? त्या साऱ्या ओळी तुम्हांला आवडतात काय ?

३ ' उरे घोटभर गोड हिंवाळा ' असें कवितेच्या शेवटीं कवि कां म्हणतो ?

४ मर्ढेकरांच्या खालील अभंगाचें रसग्रहण करून त्यावरून दिसून येणारें त्यांचें वैशिष्टय सांगा —

जे न जन्मले वा मेले । त्यांसि म्हणे जो आपुले
तोचि मुत्सद्दी जाणावा । देव तेथें ओळखावा ।।
मोलें धाडी जो मराया । नाहीं आंसू आणि माया
त्यासि नेता बनवावें । आम्हां मेंढरांस ठावें ।।

# २५

# कोलंबसाचें गर्वगीत

## परिचय

१९२५ ते १९३५ हें दशक हा ' रविकिरण-मंडळा 'च्या उत्कर्षाचा काळ होता. १९३५ नंतर बोरकर व कुसुमाग्रज हे दोन नवे प्रतिभासंपन्न कवि काव्य-क्षितिजावर उदय पावले. त्यांपैकीं बोरकरांनीं तांब्यांच्या संप्रदायाचा मार्ग चोखाळला. काव्यलेखनाच्या बाल्यावस्थेंत कुसुमाग्रजांवर माधव ज्यूलियनांचा थोडाफार परिणाम झाला असावा; पण तो फार मर्यादित आहे. त्यांची कविता पहिल्यापासून परंपरेपेक्षां आपल्या स्वतःच्या वैशिष्टयपूर्ण आविष्काराकडे लक्ष देणारी आहे. तरल व भव्य कल्पकतेप्रमाणें त्यांच्या अंगीं उत्कट भावनाशीलताहि

आहे. कवि म्हणून ते उदयाला आले तो काळ दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या अस्वस्थतेचा होता. देशांत पारतंत्र्याविरुद्ध निरनिराळ्या प्रकारच्या चळवळी सुरू होत्या. तळहातावर शिर घेऊन माणसें देशासाठीं हवें तें दिव्य करायला तयार होतीं. स्वभावतःच ओजोगुणानें युक्त असलेल्या त्यांच्या प्रतिभेला काळाचें हें आह्वान मिळाल्यामुळें 'क्रांतीचा जयजयकार', 'जा जरा पूर्वेकडे', 'अहिनकुल' वगैरे कविता निर्माण झाल्या. 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेच्या निर्मितीचा इतिहास त्यांच्या मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारा आहे. त्या वेळीं ते एका दैनिकांत सह-संपादक म्हणून काम करीत होते. तुरुंगांत अन्नसत्याग्रह करून आपलें बलिदान करणाऱ्या एका राजबंद्याच्या मृत्यूची तार एके दिवशीं अपरात्रीं त्या वर्तमानपत्राच्या कचेरींत आली. कुसुमाग्रजांनीं एकीकडे त्या तारेचें भाषांतर करून दिलें आणि दुसरीकडे ही कविता रचायला सुरुवात केली. त्यांच्या या कवितेंतला कल्पकतापूर्ण आवेश केशवसुत आणि सावरकर ह्या दोनच आधुनिक कवींत आढळतो, असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

देशावरलें प्रेम, गुलामगिरीची चीड, विषमतेविषयीं संताप, अन्यायामुळें झुंझारपणाला मिळालेलें आह्वान इत्यादि गोष्टी कुसुमाग्रजांच्या काव्यप्रकृतींत स्वभावतःच आहेत. चौपाटीवरल्या टिळकांच्या पुतळ्याजवळ ते सहज जाऊन उभे राहिले तरी त्यांना लगेच वाटूं लागतें —

*'तें होतें जीवित–हातीं धरुनि हताश*
*खळखळतां ज्यावर दृढ पोलादी पाश*
*ध्वज चढवायाची एक अदम्य मनीषा*
*तें होतें जीवित–अन् हा जीवितभास !*
*कण क्षुद्र घेउनी सुखदुःखांचे हातीं*
*धांपावत आम्ही जीवनमार्गावरतीं*
*पर्णापरि वाऱ्यावरती हलतों डुलतों*
*जों धुळींत लाभे अखेरची विश्रांती !'*

त्यांच्या सामाजिक कविताहि अशाच उत्कटतेनें रंगलेल्या आहेत. 'स्वप्नाची समाप्ति', 'गोदाकाठचा संधिकाल' इत्यादि कवितांत त्यांच्या कोमल कविमनाचा सुगंध दरवळत आहे. 'कोलंबसाचें गर्वगीत' हें त्यांचें एक ओजस्वी गीत असून

## अभ्यास

१ या कवितेंतल्या भव्य व सुंदर कल्पना सांगा.

२ कवीची नावीन्य शोधून काढणारी दृष्टि कोणकोणत्या ओळींत दिसते ? त्या साऱ्या ओळी तुम्हांला आवडतात काय ?

३ ' उरे घोटभर गोड हिंवाळा ' असें कवितेच्या शेवटीं कवि कां म्हणतो ?

४ मर्ढेकरांच्या खालील अभंगाचें रसग्रहण करून त्यावरून दिसून येणारें त्यांचें वैशिष्टय सांगा —

> जे न जन्मले वा मेले । त्यांसि म्हणे जो आपुले
> तोचि मुत्सद्दी जाणावा । देव तेथें ओळखावा ।।
> मोलें धाडी जो मराया । नाहीं आंसू आणि माया
> त्यासि नेता बनवावें । आम्हां मेंढरांस ठावें ।।

• • •

# २५

## कोलंबसाचें गर्वगीत

### परिचय

१९२५ ते १९३५ हें दशक हा ' रविकिरण-मंडळा 'च्या उत्कर्षाचा काळ होता. १९३५ नंतर बोरकर व कुसुमाग्रज हे दोन नवे प्रतिभासंपन्न कवि काव्य-क्षितिजावर उदय पावले. त्यांपैकीं बोरकरांनीं तांब्यांच्या संप्रदायाचा मार्ग चोखाळला. काव्यलेखनाच्या बाल्यावस्थेंत कुसुमाग्रजांवर माधव ज्यूलियनांचा थोडाफार परिणाम झाला असावा; पण तो फार मर्यादित आहे. त्यांची कविता पहिल्यापासून परंपरेपेक्षां आपल्या स्वतःच्या वैशिष्टयपूर्ण आविष्काराकडे लक्ष देणारी आहे. तरल व भव्य कल्पकतेप्रमाणें त्यांच्या अंगीं उत्कट भावनाशीलताहि

आहे. कवि म्हणून ते उदयाला आले तो काळ दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या अस्वस्थतेचा होता. देशांत पारतंत्र्याविरुद्ध निरनिराळ्या प्रकारच्या चळवळी सुरू होत्या. तळहातावर शिर घेऊन माणसें देशासाठीं हवें तें दिव्य करायला तयार होतीं. स्वभावतःच ओजोगुणानें युक्त असलेल्या त्यांच्या प्रतिभेला काळाचें हें आह्वान मिळाल्यामुळें ‘ क्रांतीचा जयजयकार ’, ‘ जा जरा पूर्वेकडे ’, ‘ अहिनकुल ’ वगैरे कविता निर्माण झाल्या. ‘ क्रांतीचा जयजयकार ’ या कवितेच्या निर्मितीचा इतिहास त्यांच्या मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारा आहे. त्या वेळीं ते एका दैनिकांत सह-संपादक म्हणून काम करीत होते. तुरुंगांत अन्नसत्याग्रह करून आपलें बलिदान करणाऱ्या एका राजबंद्याच्या मृत्यूची तार एके दिवशीं अपरात्रीं त्या वर्तमानपत्राच्या कचेरींत आली. कुसुमाग्रजांनीं एकीकडे त्या तारेचें भाषांतर करून दिलें आणि दुसरीकडे ही कविता रचायला सुरुवात केली. त्यांच्या या कवितेंतला कल्पकतापूर्ण आवेश केशवसुत आणि सावरकर ह्या दोनच आधुनिक कवींत आढळतो, असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

देशावरलें प्रेम, गुलामगिरीची चीड, विषमतेविषयीं संताप, अन्यायामुळें झुंझारपणाला मिळालेलें आह्वान इत्यादि गोष्टी कुसुमाग्रजांच्या काव्यप्रकृतींत स्वभावतःच आहेत. चौपाटीवरल्या टिळकांच्या पुतळ्याजवळ ते सहज जाऊन उभे राहिले तरी त्यांना लगेच वाटूं लागतें —

> *‘ तें होतें जीवित—हातीं धरुनि हताश*
> *खळखळतां ज्यावर दृढ पोलादी पाश*
> *ध्वज चढवायाची एक अदम्य मनीषा*
> *तें होतें जीवित—अन् हा जीवितभास !*
> *कण क्षुद्र घेउनी सुखदुःखांचे हातीं*
> *धांपावत आम्ही जीवनमार्गावरतीं*
> *पर्णांपरि वाऱ्यावरती हलतों डुलतों*
> *जों धुळींत लाभे अखेरची विश्रांती ! ’*

त्यांच्या सामाजिक कविताहि अशाच उत्कटतेनें रंगलेल्या आहेत. ‘ स्वप्नाची समाप्ति ’, ‘ गोदाकाठचा संधिकाल ’ इत्यादि कवितांत त्यांच्या कोमल कविमनाचा सुगंध दरवळत आहे. ‘ कोलंबसाचें गर्वगीत ’ हें त्यांचें एक ओजस्वी गीत असून

त्यांत ध्येयवाद्यांच्या आत्मशक्तीचें आणि स्वप्नसामर्थ्याचें मोठें सुंदर चित्रण कुसुमाग्रजांनीं केलें आहे. घराच्या चार भिंतींत स्वतःला कोंडून घेऊन आणि त्यांत तीन धोंडे मांडून ल्हानसहान शरीरसुखें मिळालीं म्हणजे आयुष्याचें सार्थक झालें असें मानणारीं माणसें आपली, आपल्या समाजाची किंवा मानवतेची उंची कधींच वाढवूं शकत नाहींत. ज्यांना मोठें व्हायचें आहे, कांहींतरी अपूर्व करून दाखवायचें आहे, त्यांना कोलंबसाप्रमाणेंच साहस करावें लागतें. त्या साहसानेंच मानवाची अंतीं प्रगति होत असते हें कुसुमाग्रजांनीं मोठ्या ओजस्वी-पणानें या कवितेंत सूचित केलें आहे.

● ● ●

हजार जिह्वा तुझ्या गर्जुं दे प्रतिध्वनीनें त्या
समुद्रा, डळमळुं दे तारे !
विराट वादळ हेलकावुं दे पर्वत पाण्याचे
ढळूं दे दिशाकोन सारे !

ताम्रसुरा प्राशून मातुं दे दैत्य नभामधले
दडूं द्या पाताळीं सविता
आणि तयांची ही अधिराणी दुभंग धरणीला
कराया पाजळुं दे पलिता !

कीं स्वर्गातुन कोसळलेला, सूड-समाधान
मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरतीं
करीं हें तांडव थैमान !

पदच्युता, तव भीषण नर्तन असेंच चालूं दे
फुटूं दे नभ माथ्यावरतीं
आणि तुटूं दे अखण्ड उल्का वर्षावत अग्नी
नाविकां या भय वा भीती !

सहकाऱ्यांनो, कां ही खन्ती जन्म खलाशांचा
झुंजण्या अखण्ड संग्राम
नक्षत्रापरि असीम नीलामधें संचरावें
दिशांचें आम्हांला धाम !

काय सागरीं तारूं लोटलें परताया मागें
असे का हा अपुला बाणा
त्याहुन घेऊं जळीं समाधी सुखें कशासाठीं
जपावें पराभूत प्राणा !

कोट्यवधी जगतांत जिवाणूं जगतीं अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं,
नाविक आम्ही परन्तु फिरतों सात नभांखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढती !

मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा !
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा !

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
'अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !'

कुसुमाग्रज

## अभ्यास

१ ' नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभांखालीं । ' या ओळींचा अर्थ विशद करा. या ओळींतली कल्पना परकीय वाटते काय ? औचित्याच्या दृष्टीनें हिची चर्चा करा.

२ ' ओज व कल्पकता हे कुसुमाग्रजांच्या कवितेचे प्रमुख गुण आहेत ', या विधानाची या कवितेच्या आधारें चर्चा करा.

३ ' कथा या खुळ्या सागराला । ' या ओळींतलें मर्म लक्षांत घेऊन कोलंबस व महासागर ' या शीर्षकाखालीं दोघांचें संभाषण चित्रित करण्याचा प्रयत्न करा.

४ ' कोट्यवधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती । जशीं तीं गवताचीं पातीं ।। ' असें या कवितेंतला कोलंबस म्हणतो. त्यानें सर्वसामान्य मनुष्याविषयीं व्यक्त केलेली ही तुच्छता तुम्हांला योग्य वाटते काय ?

● ● ●

अनु. … विभाग काव्य
क्रमांक …
नों. दि. …

## कवि-परिचय

**ज्ञानेश्वर**—( ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी : १२७५–१२९६ )

‘ माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । अमृतातेंहि पैजा जिंके । ’ अशा तऱ्हेचे बोल आत्मविश्वासानें काढणारा व गेलीं सातशें वर्षें मराठी मनावर अधिराज्य चालविणारा श्रेष्ठ संतकवि. प्रतिभा महाकवीची, बुद्धि तत्त्वज्ञाची, व हृदय संताचें. व्यक्तिमत्त्वांतल्या या सर्व गुणांचा संगम ‘ ज्ञानेश्वरी ’त आढळतो. प्रमुख काव्यग्रंथ : ज्ञानेश्वरी, अमृतानुभव.

**जनाबाई**—( ज्ञानदेवांच्या काळांतली संत-कवयित्री : १३५० समाधी )

नामदेवांच्या घरची दळणकांडण करणारी एक पोरकी दासी. जनाबाईचे साडेतीनशें स्फुट अभंग उपलब्ध आहेत. रचनेवर नामदेव व ज्ञानेश्वर यांची छाया असली तरी, या अभंगांत कवयित्रीचा जिव्हाळा, विठ्ठलभक्ति आणि स्वतंत्र प्रतिभा हीं स्पष्टपणें दृग्गोचर होतात.

**मुक्तेश्वर**—( मुक्तेश्वर चिंतामणि मुद्गल : काळ सुमारें १६००–१६५० )

वेदान्त, तत्त्वज्ञान व धार्मिक वातावरण यांतच मुख्यत्वें वावरणाऱ्या मराठी कवितेला लौकिकरचनेचा मार्ग मुक्तेश्वरांनीं मोकळा करून दिला. यांचीं सृष्टि-सौंदर्याचीं वर्णनें आणि निरनिराळ्या प्रसंगांचीं व मनोविकारांचीं शब्दचित्रें अत्यंत वेधक आहेत. पांगारकरांच्या मतें ‘ मुक्तेश्वरांची प्रतिभा, कल्पना, वर्णन-चातुर्य, सृष्टिनिरीक्षण, बुद्धीची व्यापकता व राष्ट्रीय भावना हे गुण अनन्य-साधारण असल्यामुळें कवित्वाच्या दृष्टीनें, कोणताहि मराठी कवि मुक्तेश्वरांची बरोबरी करूं शकणार नाहीं. भारताचीं पांच पर्वें, ‘ संक्षेप रामायण ’ व इतर कांहीं स्फुट आख्यानपर कविता एवढें मुक्तेश्वरांचें साहित्य उपलब्ध आहे.

**तुकाराम**—( तुकाराम बोल्होबा आंबिले : १६०८–१६५० )

गेलीं तीन शतकें मराठी मनावर अधिराज्य गाजविणारा आणि पंडितांपासून खेडुतांपर्यंत सर्वांच्या अंतःकरणांत प्रेमाचें व आदराचें स्थान मिळविणारा श्रेष्ठ संतकवि. विविध विषयांवर अभंगरचना. उत्कट ईश्वरभक्तीइतकेंच जगाविषयीं व

सर्वसामान्य जनतेविषयीं प्रेम. समर्पक व चपखल दृष्टान्त देण्यांत सिद्धहस्त. तुकारामांचे अनेक चरण आणि त्यांच्या अभंगांतील अनेक सूक्ति महाराष्ट्रांत घरोघर लोकांच्या तोंडीं घोळत आहेत, त्यांना समाधान देऊन प्रकाशाचा किरण दाखवीत आहेत. सर्व कविता ‘ तुकारामाची गाथा ’ या ग्रंथांत संकलित.

**मोरोपंत**—( मोरोपंत पराडकर : १७२९–१७७४ )

मराठी पंडितकवींतले एक अग्रगण्य कवि. गीति या जातींतली यांची रचना विशेष प्रसिद्ध आहे. रामायण-महाभारतांतल्या अनेक कथा यांच्या कवित्वामुळें विशेष आकर्षक झाल्या आहेत. प्रसंगाचें वर्णन करतांना आणि संवाद लिहितांना यांच्या कवित्वाला अधिक रंग चढतो. रचना प्रौढ व यमक-प्रचुर.

**प्रभाकर**—( प्रभाकर जनार्दन दातार : १७६९–१८४३ )

पेशवाईच्या शेवटच्या दिवसांतील कल्पक शाहीर. यांचे पोवाडे, लावण्या इत्यादिकांचें पुस्तक प्रसिद्ध आहे.

**केशवसुत**—( कृष्णाजी केशव दामले : १८६६–१९०५ )

आधुनिक मराठी कवितेचे प्रमुख प्रवर्तक. ओज, जिह्वाळा, कल्पकता व अंतर्मुखता हे काव्याचे मुख्य विशेष. ‘ सिंहावलोकन ’, ‘ सतारीचे बोल ’, ‘ तुतारी ’, ‘ हरपलें श्रेय ’, ‘ झपूर्झा ’, ‘ क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास ’ वगैरे अनेक कवितांत त्यांचे काव्यगुण प्रकर्षानें प्रकट झाले आहेत. ‘ केशवसुतांची कविता ’ या पुस्तकांत सर्व रचना समाविष्ट.

**चंद्रशेखर**—( चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे : १८७१–१९३७ )

टिळक-केशवसुतांच्या कालखंडांतले एक प्रमुख कवि. यांच्या काव्यरचनेंत कांहीं आधुनिक विशेष दिसले तरी तिचा एकंदर थाटमाट नवीनापेक्षां जुन्याशींच जुळता आहे. कवितेचे एकनिष्ठ उपासक. बडोद्याचे राजकवि. शैलीवर पांडित्याची छाया असली तरी ती मोठी प्रसन्न व डौलदार आहे. माधुर्य हा काव्याचा विशेष. ‘ काय हो चमत्कार ! ’ व ‘ गोदागौरव ’ या दीर्घ कवितांत यांच्या प्रतिभेचे सर्व गुण प्रतिबिंबित झाले आहेत. काव्यग्रंथ : चंद्रिका.

**बालकवि**—( त्र्यंबक बापूजी ठोंबरे : १८९०–१९१८ )

अर्वाचीन कवितेंतील श्रेष्ठ निसर्गपूजक कवि. यांच्यासारखा सृष्टीशीं समरस होणारा कवि मराठींत दुसरा नाहीं. निसर्गवर्णनांत कोमलता व काव्यमयता यांचा मधुर संगम. शैली जितकी प्रसन्न तितकीच नादमधुर. काव्यसंग्रह : बाल-कवींची समग्र कविता.

**'बी'**—( नारायण मुरलीधर गुप्ते : १८७२–१९४७ )

केशवसुतांच्या पिढींतले एक थोर कवि. काव्याला तत्त्वचिंतनाची जोड मिळाल्यामुळें त्यांच्या कवितेला निराळेंच सौंदर्य प्राप्त झालें आहे. यांच्या 'कमळा', 'दीपज्योति', 'माझी कन्या' वगैरे अनेक कविता प्रसिद्ध आहेत. सर्व कविता 'फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहांत समाविष्ट.

**विनायक**—( विनायक जनार्दन करंदीकर : १८७२–१९०९ )

केशवसुतांच्या पिढींतील राष्ट्रीय वृत्तीचे एक प्रमुख कवि. यांची ऐतिहासिक कविता उल्लेखनीय आहे. इतर कवितांतहि देशाच्या पारतंत्र्याची त्यांच्या मनाला लागलेली टोंचणी प्रतिबिंबित झाली आहे. यांनीं कांहीं चांगलीं भावगीतें लिहिलीं असलीं तरी त्यांची वृत्ति वर्णनपर व कथापर काव्यांतच अधिक रमते. शैली प्रसन्न. काव्यसंग्रह : विनायकाची कविता.

**भा. रा. तांबे**—( भास्कर रामचंद्र तांबे : १८७४–१९४१ )

आधुनिक मराठी कवितेच्या विकासाचें श्रेय केशवसुतांप्रमाणें तांब्यांनाहि दिलें पाहिजे. त्यांच्या कवितेंत कल्पना, भावना आणि नादमाधुर्य यांचा सुरेख संगम आढळतो. रचना विविध. काव्यसंग्रह : तांबे यांची कविता.

**गोविंदाग्रज**—( राम गणेश गडकरी : १८८५–१९१९ )

आधुनिक कवितेला लोकप्रियता प्राप्त करून देणारे प्रतिभावान् कवि. नादमाधुरी, शब्दप्रभुत्व, कल्पनाचमत्कृति, इत्यादि अनेक गुणांनीं कविता नटलेली आहे. 'राजहंस', 'मुरली', 'प्रेम आणि मरण' वगैरे कविता अतिशय लोकप्रिय. 'वाग्वैजंयती' हा काव्याचा संग्रह, 'एकच प्याला' व 'भावबंधन' हीं त्यांचीं नाटकें व 'रिकामपणची कामगिरी' हें विनोदी पुस्तक, प्रसिद्ध आहेत.

**वि. दा. सावरकर**—( विनायक दामोदर सावरकर : जन्म १८८३ )

कल्पकता व भावनाशीलता हे दोन्ही गुण सावरकरांच्या काव्यांत आढळतात. त्यांच्या अनेक कविता स्वतःच्या संघर्षपूर्ण जीवनावर व त्यांतल्या उत्कट अनुभूतींवर आधारलेल्या आहेत. ओज व कल्पकता हे काव्याचे प्रमुख गुण. प्रमुख काव्य-ग्रंथ : सावरकरांची कविता. इतर पुस्तकांत 'माझी जन्मठेप', 'सन्यस्त खड्ग', 'काळें पाणी' वगैरे प्रसिद्ध आहेत.

**यशवन्त**—( यशवंत दिनकर पेंढरकर : जन्म १८९९ )

१९२० ते १९४० या कालखंडांतील एक अग्रगण्य प्रतिभावान् कवि. तांबे आणि माधव ज्यूलियन यांच्या जोडीनें यांनीं या कालांतील मराठी कविता संपन्न केली. ओज व भावनेची उत्कटता या गुणांमुळें यशवन्तांच्या अनेक कविता लोकप्रिय झाल्या आहेत. 'आई', 'गोलघुमटांत', 'दैवतें मायतात' वगैरे त्यांच्या कविता हीं मराठी काव्याचीं चिरंतन भूषणें आहेत. 'यशोधन' व 'यशोगंध' यांच्यासारखे स्फुट कवितांचे अनेक संग्रह आणि 'बंदीशाळा' हें करुणरसपूर्ण खंडकाव्य त्यांची कविता किती विविध आणि विपुल आहे हें दर्शवितात.

**माधव ज्यूलियन**—( माधव त्र्यंबक पटवर्धन : १८९४–१९३९ )

१९२० ते १९४० या कालखंडांतले एक श्रेष्ठ प्रतिभावान् कवि. 'छंदो-रचना' या ग्रंथांत अभ्यासशीलता व पांडित्य हे त्यांचे गुण प्रकट झाले आहेत. नवीन वृत्तांचे व रचनेचे पुरस्कर्ते. भावनेची उत्कटता, कल्पनेची तरलता इत्यादि गुणांनीं काव्य संपन्न. प्रमुख पुस्तकें : विरहतरंग, स्वप्नरंजन, गज्जलांजलि, सुधारक.

**केशवकुमार**—( प्रल्हाद केशव अत्रे : जन्म १८९८ )

अत्र्यांची गद्यांतली कल्पकता व विनोदप्रियता पद्यांतहि चांगल्या रीतीनें प्रकट झाली आहे. विडंबक व विनोदी कवि म्हणून त्यांनीं मिळविलेलें यश अजून दुसऱ्या कुठल्याहि कवीला मिळालेलें नाहीं. काव्यग्रंथ : गीतगंगा, झेंडूचीं फुलें. इतर पुस्तकांत 'उद्यांचा संसार' व 'लग्नाची बेडी' हीं नाटकें, 'मी कसा झालों ?' हें आत्मवृत्त, हीं विशेष प्रसिद्ध आहेत.

**अनंत काणेकर**—( जन्म १९०५ )

कवि, कथालेखक, प्रवासवर्णनकार व लघुनिबंधलेखक. प्रसन्न शैली आणि प्रगतिपर विचारसरणी हे लेखनाचे विशेष. मराठींतल्या श्रेष्ठ लघुनिबंधकारांत यांची गणना होते. यांचीं प्रवासवर्णनें मार्मिक व मनोरंजक असतात. कांहीं पुस्तकें : नवे किरण, पिकलीं पानें, चांद्रात, आमची माती – आमचें आकाश, धुक्यांतून लाल ताऱ्याकडे, पांढरीं शिडें.

**अनिल**—( आत्माराम रावजी देशपांडे : जन्म १९०१ )

'फुलवात' व 'पेर्ते व्हा' हे अनिलांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'भग्नमूर्ति' हें त्यांचें खंडकाव्य आहे. मुक्तछंदाचा त्यांनीं यशस्वीपणानें पुरस्कार केला आहे. भावना व कल्पकता यांच्या जोडीनें सूचकताहि त्यांच्या काव्यांत आढळते.

**बा. भ. बोरकर**—( बाळकृष्ण भगवंत बोरकर : जन्म १९१० )

१९४० नंतरच्या कालखंडांतील एक अग्रेसर प्रतिभावान् कवि. 'जीवन-संगीत', 'दूधसागर', 'आनंदभैरवी' या तीन काव्यसंग्रहांत त्यांची सुंदर रचना समाविष्ट झाली आहे. नादमाधुर्य, चित्रणकुशलता, नाजुक कल्पना व भावना यांचा मनोहर आविष्कार आणि उदात्त वातावरण हे काव्याचे मुख्य विशेष. गद्यलेखनांतहि बोरकर कुशल आहेत. लघुनिबंध आणि कादंबरी या क्षेत्रांतहि त्यांनीं यशस्वी रीतीनें पदार्पण केलें आहे. 'भावीण' ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध आहे.

**कान्त**—( वा. रा. कान्त : जन्म १९१३ )

१९४० नंतरच्या कालखंडांतील एक प्रमुख कवि. कल्पकतेप्रमाणें तीव्र सामाजिक जाणीवहि त्यांच्या काव्यांत आढळते. स्फुट कविता 'रुद्रवीणा' या संग्रहांत समाविष्ट झाली आहे.

**इंदिरा संत**—( जन्म १९१४ )

१९४० नंतरच्या कालखंडांतील एक प्रमुख कवयित्री. विविध विषयांवर

८४२०

प्रसन्न आणि भावनापूर्ण रचना. 'घोडा' या त्यांच्या काव्यसंग्रहाला सरकारी पारितोषिक मिळालें आहे. 'मेंदी' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह. इंदिराबाई कुशल कथालेखिकाहि आहेत.

**कृ. ब. निकुम्ब**—( जन्म १९२० )

'उज्ज्वला' व 'उर्मिला' या काव्यसंग्रहांचे कर्ते. प्रसाद व सोज्वल भावना हे यांच्या कवितेचे विशेष होत.

**मर्ढेकर**—( बाळ सीताराम मर्ढेकर : १९०७ ते १९५६ )

१९४० नंतरच्या कालखंडांतल्या नव्या कवितेचे प्रवर्तक. यांची कविता केशवसुत-तांबे यांच्या परंपरेंतील कवितेपेक्षां निराळी व नव्या प्रकारची आहे. अनुभूति आणि आविष्काराची पद्धति या दोन्हींतहि हें नावीन्य दिसतें. 'कांहीं कविता' व 'आणखी कांहीं कविता' हे मर्ढेकरांचे दोन प्रमुख काव्यसंग्रह होत. टीकाकार या नात्यानेंहि त्यांचा दर्जा मोठा आहे. त्यांचें 'साहित्य व सौंदर्य' हें या क्षेत्रांतील प्रसिद्ध पुस्तक होय.

**कुसुमाग्रज**—( विष्णु वामन शिरवाडकर : जन्म १९१२ )

तरुण पिढींतील प्रतिभासंपन्न साहित्यिक. कवितेप्रमाणें कथा, कादंबरी, रूपककथा व लघुनिबंध या क्षेत्रांत कुसुमाग्रजांनीं यशस्वी रीतीनें संचार केला आहे. ( १ ) दुसरा पेशवा ( नाटक ), ( २ ) वैष्णव ( कादंबरी ), ( ३ ) समिधा ( रूपककथा ) हीं प्रमुख गद्य पुस्तकें होत. 'विशाखा' हा प्रसिद्ध काव्यसंग्रह. कल्पकता, ओजस्विता आणि भावनोत्कटता यांचा सुंदर संगम त्यांच्या काव्यांत आढळतो.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २३८५२
विभाग ३/०२४
क्रमांक ५०२
नों. दि. २९/११/५८

REFBK-0009420
REFBK-0009420

देशमुख आणि कंपनीनें

प्रसिद्ध केलेले उत्कृष्ट

काव्य-संग्रह

संपादक : वि. स. खांडेकर

*केशवसुत — काव्य आणि कला*

२ *काव्यज्योति*

वि. वा. शिरवाडकर

३ *किनारा*

बाबुराव गोखले

४ *वारा फोफावला*

-अनंत काणेकर

५ *चांदरात*